जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# नांदगाव तालुक्यात दमदार पावसाची हजेरी

## शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण

नांदगाव खंडेश्वर/प्रतिनिधीः- नांदगाव खंडेश्वर तालुका व शहर परिसरात मंगळवार २३ जून रोजी सायंकाळी सुमारे आठ वाजल्यापासून दमदार पावसाने हजेरी लावली. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून गेल्या काही दिवसापासून पावसाच्या प्रतीक्षेत असलेला शेतकरी व नागरिकांना या पावसामुळे मोठा दिलासा मिळाला. या पावसामुळे हंगामातील खरीप पेरणीच्या कामाला वेग येण्याची शक्यता आहे. शेतकरी पावसामुळे समाधानी असून सोयाबीन कापूस तूर इतर पिकाच्या पेरणीसाठी हा पाऊस लाभदायक ठरणार असल्याचे मत व्यक्त होत आहे. अनेक दिवसाच्या प्रतीक्षेनंतर दमदार पावसाच्या हजेरीने शहरातील वातावरण आनंदी असून उष्णतेपासून नागरिकांना दिलासा मिळाला आहे. शेतकरी पुन्हा पेरणीच्या कामात गुंतला. मंगळवारी दिनांक २३ ला रात्री वरून राजाने जोरदार हजेरी लावून विजेच्या गडगडासह मुसळधार पावसाने झोडपून काढले. त्यामुळे शेती कामाला वेग आला असून पेरणीसाठी आवश्यक असलेल्या बियाणे व खताच्या खरेदीसाठी पुन्हा कृषी केंद्रासमोर शेतकऱ्यांची गर्दी वाढली. सुमारे तीन तास पाऊस बसल्याने शेत शिवारात पाणी साचले असून पावसामुळे जमिनीत ओलावा निर्माण झाला.



# शॉक लागून इसमाचा मृत्यू

**टाकरखेडा संभू/प्रतिनिधीः-** टाकरखेडा शंभू येथील सतीश निरंजन भालचक्र (वय ४६) यांचा शॉक लागल्याने दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना मंगळवारी रात्री सुमारे १० वाजताच्या सुमारास घडली.मिळालेल्या माहितीनुसार, सतीश भालचक्र हे घरी असताना विजेच्या संपर्कात आले असता त्यांना विजेचा जोरदार धक्का बसला. कुटुंबीयांनी तातडीने



त्यांना उपचारासाठी अमरावती येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. सतीश भालचक्र यांच्या पश्चात मूकबधिर पत्नी, दोन लहान चिमुकले मुले, आई-वडील व भाऊ असा आप्तपरिवार आहे. त्यांच्या अकाली निधनामुळे गावात हळहळ व्यक्त होत असून कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्यावर बुधवारी टाकरखेडा शंभू येथील स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

केला. हल्लेखोरांच्या दहशतीमुळे परिसरातील व्यापाऱ्यांनी दुकाने बंद करून पळ काढल्याचेही तक्रारीत नमूद आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी तातडीने तपासाची सूत्रे हाती घेत आरोपींना अटक केली. आरोपींमध्ये अन्सार नगर परिसरातील आठ जण, ताजनगर व रतनगंज येथील प्रत्येकी एक आरोपी तसेच एका विधिसंघर्षग्रस्त बालकाचा समावेश आहे. न्यायालयाने आरोपींना २५ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. तपासादरम्यान मुख्य आरोपी सय्यद तौसिफ सय्यद नासिर आणि अरबाज खान अहेफाज खान यांच्याकडून दोन देशी कट्टे व दोन जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली. तसेच इतर आरोपींकडून चार तलवारी, तीन फरसे आणि गुन्ह्यात वापरलेल्या तीन मोटारसायकली हस्तगत करण्यात आल्या आहेत. या गुन्ह्यातील इतर फरार आरोपींचा शोध सुरू असून पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक मनोहर कोटनाके करीत आहेत. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त शाम घुघे आणि सहाय्यक पोलीस आयुक्त कैलास पुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली नागपुरी गेट पोलिसांच्या विशेष पथकाने केली.

# १ व १० वरिल उर्वरित

## आशा भोसले यांच्या शोकप्रस्तावात

सभागृहात एकूण बारा शोक प्रस्ताव होते. मला मिळालेली प्रिंट अत्यंत अस्पष्ट होती आणि त्यात काही तांत्रिक चुका होत्या, ज्यामुळे वाचन करताना माझ्याकडून चूक झाली. आशाताई भोसले यांच्याबद्दल अवमानास्पद बोलण्याचा विचार जगात कोणतीही व्यक्ती करू शकत नाही. जे काही घडले ते निव्वळ एका चुकीमुळे झाले असून त्याचा चुकीचा अर्थ काढला जाउ नये. राज्यातील लोकांचे किंवा सभागृहातील सदस्यांचे यामुळे मन दुखावले असेल तर मी मनापासून दिलगिरी व्यक्तकरतो. गेल्या चार वर्षांत अध्यक्ष म्हणून काम करताना आपण अनेक भाषणे आणि शोक प्रस्ताव मराठीत मांडले असून, इतर सदस्यांप्रमाणेच मलाही मराठी भाषेचा आणि आशा भोसले यांचा सार्थ अभिमान असल्याचे त्यांनी नमूद केले.

नार्वेकर यांनी शोक प्रस्तावावर आपले मनोगत व्यक्त करताना तब्बल २६ चुका केल्याचे समोर आले होते. मराठी भाषेला अभिजात दर्जा प्राप्त झाला असताना, अध्यक्षपदावरील व्यक्तीने □मराठीच्या ललाटी वैभव आहे□ सारखी वाक्ये वाचली आणि आशा भोसले यांच्या वडिलांचे नाव दीनानाथ मंगेशकर असताना त्यांचा उल्लेख □दीनदयाळ□ असा केल्याने नेटक-यांनी त्यांना सोशल मीडियावर धारेवर धरले होते.

या संपूर्ण प्रकरणावर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी अत्यंत तीव्र आणि आक्रमक शब्दांत संताप व्यक्तकेला होता. राज ठाकरे म्हणाले होते की, आशाताई भोसलेंच्या निधनाचा शोकप्रस्ताव मांडताना विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी ज्या पद्धतीने मराठी भाषेची चिरफाड केली आणि कागदावर लिहून दिलेले मराठीही त्यांना वाचता आले नाही, हे पाहून संताप आणि उद्वेग दोन्ही दाटून आले. ते कागद वाचण्याआधी त्या कागदातून काय भेळ खाल्ली होती का, असा खोचक आणि सणसणीत सवाल राज ठाकरेंनी उपस्थित केला होता. या संपूर्ण गदारोळानंतर अखेर विधानसभा अध्यक्षांना नमते घेत जाहीर माफी मागावी लागली आहे.

## विधान परिषदेत सत्ताधा-यांमध्येच

दादागिरीवर सभागृहाचे कामकाज चालणार नाही, ज्यांना हुल द्यायची त्यांना द्या, असे आक्रमक विधान दरेकरांनी सभागृहात केले. सभागृहातील वातावरण कमालीचे तापलेले पाहून सभापती राम शिंदे यांनी या वादात मध्यस्थी केली. सभागृहाची शिस्त आणि नियम सर्वच सदस्यांनी पाळणे गरजेचे असल्याचे त्यांनी सुनावले. एकमेकांना आपसांत प्रश्न-प्रतिप्रश्न करणे किंवा मंत्री उत्तर देत असताना अर्ध्यावरच बोलणे यातून काय साध्य होणार आहे, असा सवाल सभापतींनी उपस्थित केला. अनेक जण चर्चेत भाग घेतात, मात्र ज्येष्ठ मंत्र्यांनी उत्तर देण्यास सुरु वात केली की लगेच त्यांना प्रतिप्रश्न विचारणे हे अजिबात बरोबर नाही, असे खडेबोल सुनावत सभापतींनी वाद मिटवण्याचा प्रयत्न केला.

## सरकारच्या ऑपरेशन 'वसुली'ने १२

होते. तसेच याच योजनेत तब्बल १३,४१५ शासकीय महिला कर्मचा-यांनी नियमबाह्य आणि बेकायदेशीरपणे लाभ घेतल्याचे देखील उघड झाले होते. या सर्वाची माहिती देताना या योजनेत घोटाळाची कबूली सरकारने दिली आहे. विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात उपस्थित झालेल्या एका प्रश्नाला उत्तर देताना, राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी ही धक्कादायक माहिती दिली आहे. तर ही माहिती त्यांनी लेखी स्वरूपात सादर केली आहे. या माहितीनुसार, योजनेचे नियम धाब्यावर बसवून अपात्र लाभार्थ्यांनी शासनाच्या तिजोरीतून तब्बल १६५ कोटी रुपयांचा लाभ लाटला आहे.

यानंतर आता या पैशांची वसूली होणार का असा प्रश्न अनेकांना पडला असतानाच या सर्व अपात्र लाभार्थ्याकडून पैसे वसुलीचे जिल्हाधिका-यांना आदेश दिल्याचे तटकरे यांनी सांगितले आहे. तसेच जेव्हा या योजनेतील घोटाळा समोर आला त्याचवेळी सरकारने तात्काळ पावले उचलत कडक कारवाई सुरू केल्याचे म्हटलं आहे. अपात्र लाभार्थ्यांचे हप्ते तात्काळ बंद करण्यात आले असून आता नियमबाह्यपणे बँक खात्यात जमा झालेली रक्कम वसूल केली जाणार आहे. यासाठी संबंधित शासकीय विभाग आणि सर्व जिल्ह्यांच्या जिल्हाधिका-यांना कडक निर्देश देण्यात आल्याचेही राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले आहे.

## चेहरा पूर्णपणे दिसणे

(एआय) आधारित साधने आणि अत्यंत सूक्ष्म इलेक्ट्र?निक उपकरणांच्या माध्यमातून गैरप्रकार होण्याची शक्यता वाढल्याने कडक उपाययोजना करण्यात येत आहेत.

दरम्यान, महिला उमेदवारांना बुरखा, हिजाब, दुपट्टा किंवा इतर पोशाख परिधान करण्यास बंदी नसल्याचे परिषदेने स्पष्ट केले आहे. मात्र, परीक्षा सुरू असताना वर्गखोलीत बसलेल्या उमेदवारांचा चेहरा सीसीटीव्हीमध्ये पूर्णपणे स्पष्ट दिसला पाहिजे. त्यामुळे डोक्यावर, कानांवर किंवा चेह-यावर कोणत्याही प्रकारचे आवरण ठेवता येणार नसल्याचे परिषदेने पत्राद्वारे स्पष्ट केले आहे.

## खामेनींच्या अंत्यसंस्कारासाठी

त्यावेळी भारत सरकारने एक दिवसाचा राष्ट्रीय दुखवटा जाहीर केला होता. तत्कालीन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी भारतीय शिष्टमंडळाचे नेतृत्व करत तेहरान गाठले होते आणि अंत्यसंस्कार समारंभात सहभागी झाले होते.

## मुसळधार पावसाने झोडपले

मुसळधार पावसाने शहराला चांगले झोडपले.

बुधवारी दुपारी तीन वाजता नंतर अचानक वातावरणात परिवर्तन झाले आणि मुसळधार पाऊस सुरू झाला. पहिल्याच पावसात मनपाच्या वतीने करण्यात आलेल्या नियोजनाची पोलखोल झाली. शहरातील मुख्य चौक बाजार आणि खाली असलेल्या क्षेत्रांमध्ये रस्त्यावर पाणी भरले होते. रस्त्यांना तालावाचे स्वरूप प्राप्त झाले होते. काही ठिकाणी विजेचे तार पडले तर कुठे झाडे पावसामुळे कोसळले. पावसामुळे नागरिकांना गर्मीपासून थोडा दिलासा मिळाला आहे पण मुसळधार पावसाने जनजीवन प्रभावित केले. गोरगरीब रुग्णांसाठी महत्त्वपूर्ण असलेल्या जिल्हा सामान्य रुग्णालयात पावसामुळे पाणी शिरल्याने मोठी अडचण निर्माण झाली होती. पावसामुळे शेतकरी सुखावले. काही क्षेत्रात वीज पुरवठा खंडित झाला होता. काही मार्गावर वृक्षाच्या फांद्या तुटून पडल्याने वीज पुरवठा खंडित झाला होता.

## ज्येष्ठ नागरिकावर

इतका भयानक होता की, डुकराने त्यांच्या संपूर्ण अंगावर ठिकठिकाणी गंभीर चावे घेतले. या जीवघेण्या हल्ल्यात त्यांना आपले एक बोटही गमावावे लागले आहे. सध्या त्यांच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असून त्यांची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात येत आहे. या संपूर्ण घटनेची थरारक दृश्ये परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून, या घटनेची तीव्रता पाहून नागरिकांच्या अंगावर काटा येत आहे.

शहरातील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात मागील वर्षी बिबटने प्रवेश केला होता तेंव्हा त्या बिबट्याने याच कॉलनीत प्रवेश केला होता. बिबट्या पाठोपाठ नाल्याच्या लगत डुकरांचा संचार असल्याने यावेळी डुकरांची दहशत पसरली आहे. भविष्यात पुन्हा या डुकरांच्या मागावर बिबट येण्याची शक्यता नाकारता येत नाही. गणपती मंदिरासमोरील ज्या मोकळ्या जागेतून जनावरे व डुकरांचा वावर होतो, त्या जागेभोवती त्वरित मजबूत संरक्षक भिंत (कंपाउंड वॉल) उभारण्यात यावी.

नाल्यावरून जनावरे थेट कॉलनीत प्रवेश करत असल्याने, या नाल्यावर पूर्णपणे बंदिस्त आरसीसी गटर लाईनचे बांधकाम करण्याची मागणी आशियाड कॉलनीतील नागरिकांनी केली आहे.

शहरातील ज्येष्ठ नागरिकांनी सकाळ-संध्याकाळ फिरताना अत्यंत सावध राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. जनावरांच्या किंवा डुकरांच्या संभाव्य हल्ल्याची शक्यता पाहता चालताना सोबत नेहमी काठी किंवा लाकडी दांडा अवश्य ठेवावा. पहाटे अंधार असताना किंवा निर्जन ठिकाणी एकटे फिरणे टाळावे, सोबत इतर नागरिकांना ठेवावे.

## परतवाडा अश्लील व्हिडिओ

इमरान मोहम्मद साजिद आणि शेख नावेद शेख हसन यांनाही अटक करण्यात आली. अशा एकूण आठ आरोपींविरुद्ध विविध कलमान्वये कारवाई करण्यात आली आहे. तपासादरम्यान आरोपींकडून मोबाईल फोन, लॅपटॉप, टॅबलेट, हार्ड डिस्क आणि इतर डिजिटल उपकरणे जप्त करण्यात आली. या उपकरणांमधील माहितीची तांत्रिक तपासणी करण्यात आली असून सविस्तर फॉरेन्सिक अहवाल प्राप्त होणे बाकी आहे. या अहवालातील निष्कर्ष प्रकरणाच्या सुनावणीत महत्त्वाचे ठरणार असल्याने तो मिळाल्यानंतर पुरवणी आरोपपत्राद्वारे न्यायालयासमोर सादर करण्यात येणार आहे. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन अमरावती ग्रामीण पोलिसांनी सहाय्यक पोलिस अधीक्षक शुभमकुमार यांच्या नेतृत्वाखाली विशेष तपास पथकाची स्थापना केली होती. या पथकामध्ये १० अधिकारी आणि ३६ पोलिस कर्मचाऱ्यांचा समावेश होता. डिजिटल पुरावे, साक्षीदारांचे जबाब आणि इतर दस्तऐवजी पुराव्यांच्या आधारे तपास पूर्ण करण्यात आला. या प्रकरणातील आठ आरोपींपैकी मानव सुगंधे याला न्यायालयाकडून जामीन मंजूर झाला असून उर्वरित सात आरोपी सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत. अमरावती ग्रामीणचे पोलिस अधीक्षक निकेतन कदम यांनी दाखल करण्यात आलेले आरोपपत्र ठोस आणि उपलब्ध पुराव्यांच्या आधारे तयार करण्यात आल्याचा दावा केला आहे. फॉरेन्सिक अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यातील महत्त्वाचे निष्कर्षही न्यायालयासमोर मांडले जातील, असे त्यांनी स्पष्ट केले. एप्रिल महिन्यात समोर आलेल्या या प्रकरणाने अचलपूर-परतवाडा परिसरात मोठी खळबळ उडवून दिली होती. आता आरोपपत्र दाखल झाल्याने न्यायालयीन प्रक्रियेला गती मिळणार असून पुढील सुनावणी आणि फॉरेन्सिक अहवालाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## गोळीबार प्रकरणात पोलिसांची

उभे असताना ४ ते ६ मोटारसायकलींवरून १६ ते १८ जणांचा सशस्त्र गट तेथे आला.

मुख्य आरोपी सय्यद तौसिफ याने फिर्यादीवर देशी कट्ट्यातून गोळी झाडली. मात्र, फिर्यादी खाली वाकल्याने तो थोडक्यात बचावला. त्यानंतर आरोपी रहेमतुल्ला याने चाकूने पाठीवर वार केला. इतर आरोपींनी तलवारी व धारदार शस्त्रांच्या सहाय्याने फिर्यादीचा भाऊ आणि मित्रावरही जीवघेणा हल्ला करण्याचा प्रयत्न

## सुतगिरणी गेटजवळ वृद्धाचा खून,

संकलित केली. मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे उद्देश उर्फ चिकू संजय खरड (वय २६, रा. मायानगर, अमरावती) याला ताब्यात घेऊन चौकशी करण्यात आली.चौकशीदरम्यान त्याने गुन्ह्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. या खूनप्रकरणात आणखी दोन आरोपी सहभागी असल्याची माहिती समोर आली असून त्यांचा शोध सुरू आहे. पुढील तपास राजापेठ पोलीस करीत आहेत.

## स्क्वेअर कॅफेमध्ये धाड, प्रेमी

पोलिसांच्या स्वाधीन केले. पोलीस आयुक्त राकेश ओला, उपायुक्त रमेश धुमाळ यांच्या मार्गदर्शनात भरोसा सेल निरीक्षक ज्योती विल्हेकर, सहायक निरीक्षक मेधाली गावंडे ,राजेश यादव, गजानन मातंगे, दामिनी पथक कांचन, विना यांनी कारवाई मध्ये सहभाग घेतला. आयुक्तालय परिक्षेत्रात महिला, युवती व बालकांसोबत छेडछाड करणाऱ्यांसाठी हेल्पलाइन नंबर जारी करण्यात आलेले आहेत. कोणासोबतही छेडछाड होत असेल तर हेल्पलाइन नंबर ११२,१०९१,१०९८ वर संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## आसिफ काल्या हल्ला प्रकरणात

दोन फरार आरोपींचा युद्ध स्तरावर शोध सुरू आहे.

## उपसंचालक कार्यालयावर

संस्थेच्या अस्तित्वावर संकट ओढले आहे. शासन ऑनलाईन बॅच स्वीकृती साठी जुन्या नियमांना डावलून चुकीचे नियम लागू करण्याची तयारी करत आहे. शिक्षक संघटनेच्या वतीने याचा विरोध करण्यात येत आहे. यामुळे शिक्षकांच्या नोकरीवर पण परिणाम होणार आहे. शासनाच्या चुकीच्या धोरणाचा संघटनेने विरोध केला आहे. या निर्णयाने ग्रामीण भागातील महाविद्यालय बंद होणाच्या मार्गावर आहे. ग्रामीण भागाच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर याचे परिणाम होणार आहे.नवीन नियम लवकरात लवकर रद्द करण्याच्या मागणीसाठी शासनाला जागवण्याचे प्रयत्न शिक्षकांनी आंदोलनाच्या माध्यमातून केले. आंदोलन करणाऱ्यांमध्ये डॉ.अविनाश बोंडे, प्रा. अरविंद मांगले, प्रा.रमेश खांडे, प्रा रविंद्र कावरे, प्रा.विनय काळे, प्रा.रंगराव लांजेवार, प्रा.डी.एस.राठोड, प्रा अनिल काळे, प्रा संतोष वाघ, प्रा. मंगेश कांडलकर, प्रा डॉ. आनंद देशमुख, प्रा साहेबराव जुमले, प्रा प्रदीप शेवतकर यांच्यासह मोठ्या संख्येने शिक्षक सहभागी झाले होते.

## धामोरी येथे गुटख्याचा साठा

आला. या प्रकरणी खोलापूर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ११०/२०२६ नुसार अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ चे कलम ५९ तसेच भारतीय न्याय संहिता कलम १२३, २२३, २७४ आणि २७५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सतीश कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत खोलापूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अनुप वाकडे, पोलीस उपनिरीक्षक चंद्रशेखर गावंडे, हेड कॉन्स्टेबल शैलेश घुरडे, दीपक उईके आणि पोलीस कॉन्स्टेबल निखिल आमझरे यांनी सहभाग घेतला.

---

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती**
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

### चौकशीची जाहीर नोटीस

**फेरफार अर्ज क्रमांक - 244/26 कलम -22**
**सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक -** जिवक सांस्कृतिक व सामाजिक प्रबोधन संस्था जुना धामणगांव, ता.धामणगांव रेल्वे जि.अमरावती एफ 17389
**अर्जदार -** सुधिर रामदास नगराळे
**गैरअर्जदार -** १) महादेव मारोती खोब्रागडे

या जाहीर नोटीसव्दारे कळविण्यात येते की, मा.सहायक धर्मादाय आयुक्त-३, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल अर्जासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ अन्वये चौकशी करणार आहे.

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये आपणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा दयायचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीच्या आत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पूर्ण केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक २२.०६.२०२६ रोजी दिली.

शिक्का
**अधीक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती**

---

### जाहीर नोटीस

**विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि. अमरावती**
**आर.एम.जे.सी.क्र.२९४/२०२६** **ने.ता.१६.०७.२०२६**

**अर्जदार :**
१. **सक्षम गजानन बोरवार,** वय २० वर्षे, व्यवसाय- शिक्षण
२. **मनिषा गजानन बोरवार,** वय १८ वर्षे, व्यवसाय- शिक्षण
दोन्ही अर्जदार रा.ब्राम्हणवाडा थडी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार वरील ठिकाणी राहतात.**मृतक बक्कुबाई किसनराव बोरवार** हिंचा **मृत्यू दिनांक २५/०६/२०२५** रोजी रा.ब्राम्हणवाडा,ता.चांदूर बाजार,जि.अमरावती येथे झालेला आहे.तसेच **मृतक गजानन किसनराव बोरवार** यांचा **मृत्यू दिनांक १०/०८/२०२४** रोजी तसेच **मृतक प्रतीभा गजानन बोरवार** हिंचा मृत्यू **दिनांक १६/०३/२०११** रोजी रा.ब्राम्हणवाडा,ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झालेला आहे.यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

अर्जदार मय्यतांचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरीता आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.२९४/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.१९.०६.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, चांदूर बाजार**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज क्र.१०६४/२०२६**
**नसीम बानो व चार वि. निरंक**
**पुढील ता.२४.०७.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Nasim Bano Abdul Wahid, Aged 50 Yrs. Occu.: Housewife R/o. Aman Colony, Old Town, Badnera, Tq. & Dist. Amravati
2. Farheen Naz Rizwan Ahmad, Aged about 30 Yrs. Occu.: Housewife R/o. Haidar Pura, Amravati, Tq. & Dist. Amravati
3. Rohina Naaz Abdul Waheed, Aged 26 Yrs. Occu.: Housewife
4. Abdul Naved Abdul Waheed, Aged 24 Yrs. Occu.: Labour
5. Abdul Nawaz Abdul Waheed, Aged 27 Yrs. Occu.: Nil Applicant No.3 to 5, R/o. Aman Colony, Old Town, Badnera, Tq. & Dist. Amravati.

-- विरुध्द --

निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत** Abdul Waheed Abdul Rafique हे दि.३०.१०.२०२५ **रोजी बडनेरा अमरावती येथे मयत झाले.** अर्जदार **Nasim Bano Abdul Wahid + 4** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा -**Nasim Bano Abdul Wahid + 4** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१२.०६.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,अमरावती

---

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती**
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

### चौकशीची जाहीर नोटीस

**फेरफार अर्ज क्रमांक -** 307/22/2026
**सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक -** सुमित्राबाई शिक्षण संस्था, अमरावती ता.जि.अमरावती एफ - 7416
**अर्जदार -** श्री सचिन नथ्थुजी गवई
**गैरअर्जदार -** १) श्रीमती अनुपमा मारोतराव वानखडे
२) श्रीमती शालीनी विजय शेंडे

या जाहीर नोटीसव्दारे कळविण्यात येते की, मा.सहायक धर्मादाय आयुक्त-१, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अर्जासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ अन्वये चौकशी करणार आहे.

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये आपणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा दयायचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीच्या आत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पूर्ण केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०१, अमरावती यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक १९.०६.२०२६ रोजी दिली.

शिक्का
**अधीक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती**

---

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती**
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

### चौकशीची जाहीर नोटीस

**फेरफार अर्ज क्रमांक -** 161/22/2026
**सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक -** ग्रामोध्दार बहुउददेशिय स्वयंसेवी संस्था, अमरावती ता. जि. अमरावती एफ - 4397
**अर्जदार -** श्री यश धम्मदिप गवई
**गैरअर्जदार -**
१) श्री चंद्रकांत विश्वासराव तायडे
२) श्री मधुकर मारोतराव गजभिये
३) श्री शंकर भगवानजी रोडगे
४) श्री पंडित गिरीधरराव डफाळे
५) श्री अतुल पंजाबराव दिघाडे
६) श्री नितिन हरिभाऊ तरुडकर

या जाहीर नोटीसव्दारे कळविण्यात येते की, मा.सहायक धर्मादाय आयुक्त-१, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अर्जासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ अन्वये चौकशी करणार आहे.

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये आपणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा दयायचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीच्या आत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पूर्ण केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०१, अमरावती यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक २३.०६.२०२६ रोजी दिली.

शिक्का
**अधीक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती**

---

### जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि. अमरावती**
**आर.एम.जे.सी.क्र.२८७/२०२६** **ने.ता.१३.०८.२०२६**

**अर्जदार :**
१. **कमला अशोकराव कोसे,** वय ५४ वर्षे, व्यवसाय- घरकाम
२. **मनिष अशोकराव कोसे,** वय ३२ वर्षे, व्यवसाय- शेती
३. **शुभम अशोकराव कोसे,** वय २५ वर्षे, व्यवसाय- शेती
तिन्ही रा.ब्राम्हणवाडा थडी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
४. **अंकिता निलेश धोटे,** वय २७ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.नबापुर, ता.भैसदेही, जि.बैतुल, मध्यप्रदेश

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार वरील ठिकाणी राहतात.**मृतक अशोक देवरावजी कोसे** यांचा मृत्यू दिनांक १३/०१/२०२६ रोजी रा.आजारपणामुळे, लामखाडे हॉस्पिटल, अचलपूर, ता.अचलपूर, जि.अमरावती येथे झालेला असून ते कायमचे रा.ब्राम्हणवाडा थडी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथील रहिवासी होते.

यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

अर्जदार मय्यतांचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरीता आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.२८७/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.२२.०६.२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, चांदूर बाजार**

---

### जाहीर नोटीस

**विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि. अमरावती**
**आर.एम.जे.सी.क्र.३००/२०२६** **ने.ता.२९.०७.२०२६**

**अर्जदार :**
१. **वैशाली अशोक मदने,** वय ४२ वर्षे, व्यवसाय- घरकाम
२. **ईश्वरी अशोकराव मदने,** वय १९ वर्षे, व्यवसाय- शिक्षण
३. **कृष्णा अशोक मदने,** वय १२ वर्षे, व्यवसाय- शिक्षण
अर्जदार क्र.३ अज्ञान, अ.पा.क. आई अर्जदार क्र.१
सर्व रा.हनुमान मंदिर जवळ ब्राम्हणवाडा थडी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार वरील ठिकाणी राहतात.**मृतक अशोक बळीरामजी मदने** यांचा मृत्यू दिनांक १८/०५/२०२६ रोजी रा.ब्राम्हणवाडा,ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झालेला आहे.यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

अर्जदार मय्यतांचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरीता आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.३००/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.२२.०६.२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, चांदूर बाजार**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ९ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१११९/२०२६
**श्रीमती मंगला अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.३०.०७.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Mangala Satishrao Tayade, Age 56 Yrs. Occu.: Household R/o Mahendra Colony, VMV Amravati.
2. Shubham Satish Tayade, Age 32 Yrs. Occu.: Pvt.Job R/o Mahendra Colony, VMV Amravati.
3. Aditi Satish Tayade, Age 30 Yrs. Occu.: Household R/o Near Khandare Kirana Shop Bajrang Nagar, Amravati.
4. Gopal Satishrao Tayade, Age 29 Yrs. Occu.: Pvt.Job R/o Mahendra Colony, VMV Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **श्री.सतीश नारायण तायडे** हे दिनांक 13.11.2024 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **मंगला अधिक तीन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **मंगला अधिक तीन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१८.०६.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ गुरुवार, २५ जून २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# महिंद्रा मॅक्सचा टायर फुटून भीषण अपघात

## एक ठार, १४ जखमी, तिघांची प्रकृती चिंताजनक

■ प्रतिनिधी | रिसोड ■

रिसोड–मालेगाव मार्गावरील बिबखेडा गावाजवळ बुधवारी (दि. २४ जून) सकाळी सुमारे ९.४५ वाजता प्रवासी वाहतूक करणाऱ्या महिंद्रा मॅक्स वाहनाचा टायर अचानक फुटल्याने भीषण अपघात झाला. टायर फुटल्यानंतर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि वाहनाने तब्बल चार पलट्या घेतल्या. या दुर्घटनेत एका प्रवाशाचा जागीच मृत्यू झाला असून १४ जण जखमी झाले आहेत. जखमींपैकी तिघांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती मिळाली आहे.

मृत व्यक्तीचे नाव संतोष नारायण गवळी (वय ३६, रा. नावली, ता. रिसोड, जि. वाशिम) असे आहे. अपघातावेळी ते पत्नी आरती आणि पाच वर्षीय मुलगा गणेश यांच्यासह रिसोडकडे येत होते. रिसोडपासून अवघ्या चार किलोमीटर अंतरावर हा अपघात घडला. पतीचा मृत्यू डोळ्यासमोर होताना पाहून पत्नी आरती गवळी यांनी मुलाला कवटाळून केलेला आक्रोश पाहून घटनास्थळी



उपस्थितांचे डोळे पाणावले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एमएच-२६ एस-१८४१ क्रमांकाची महिंद्रा मॅक्स गाडी डोणगाव येथून ग्रामीण भागातील प्रवासी घेऊन रिसोडकडे येत होती. बिबखेडा गावाजवळ वाहनाचा टायर फुटल्याने चालकाचे नियंत्रण सुटले आणि वाहन रस्त्यावर अनेक पलट्या घेत उलटले.

अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तातडीने मदतकार्य सुरू करून जखमींना वाहनातून बाहेर काढले. त्यानंतर त्यांना उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच पोलीस व आपत्कालीन यंत्रणा घटनास्थळी दाखल झाली. वाहन चालकाला पोलिसांनी ताब्यात घेतले असून पुढील तपास सुरू आहे.

ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचारानंतर काही जखमींना पुढील उपचारासाठी वाशिम येथे हलविण्यात आले आहे. जखमींमध्ये सहा महिलांसह एका पाच वर्षीय बालकाचाही समावेश आहे.

दरम्यान, हा अपघात अवैध प्रवासी वाहतुकीमुळे झाल्याची चर्चा परिसरात सुरू असून, ग्रामीण भागात भंगार व जीर्ण अवस्थेतील वाहने प्रवासी वाहतुकीसाठी वापरली जात असल्याबाबत नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. अशा वाहनांवर पोलीस प्रशासन व प्रादेशिक परिवहन विभागाने (आरटीओ) कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

जखमींची नावे परमेश्वर बबन शिंदे (५०, नावली), लता दीपक खरात (४२, नावली), शोभा परमेश्वर कोरडे (३५, मांगुळझानक), सतीश जगन्नाथ भिसे (३८, अंचळ), देविदास यादव खंडारे (५२, नेतंसा), कृष्णा रामेश्वर कोरडे (१६, मांगुळझानक), गणेश संतोष गवळी (५, नावली), आरती संतोष गवळी (२७, नावली), गोदावरी शामराव मोरे (७२, मांगवाडी), लताबाई दत्तराव रायवाडे (५०, पळशी, ता. सेनगाव, जि. हिंगोली), दीपक रामभाऊ खरात (४५, नावली), पंकज भास्कर खरात (२७, नावली), शारदा बळीराम वाघ (५५, गोवर्धन) व बळीराम पंढरीनाथ वाघ (५९, गोवर्धन) यांच्यावर उपचार सुरू आहेत.

जखमींपैकी काहींना वाशिम येथे तर काहींना खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून तिघांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती वैद्यकीय सूत्रांनी दिली. या दुर्घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.


# वनोजा येथे वादळी पाऊस; सोलर, विद्युत खांब व पपई बागेचे मोठे नुकसान

■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

मंगरुळपीर तालुक्यातील वनोजा येथे मंगळवारी सायंकाळी झालेल्या वादळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. जोरदार वाऱ्यामुळे सुरेश गावंडे यांच्या शेतातील महावितरणचे विद्युत खांब तुटून पडले, तर मनर्कना नामदेव गावंडे यांच्या शेतातील सोलर पॅनलचेही मोठे नुकसान झाले आहे. सोलर फाउंडेशनसह उखडून पडल्याने त्यांना मोठा आर्थिक फटका बसला आहे. या नुकसानीमुळे भविष्यातील सिंचनाचाही प्रश्न निर्माण झाला असून, संबंधित विभागाने पंचनामे करून नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

मंगळवारी दुपारी साडेचार वाजताच्या सुमारास विजांच्या कडकडाटासह वादळी पाऊसाने परिसराला अक्षरशः झोडपून काढले. या नैसर्गिक आपत्तीचा मोठा फटका वनोजा (भाग-२) येथील शेतकरी महादेव गोविंदा कांबळे यांनाही बसला. त्यांच्या





अडीच एकर क्षेत्रातील सुमारे २,५०० पपईची झाडे गारपिटीमुळे भुईसपाट झाली. कांबळे यांनी मोठा खर्च करून पपईची लागवड केली होती. मात्र मंगळवारी आलेल्या वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे संपूर्ण बाग उद्ध्वस्त केली. त्यामुळे उभ्या पिकासह मोठे आर्थिक नुकसान झाल्याने ते अडचणीत सापडले असून, शासनाने पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी महादेव कांबळे यांनी केली आहे. दरम्यान, तालुक्यात दुसऱ्या दिवशीही जोरदार पावसाने हजेरी लावल्याने शेतकऱ्यांना काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे. सलग पडत असलेल्या पावसामुळे शेतात पुरेसा ओलावा निर्माण झाला असून खरीप हंगामातील पेरणीच्या कामांना गती मिळण्याची आहे. विशेषतः संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना या पावसाचा फायदा होणार असल्याने समाधान व्यक्त केले जात आहे. तसेच वातावरणात गारवा निर्माण झाल्याने उकाड्यापासूनही नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

# गणेशपूर येथे नैसर्गिक शेती अभियानांतर्गत शेतकरी प्रशिक्षण संपन्न



■ प्रतिनिधी | वाशिम ■

कृषी विज्ञान केंद्र, वाशीम आणि कृषी विभाग, कारंजा यांच्या संयुक्त विद्यमाने 'नैसर्गिक शेती अभियान' अंतर्गत एकदिवसीय शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम दि. १७ जून रोजी कारंजा तालुक्यातील गणेशपूर येथे आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मंडळ कृषी अधिकारी गणेश जयताडे तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून कृषी विज्ञान केंद्राचे डॉ. डिगंबर इंगोले उपस्थित होते. या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये नैसर्गिक शेतीच्या तत्त्वांवर आधारित शाश्वत कृषी व्यवस्थापन, मृदा आरोग्य संवर्धन, रासायनिक निविष्ठांवरील अवलंबित्व कमी करणे तसेच स्थानिक उपलब्ध संसाधनांचा प्रभावी वापर याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी डॉ. डी. एन. इंगोले यांनी नैसर्गिक शेतीतील विविध तांत्रिक बाबी, जीवामृत, घनजीवामृत, बीजामृत, आच्छादन (मल्चिंग), वाफसा तंत्रज्ञान, जैविक कीड व रोग व्यवस्थापन तसेच नैसर्गिक निविष्ठांच्या वैज्ञानिक वापराबाबत सखोल माहिती दिली.

# जिल्हास्तरीय रोजगार मेळावा उत्साहात संपन्न

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, वाशिम यांच्या वतीने २२ जून रोजी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, वाशिम येथे आयोजित जिल्हास्तरीय रोजगार मेळाव्यास युवक-युवतींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या मेळाव्यात एकूण ७६ उमेदवारांनी सहभाग नोंदवून विविध पदांसाठी मुलाखती दिल्या. त्यापैकी २८ उमेदवारांची अंतिम निवड तर १० उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आल्याने अनेक युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे.

या रोजगार मेळाव्यात ईस्ट सन इलेक्ट्रॉनिक्स इंडिया एल.एल.पी. आणि जिनिस पॉवर या नामांकित कंपन्यांनी सहभाग घेतला. ईस्ट सन इलेक्ट्रॉनिक्स इंडिया एल.एल.पी. कंपनीमार्फत

## युवक–युवतींचा उत्स्फूर्त प्रतिसाद

२८ उमेदवारांची अंतिम निवड करण्यात आली असून त्यामध्ये अल्पकालीन रोजगार प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत प्रशिक्षण घेतलेल्या ८ उमेदवारांचा समावेश आहे. तसेच जिनिस पॉवर कंपनीमार्फत १० उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली.

मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त प्रवीण वा. खंडारे होते. प्रमुख उपस्थिती म्हणून शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य श्री. नाईकनवरे उपस्थित होते. यावेळी आयएमसी सदस्य विनोद रावळे, मनुष्यबळ व्यवस्थापक नितीन कोळी, वरिष्ठ लिपिक प्रदीप नेमाडे तसेच समन्वयक अमोल काळे यांची उपस्थिती लाभली.

मेळाव्यादरम्यान सहायक आयुक्त प्रवीण खंडारे यांनी उपस्थित प्रशिक्षणार्थी व उमेदवारांना अल्पकालीन रोजगार प्रशिक्षण कार्यक्रम, कौशल्याधारित प्रशिक्षण उपक्रम तसेच जर्मनीमधील रोजगाराच्या संधी, आवश्यक कौशल्ये, परदेशी रोजगारासाठीची प्रक्रिया आणि शासनाच्या विविध कौशल्य विकास योजनांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. कौशल्य विकासाच्या बळावर देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर उपलब्ध होत असलेल्या रोजगाराच्या संधींचा लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी केले. या रोजगार मेळाव्यामुळे युवकांना विविध कंपन्यांच्या प्रतिनिधींशी थेट संवाद साधण्याची, रोजगाराच्या उपलब्ध संधींची माहिती जाणून घेण्याची तसेच कारकीर्दविषयक मार्गदर्शन मिळविण्याची संधी उपलब्ध झाली. सहभागी उमेदवारांनी या उपक्रमाचे स्वागत करत भविष्यातही अशा रोजगाराभिमुख मेळाव्यांचे आयोजन सातत्याने व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रामार्फत युवकांना रोजगाराच्या मुख्य प्रवाहाशी जोडण्यासाठी सातत्याने विविध उपक्रम राबविण्यात येत असून, भविष्यातही अशा रोजगार मेळाव्यांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गावंडे यांनी केले, तर आभार गोपाल चोपडे, जिल्हा कौशल्य विकास सहाय्यक, वाशिम यांनी मानले.

# दर्जेदार आरोग्य सेवा देण्यासाठी प्रयत्न करा - डॉ. वैष्णवी खासबाग



■ प्रतिनिधी | मालेगाव ■

शहर आणि परिसरातील गोरगरीब लोकांना दर्जेदार आरोग्य सेवा पुरविण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करा तसेच आरोग्य वर्धिनी केंद्रा मार्फत कोणत्या सुविधा मिळतात याची सखोल माहिती देवून, येथील माहिती जास्तीत जास्त लोकांपर्यंत गेली पाहिजे यासाठी प्रयत्न करा, असे आवाहन गाडगे बाबा नगर मधील आरोग्य वर्धिनी केंद्रात आयोजित आशा, आरोग्य सेवक व स्थानिक सदस्य यांच्याशी बोलताना तालुका आरोग्य अधिकारी डॉ. वैष्णवी खासबागे यांनी सांगितले आहे. येथील गाडगे बाबा नगर मध्ये, आरोग्य वर्धिनी केंद्रात ता. १७ रोजी दुपारी १२ वा प्रमुख मार्गदर्शक म्हणून तालुका आरोग्य अधिकारी डॉ. वैष्णवी खासबागे, नगर सेवक संजराव बळी, केंद्रातील आरोग्य अधिकारी डॉ, मनिष बोरकर, डॉ. रेणुका कापुरे, जेष्ठ नागरिक प्रा. पी. एस. खिराडे, पत्रकार भास्करराव गुडदे प्रमुख म्हणून उपस्थित होते. यावेळी डॉ वैष्णवी खासबागे यांनी या केंद्रा मार्फत कोणत्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात याची माहिती दिली. केंद्रा मार्फत आरोग्य सुविधा गरजू लोकांपर्यंत पोहोचल्या पाहिजेत यासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

# संत झोलेबाबा पालखीचे ३ जुलै रोजी पंढरपूरकडे प्रस्थान

■ प्रतिनिधी | शेलूबाजार ■

आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त श्री क्षेत्र चिखली येथील संत झोलेबाबा यांची पायदळ पालखी ३ जुलै रोजी पंढरपूरकडे प्रस्थान करणार असून, २२ जुलै रोजी पंढरपूर येथे दाखल होणार आहे. यंदाचे हे पालखी सोहळ्याचे सलग १२ वे वर्ष असून, वारकरी संप्रदायात या वारीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

३ जुलै रोजी सकाळी संत झोलेबाबा पालखीचे विधिवत पूजन व आरती करून पालखी मार्गस्थ करण्यात येणार आहे. या पालखी सोहळ्यात महिला व पुरुष वारकरी मोठ्या संख्येने सहभागी होणार असून, विठ्ठल नामाच्या गजरात व भक्तिमय वातावरणात वारीचा प्रवास सुरू होईल.


पालखीचा पहिला मुक्काम ३ जुलै रोजी कोंडाळा येथे राहणार



असून, गोगरी फाटा, पिंप्री अवगत, दूधखेडा व सोयता मार्गे पालखी तेथे पोहोचेल. ४ जुलै रोजी तांदळी फाटा, पांडू मुंब्रा व मालेगाव मार्गे पालखी वाशिम येथील विठ्ठल मार्केटमध्ये मुक्कामी राहील. त्यानंतर ५ जुलै रोजी राजगाव, कनेरगाव नाका व देवठाणा मार्गे माळहिवरा येथे मुक्काम होईल.

पुढील प्रवासात ६ जुलै रोजी हिवरा जाट, ७ जुलै रोजी बाराशिव हनुमान मंदिर, ८ जुलै रोजी झिरो फाटा, ९ जुलै रोजी कारेगाव, १० जुलै रोजी दैठाणा, ११ जुलै रोजी गंगाखेड, १२ जुलै रोजी उखळगाव, १३ जुलै रोजी रामटेकडी (रामरक्षा गोरक्षण, कोठारी), १४ जुलै रोजी पळसखेडा, १५ जुलै रोजी वडगाव राम-इसुफ सुकळी फाटा, १६ जुलै रोजी परतापूर, १७ जुलै रोजी शिराळे, १८ जुलै रोजी बार्शी, १९ जुलै रोजी रिधोरा, २० जुलै रोजी उपराई आणि २१ जुलै रोजी रोपळे येथे पालखीचे मुक्काम राहणार आहेत. यानंतर २२ जुलै रोजी संत झोलेबाबा पालखी पंढरपूर येथे श्री मोरे माऊली मठ, म्हसोबा मंदिर समोर, पंढरपूर-शेगाव दुमाला परिसरात पोहोचणार आहे. या वारीत सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, विठ्ठल भक्तीचा अखंड गजर करत हजारो पावले पंढरीच्या दिशेने मार्गक्रमण करणार आहेत.

# तक्षशिला आयुर्वेद हॉस्पिटलतर्फे मोफत आरोग्य शिबिर; नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



■ प्रतिनिधी | कारंजा ■

तक्षशिला आयुर्वेद कॉलेज, हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, खेर्डा यांच्या वतीने पंचकर्म, शल्य, त्वचाविकार व सुवर्ण प्राशन विभागाच्या संयुक्त विद्यमाने भव्य मोफत आरोग्य तपासणी व उपचार शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या शिबिरास परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. संस्थेच्या अध्यक्षा आदरणीय किर्तीताई अर्जुन, संस्थेचे सचिव डॉ. कमलाकर पायस तसेच प्रशासकीय अधिकारी डॉ. सचिन पंडित यांच्या प्रेरणा व मार्गदर्शनाखाली या आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरामध्ये पंचकर्म, शल्य, त्वचाविकार, सुवर्ण प्राशन, सर्वसाधारण आरोग्य तपासणी, रक्तदाब व मधुमेह तपासणी आदी सेवा नागरिकांना मोफत उपलब्ध करून देण्यात आल्या. यावेळी विविध आजारांवर आयुर्वेदिक सल्ला देण्यात आला तसेच गरजू रुग्णांना मोफत औषधांचे वितरण करण्यात आले.

# लोककल्याण मेळाव्यात फेरीवाल्यांना कर्ज मंजुरीची संधी

## ३० जून रोजी नगर परिषद सभागृहात आयोजन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

नगर परिषद, वाशिम यांच्या वतीने शहरातील पात्र व इच्छुक फेरीवाल्यांसाठी लोककल्याण मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून, या मेळाव्यात पीएम स्वनिधी योजनेअंतर्गत कर्ज मंजुरीसह विविध शासकीय योजनांचा लाभ उपलब्ध करून देण्यात येणार आहे. हा मेळावा ३० जून २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता नगर परिषद सभागृह, वाशिम येथे होणार आहे.

मेळाव्यात पीएम स्वनिधी (PM SVANidhi) योजनेअंतर्गत लाभार्थ्यांचे कर्ज अर्ज जागेवरच भरून घेणे, अर्जांची तत्काळ पडताळणी करणे तसेच बँकांमार्फत पहिला, दुसरा व तिसरा कर्ज हप्ता मंजूर करण्याची प्रक्रिया



गतिमान करण्यात येणार आहे. त्यामुळे फेरीवाल्यांना आर्थिक बळकटी मिळण्यास मदत होणार आहे. याशिवाय आरोग्य तपासणी, आयुष्मान भारत कार्ड नोंदणी, कामगार नोंदणी, पुरवठा विभागाशी संबंधित सेवा तसेच शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती व मार्गदर्शन नागरिकांना उपलब्ध करून दिले जाणार आहे. विविध कर्ज योजना, विमा योजना आणि सामाजिक सुरक्षा योजनांबाबतही लाभार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

मेळाव्याचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांनी आधार कार्ड, पॅन कार्ड (असल्यास), बँक पासबुक, मोबाईल क्रमांक, फेरीवाला ओळखपत्र अथवा व्यवसाय प्रमाणपत्र (असल्यास), पासपोर्ट आकाराचे छायाचित्र तसेच इतर आवश्यक कागदपत्रे सोबत आणावीत.

पीएम स्वनिधी योजनेसाठी ऑनलाइन अर्ज व नगरसेवकांचे शिफारस प्रमाणपत्र (LoR) सादर करणे आवश्यक राहणार आहे. नगर परिषद क्षेत्रातील सर्व पात्र व इच्छुक फेरीवाल्यांनी या मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहून शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन मुख्याधिकारी, नगर परिषद, वाशिम यांनी केले आहे.

# कृषी निर्यात क्षेत्राला नवी दिशा

■ प्रतिनिधी | वाशिम ■

कृषी उत्पादनांना जागतिक बाजारपेठ उपलब्ध करून देणे, निर्यातक्षम कृषी मूल्यसाखळी विकसित करणे तसेच शेतकरी उत्पादक कंपन्या (FPO/FPC), महिला उद्योजिका, स्टार्टअप्स आणि निर्यातदारांना निर्यात क्षेत्रातील विविध संधींबाबत मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने भारतीय कृषी व प्रक्रिया अन्नपदार्थ निर्यात विकास प्राधिकरण (APEDA), प्रादेशिक कार्यालय मुंबई आणि कृषी विज्ञान केंद्र, वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने 'APEDA निर्यात प्रोत्साहन योजना व कृषी निर्यात मार्गदर्शन कार्यक्रम' दि. २२ जून रोजी आभासी पद्धतीने यशस्वीरित्या आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमात पांडुरंग ए. बामणे (व्यवस्थापक, APEDA, मुंबई), आयुष अग्रवाल (ECGC), डॉ. आर. एल. काळे (वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख, कृषी विज्ञान केंद्र, वाशिम) तसेच बाळासाहेब पाटील (भुदरगड नॅचरल फार्मर प्रोड्युसर कंपनी, पुरंदर, पुणे) यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून सहभाग नोंदविला. कार्यक्रमामध्ये आदित्य साठे (Polygon Fresh), विजय चव्हाण (Siddhesh Ash Company) तसेच राजश्री करांडे (Visttar Global Export) या निर्यात क्षेत्रातील तज्ज्ञांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. आर. एल. काळे यांनी केले. आपल्या प्रास्ताविकात त्यांनी वाशिम जिल्ह्यातील शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या माध्यमातून राबविण्यात येत असलेल्या कृषी व्यवसाय विकास उपक्रमांची माहिती दिली.

# झेंडा सरळ करताना काळाचा घाला; विजेच्या धक्क्याने तरुणाचा मृत्यू, आई गंभीर

■ प्रतिनिधी | रिसोड ■

*तालुक्यातील केनवड येथे मंगळवार, दि. २३ जून रोजी सायंकाळच्या सुमारास अत्यंत हृदयद्रावक घटना घडली. घरावरील झेंडा व्यवस्थित करत असताना लोखंडी पाईपचा ११ केव्ही वीजवाहिनीशी संपर्क आल्याने संकेत संतोष खराटे (वय २०) या युवकाचा जागीच मृत्यू झाला. तर त्याला वाचविण्यासाठी धाव घेतलेल्या त्याच्या आई सुलोचना संतोष खराटे यांनाही विजेचा धक्का बसून गंभीर दुखापत झाली असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.*

प्राप्त माहितीनुसार, मंगळवारी सायंकाळी परिसरात आभाळ दाटून आले होते. घराच्या छतावर डाळी वाळविण्यासाठी टाकण्यात आल्या असल्याने त्या सुरक्षित ठिकाणी ठेवण्यासाठी आई व संकेत घरावर गेले होते. त्यावेळी घरावर लावलेला झेंडा वाकल्याचे त्याच्या निदर्शनास आले असावे. झेंडा नीट करण्याच्या प्रयत्नात असताना झेंड्याला लावलेला लोखंडी पाईप अचानक जवळून गेलेल्या ११ केव्ही वीजवाहिनीच्या संपर्कात आला. त्यामुळे संकेतला जोरदार विजेचा धक्का बसला.



घटनेचे गांभीर्य लक्षात येताच त्याची आई सुलोचना खराटे यांनी मुलाला वाचविण्यासाठी धाव घेतली. मात्र त्यांनाही विजेचा धक्का बसल्याने त्या गंभीर जखमी झाल्या. या दुर्घटनेत संकेतचा जागीच मृत्यू झाला. घटनेनंतर परिसरातील नागरिकांनी तातडीने दोघांनाही उपचारासाठी वाशिम येथील रुग्णालयात हलविले. मात्र डॉक्टरांनी संकेतला मृत घोषित केले, तर सुलोचना खराटे यांच्यावर उपचार सुरू आहेत.

संकेत खराटे हा आपल्या आई-वडिलांचा एकुलता एक मुलगा होता. त्याच्या पश्चात आई-वडील आणि एक बहीण असा परिवार आहे. घरातील आधारवड असलेल्या तरुणाच्या अकाली निधनामुळे खराटे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. गावात सर्वांच्या सुख दुःखात सहभागी होणारे संतोष दादा त्यांचा लाडका संकेत अचानक काळाच्या पडद्याआड गेल्याने केनवड गावासह संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

या दुर्दैवी घटनेनंतर गावात शोककळा पसरली होती. संकेतच्या अंत्यविधीपर्यंत वातावरणही दुःखमय बनले होते. विशेष म्हणजे घटना घडल्यानंतरपासून ते अंत्यसंस्कार होईपर्यंत पावसाची संततधार सुरू होती. त्यामुळे निसर्गही या दुःखात सहभागी झाल्याची भावना अनेक ग्रामस्थांनी व्यक्त केली. २४जुन रोजी अत्यंत शोकाकुल वातावरणात स्मशानभूमीत अखेरचा निरोप देण्यात आला .

गावातील काही हॉटेल्स व व्यावसायिक प्रतिष्ठाने स्वयंस्फूर्तीने बंद ठेवून नागरिकांनी दिवंगत संकेतला श्रद्धांजली अर्पण केली. दरम्यान, ज्या ठिकाणी ही घटना घडली त्या परिसरातील घरांच्या अगदी जवळून उच्चदाब वीजवाहिन्या गेल्या आहेत. त्यामुळे भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी गावांतर्गत उघड्या वीजतारा हटवून त्याऐवजी सुरक्षित केबल टाकण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. महावितरण विभागाने या गंभीर बाबीकडे तातडीने लक्ष देऊन आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करीत आहेत.

जनमाध्यम
paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २०८ ■ गुरुवार, २५ जून २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

# पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्या पुढाकारातून वर्धा नगरपरिषदेच्या शाळा होताय 'सेंटर ऑफ एक्सलन्स'

## -नपच्या शाळेचे रुपडे पालटतेय, शैक्षणिक सुधारणा, उपक्रम

### ठिकठिकाणी डिजिटल वाचनालय व वातानुकूलित अभ्यासिका

**वर्धा जनमाध्यम :** खाजगी शाळांमधील शिक्षण अतिशय महागडे झाले आहे. सर्वसामान्य कुटुंबातील मुलांना या शाळांचे शिक्षण परवडण्यासारखे नाही. त्यामुळे सर्वसामान्य विद्यार्थ्यांना नगरपरिषदेच्या शाळांमध्ये कमी खर्चात गुणवत्तापुर्वक, दर्जेदार शिक्षण उपलब्ध व्हावे, यासाठी पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी पुढाकार घेतला आहे. या शाळांतील शैक्षणिक सुधारणांसाठी पालकमंत्र्यांनी ७ कोटी ७६ लाखाचा निधी उपलब्ध करून दिला. त्यामुळे नगर परिषदेच्या शाळांमध्ये आता ज्ञानाचा नवा प्रकाश पसरणार आहे.

नगर परिषदेमार्फत चालविल्या जाणाऱ्या शहरातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांना केवळ शालेय शिक्षणच नव्हे तर अभ्यासासाठी सोयीस्कर, आधुनिक आणि प्रेरणादायी वातावरण मिळावे, या उद्देशाने पालकमंत्री डॉ. भोयर यांच्या संकल्पनेतून विविध उपक्रम राबवले जात आहे. खाजगी शाळांमध्ये भरमसाठ रक्कम भरून विद्यार्थ्यांना जे शिक्षण उपलब्ध होते, त्या तोडीचे शिक्षण, शैक्षणिक सुविधा विद्यार्थ्यांना उपलब्ध व्हाव्यात, असा पालकमंत्र्यांचा प्रयत्न आहे. त्यासाठीच विविध योजनेतून भरघोस निधी उपलब्ध करून दिला आहे.

वैशिष्टपूर्ण योजनेतून वर्धा शहरातील रामनगर येथील चित्तरंजन दास प्राथमिक शाळेत डिजिटल लायब्ररी व स्पर्धा परीक्षा केंद्रासाठी १ कोटी ४९ लाख तर वातानुकुलीत अभ्यासिकेसाठी ४९ लाख ९६ हजाराचा निधी देण्यात आला. शिवाजी प्राथमिक शाळेत वातानुकूलीत अभ्यासिकेसाठी ४९ लाख ९८ हजार, वसंत प्राथमिक शाळा, विवेकानंद शाळेचे नुतनीकरण व आवश्यक शैक्षणिक सुविधेसाठी १ कोटी ५० लाख, कमला नेहरू शाळेत ई-वाचनालय व रीडिंग हॉल तयार करणे ९९ लाख ९८ हजार देण्यात आले.

नागरी दलितेत्तर योजनेतून शहरातील नगरपरिषदेच्या विविध शाळांमध्ये विविध विकास कामे १ कोटी ९९ लाख, स्वामी विवेकानंद शाळेत सुरक्षाभिंत बांधकाम व मैदान विकसित करणे ९ लाख ९० हजार, वसंत प्राथमिक शाळेत गेटचे काम व मैदान विकसित करणे ९ लाख २२ हजार इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेंतर्गत लाला लजपतराय शाळेभोवती संरक्षण भिंतीचे बांधकाम करण्यासाठी ५८ लाख ८९ हजाराचा निधी देण्यात आला आहे.



### क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले डिजिटल वाचनालय व अभ्यासिका

या विकासकामांचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे नगर परिषदेने सुरू केलेली क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले डिजिटल वाचनालय व अभ्यासिका होय. वाचनालय पुर्णपणे वातानुकूलित असून हायस्पीड वाय-फाय इंटरनेट, डिजिटल ई-बुक्स आणि ई-वाचनालय, विद्यार्थ्यांना शांतपणे अभ्यास करता यावा, यासाठी स्वतंत्र केबिन्स आणि प्रशस्त टेबलची उत्तम व्यवस्था करण्यात आली आहे.

### शालेय पायाभूत सुविधांचा कायापालट

पालकमंत्र्यांनी उपलब्ध करून दिलेल्या निधीतून होत असलेल्या शैक्षणिक विकास कामांमध्ये आधुनिक क्रीडांगण निर्मिती आणि सुरक्षेसाठी मजबूत सुरक्षाभिंत बांधली जात आहे. शाळेचे संपूर्ण विद्युतीकरण आणि अद्ययावत प्लंबिंगच्या कामांमुळे शाळा आता अधिक सोयीस्कर बनल्या आहेत. विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षेची आवड निर्माण करण्यासह त्यांना योग्य मार्गदर्शन मिळण्यासाठी स्वतंत्र परीक्षा केंद्रांची स्थापना केली जात आहे.

### खाजगी शाळांच्या तोडीच्या सुविधा देण्याचा प्रयत्न-डॉ.पंकज भोयर

नगर परिषदेच्या शाळा ही उद्याच्या पिढीची ज्ञानमंदिरे आहेत. विद्यार्थ्यांना खाजगी शाळांच्या तोडीच्या सुविधा सरकारी शाळेतच मिळाव्यात, यासाठी माझा प्रयत्न आहे. जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आलेला निधी वर्धेतील विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी मैलाचा दगड ठरेल. आमचे ध्येय केवळ साक्षरता वाढवणे नसून विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण देऊन त्यांना स्पर्धेत टिकवून ठेवणे हे आहे. 'क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले डिजिटल वाचनालय' हे याचेच एक पाऊल आहे. वर्धेतील शाळा आता 'मॉडेल शाळा' म्हणून ओळखल्या जातील आणि इतर शहरांसाठी प्रेरणादायी ठरतील, असे पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी सांगितले.

# पीक विमा कंपन्यांना विधानसभेत जाब; शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सुमित वानखेडे आक्रमक

## बळीराजाचा विश्वास गमावू नका'; सरकारला ठोस उपाययोजनांची मागणी

**मुंबई/ आर्वी जनमाध्यम :** कृषी विभागाच्या अनुदान मागण्यांवरील चर्चेदरम्यान आर्वीचे आमदार सुमित वानखेडे यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आक्रमक भूमिका घेत पीक विमा कंपन्या, प्रशासन आणि कृषी व्यवस्थेतील त्रुटींवर विधानसभेत थेट बोट ठेवले. विदर्भातील शेतकऱ्यांचे प्रश्न मांडताना त्यांनी सरकारला तातडीच्या उपाययोजनांची मागणी केली.

अल निनोच्या प्रभावामुळे निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीचा उल्लेख करत वानखेडे यांनी वर्धा जिल्ह्यासह विदर्भातील अनेक भागांतील संत्रा, मोसंबी व केळीच्या बागा उष्णतेमुळे करपल्याचे सांगितले. अनेक शेतकऱ्यांनी रोजगार हमी व विविध योजनांच्या माध्यमातून उभारलेल्या फळबागा काही दिवसांत उद्ध्वस्त झाल्या असून त्यांना तातडीची मदत देण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

पीक विमा योजनेतील सॅटेलाइट आधारित मूल्यमापन पद्धतीवर जोरदार टीका करताना वानखेडे म्हणाले, प्रत्यक्ष शेतातील नुकसान आणि सॅटेलाइटवरील आकडेवारी यामध्ये मोठी तफावत आहे. महसूल विभागाचे पंचनामे कमी उत्पादन दर्शवत असताना विमा



कंपन्या जास्त उत्पादन दाखवून शेतकऱ्यांचे दावे नाकारत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना मिळणारी नुकसानभरपाई अत्यल्प राहते, असा आरोप त्यांनी केला.

शेतकरी वर्षभर कष्ट करून विम्याचा हप्ता भरतो आणि नुकसान झाल्यावर त्याच्या हातात केवळ हजार-दोन हजार रुपये पडतात. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांचा व्यवस्थेवरील विश्वास कसा टिकणार असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. सरकारने पीक विमा योजनेतील अटींचा पुनर्विचार करून शेतकऱ्यांना न्याय मिळेल अशी व्यवस्था निर्माण करावी, अशी मागणीही त्यांनी केली.

चर्चेदरम्यान आमदारांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष होत असल्याची खंत व्यक्त करत त्यांनी लोकप्रतिनिधींच्या पत्रांना आणि मागण्यांना प्रशासनाने गांभीर्याने प्रतिसाद द्यावा, असे सांगितले. शेतकरी, जलसंधारण, कर्जमाफी आणि कृषी व्यवस्थेतील सुधारणांचे मुद्दे ठामपणे मांडत वानखेडे यांनी सभागृहाचे लक्ष वेधून घेतले. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आक्रमक भूमिका आणि आकडेवारीसह केलेली मांडणी यामुळे वानखेडे यांचे भाषण चर्चेचा विषय ठरले. विदर्भातील बळीराजाचा आवाज विधानसभेत बुलंद करण्याचा प्रयत्न त्यांनी केल्याची भावना अनेक सदस्यांनी व्यक्त केली.

# स्मार्ट मीटरचा करंट ३० हजारांचे बिल पाहून ग्राहकाला बसला शॉक

**आष्टी (शहीद) जनमाध्यम :** स्मार्ट मीटर बसवल्यानंतर वीज बिलांमध्ये प्रचंड वाढ होत असल्याच्या तक्रारींना आता अधिक धार मिळाली आहे. आष्टी शहरातील एका ग्राहकाला तब्बल ३० हजार रुपयांचे वीज बिल आल्याने महावितरणच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे तक्रार दाखल करूनही प्रत्यक्ष तपासणी न करता ती निकाली काढल्याचा गंभीर आरोप संबंधित ग्राहकाने केला आहे.

आष्टी येथील ग्राहक क्रमांक ४०२१२०००६३९९ यांना मागील महिन्यात सुमारे ३० हजार रुपयांचे वीज बिल प्राप्त झाले. यापूर्वी एवढा वीज वापर कधीच झाला नसल्याने त्यांनी महावितरणकडे दोन वेळा लेखी तक्रार दाखल केली. मीटर तपासणीसाठी शुल्क भरण्याची तयारी दर्शवूनही प्रत्यक्ष तपासणी करण्यात आली नसल्याचा दावा त्यांनी केला आहे.

धक्कादायक बाब म्हणजे काही दिवसांनंतर ग्राहकाला 'तक्रार निकाली काढण्यात आली' असा संदेश प्राप्त झाला. मात्र मीटरची पाहणी किंवा तांत्रिक तपासणीच झाली नसल्याने ग्राहकाने संताप व्यक्त केला आहे. मागील तीन महिन्यांत तब्बल ३७ हजार ५०० रुपयांचे बिल आल्याने कुटुंब आर्थिक संकटात सापडल्याचे त्यांनी सांगितले.

महावितरणचे सदस्य राजेश ठाकरे यांच्या माध्यमातून हा विषय वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचला. पाहणीचे आश्वासन मिळाले, मात्र त्यानंतरही प्रत्यक्ष कारवाई न झाल्याची तक्रार आहे. ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जिल्ह्यातच ग्राहकांना अशा प्रकारे हेलपाटे मारावे लागत असतील, तर सर्वसामान्यांची अवस्था काय,



असा संतप्त सवाल नागरिकांमधून उपस्थित होत आहे. स्मार्ट मीटर, वाढीव वीज बिल आणि तक्रार निवारण प्रक्रियेची स्वतंत्र चौकशी करून ग्राहकाला न्याय द्यावा, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

# रस्त्यात आडवे होऊन बॅग लुटली; २४ तासांत दोघे गजाआड

## सेलू पोलिसांची झपाट्याने कारवाई; गुन्ह्यातील दुचाकीसह आरोपी ताब्यात

**सेलू जनमाध्यम :** बँकेचे डेली कलेक्शन करून घरी परतणाऱ्या कर्मचाऱ्याला रस्त्यात अडवून त्याची बॅग हिसकावून पळ काढणाऱ्या दोन आरोपींना सेलू पोलिसांनी अवघ्या २४ तासांत जेरबंद केले. या कारवाईमुळे परिसरात पोलिसांच्या तत्परतेची चर्चा रंगली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, विकास चौक येथील रहिवासी वासुदेव मारोतराव घवघवे हे २२ जून रोजी रात्री साडेआठच्या सुमारास बँकेचे डेली कलेक्शन करून सायकलने घरी जात होते. यावेळी बोर नदीच्या जुन्या पुलाजवळ दोन अनोळखी व्यक्तींनी त्यांना अडवून त्यांच्या जवळील बॅग जबरदस्तीने हिसकावून घेतली. या बॅगेत मोबाईल, बँकेची महत्त्वाची कागदपत्रे व अन्य साहित्य होते. घटनेनंतर घवघवे यांनी सेलू पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

तक्रारीवरून पोलिसांनी भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम ३०४ व ३(५) अन्वये गुन्हा नोंदवून तपास सुरू केला. ठाणेदार पंकज वाघोडे यांच्या मार्गदर्शनाखाली डीबी पथकाने गुप्त माहितीच्या आधारे बेलगाव शिवारात सापळा रचून मारोती हिरालाल बानोत (३०) व दानिश रफिक शेख (२८, दोघेही रा. जोशीनगर, सेलू) यांना ताब्यात घेतले.

सखोल चौकशीत आरोपींनी जुन्या बोर नदी पुलावरील बॅग हिसकावल्याची कबुली दिली. पोलिसांनी त्यांच्या ताब्यातून गुन्ह्यात वापरण्यात आलेली एमएच-३२ डीएम-१६५० क्रमांकाची हिरो होंडा स्प्लेंडर दुचाकी जप्त केली. सुमारे १५ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.



ही यशस्वी कारवाई डीबी पथक प्रमुख सहाय्यक फौजदार मनोहर मुडे, पोलीस हवालदार अखिलेश गव्हाणे, सचिन वाटखेडे व विनायक गोडे यांनी पार पाडली. पुढील तपास सुरू आहे.

# वाघेडा शिवारात बिबट्याचा थरारक हल्ला

## बकऱ्या चारताना भडे गंभीर जखमी; परिसरात भीतीचे सावट



**समुद्रपूर जनमाध्यम :** समुद्रपूर तालुक्यातील लोणार परिसरात बिबट्याच्या हल्ल्याची धक्कादायक घटना घडली असून, या हल्ल्यात लोणार येथील बाबाराव भडे गंभीर जखमी झाले आहेत. या घटनेमुळे लोणार व वाघेडा परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून शेतकरी व पशुपालकांमध्ये चिंतेचे सावट निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बाबाराव भडे हे बुधवारी सकाळी आपल्या बकऱ्या चारण्यासाठी वाघेडा शिवारात गेले होते. याचवेळी झुडपांमध्ये दबा धरून बसलेल्या बिबट्याने त्यांच्यावर अचानक झडप घातली. अनपेक्षित हल्ल्यामुळे ते गंभीर जखमी झाले. त्यांच्या आरडाओरडीनंतर परिसरातील नागरिक घटनास्थळी धावले. नागरिकांची चाहूल लागताच बिबट्याने जंगलाच्या दिशेने पळ काढला. जखमी अवस्थेतील बाबाराव भडे यांना तातडीने समुद्रपूर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याने डॉक्टरांनी पुढील उपचारासाठी त्यांना शेवाग्राम येथील रुग्णालयात रेफर केले.

या घटनेनंतर लोणार, वाघेडा व आसपासच्या गावांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतकरी, मजूर व पशुपालकांनी शेतात जाताना विशेष खबरदारी घेण्यास सुरुवात केली आहे. नागरिकांनी वन विभागाने तातडीने परिसरात गस्त वाढवून बिबट्याचा बंदोबस्त करावा, अशी जोरदार मागणी केली आहे.

दरम्यान, वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनेची माहिती घेतली असून बिबट्याच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी पथके तैनात करण्यात येत आहेत. जंगलालगतच्या भागात राहणाऱ्या नागरिकांनी एकटे न फिरता सतर्क राहावे, असे आवाहन वन विभागाने केले आहे.

# देहव्यापार रॅकेटचा सूत्रधार अजूनही पसार

## 'मुस्कान'च्या शोधासाठी पोलिसांची दोन पथके तैनात

**वर्धा जनमाध्यम :** सावंगी (मेघे) परिसरातील 'कृष्णाई' इमारतीत सुरू असलेल्या देहव्यापाराच्या रॅकेटचा भंडाफोड झाल्यानंतर या प्रकरणातील मुख्य सूत्रधार असलेली मुस्कान उर्फ शबनम अद्यापही पोलिसांच्या हाती लागलेली नाही. तिच्या शोधासाठी सावंगी पोलिसांनी दोन स्वतंत्र पथके रवाना केली असून ती सतत ठिकाणे बदलत असल्याने पोलिसांना चकवा देत असल्याची माहिती समोर आली आहे.

अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाच्या पथकाने २० जून रोजी केलेल्या धाडीत एका महिलेची सुटका करण्यात आली होती. या कारवाईत राजू उर्फ नीलेश प्रदीप आदेवार (वय २१, रा. तुकाराम वॉर्ड, रामनगर, वर्धा) याला अटक करण्यात आली होती. तपासासाठी न्यायालयाने त्याला सुरुवातीला तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली होती.

**राजू' न्यायालयीन कोठडीत**

पोलिस कोठडीची मुदत संपल्यानंतर आरोपीला पुन्हा न्यायालयात हजर करण्यात आले. यावेळी दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने त्याची न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्याचे आदेश दिले. या प्रकरणाचा तपास सावंगी पोलिसांकडून सुरू असून देहव्यापाराच्या जाळ्याशी संबंधित आणखी काही धागेदोरे पोलिसांच्या हाती लागल्याची माहिती आहे.

दरम्यान, राज्यातील तसेच राज्याबाहेरील तरुणींना आमिष दाखवून त्यांच्याकडून देहव्यापार करून घेतल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. फरार मुस्कान उर्फ शबनम हिचा शोध लागल्यानंतर या रॅकेटबाबत आणखी धक्कादायक माहिती समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पोलिसांनी तिचा शोध अधिक तीव्र केला असून लवकरच तिला अटक करण्यात यश मिळेल, असा विश्वास तपास यंत्रणेकडून व्यक्त करण्यात आला आहे.

## जाहीर नोटीस

माझे अशील श्री. संजय जगोबाजी बोंद्रे, श्री. मयूर संजयराव बोंद्रे, श्री. अमित संजयराव बोंद्रे व सौ. रंजना संजयराव बोंद्रे हे मौजा – बोरेगाव मेघे, ता. व जि. वर्धा येथील मालमत्तेचे मालक आहेत. सदर मालमत्ता मौजा क्र. १००, पी.एच. क्र. १९, ग्रामपंचायत बोरेगाव मेघे हद्दीतील फील्ड सर्व्हे क्र. १६० मधील प्लॉट क्र. ४०, क्षेत्रफळ १५९.४० चौ. मी. (१७१५.१४ चौ. फूट) अशी आहे.

सदर मालमत्तेच्या चतु:सीमा पुढीलप्रमाणे आहेत :

पूर्वेस : प्लॉट क्र. ४१,

पश्चिमेस : ले-आऊट,

उत्तरेस : प्लॉट क्र. ४७,

दक्षिणेस : ले-आऊट रस्ता,

सौ. कीर्ती मधुकर चौरागडे यांनी दिनांक ३०/१०/२०२५ रोजी दस्तऐवज क्र. ३८००/२०२५ अन्वये प्लॉट क्र. ४०, क्षेत्रफळ १५९.४० चौ. मी. (१७१५.१४ चौ. फूट) ही मालमत्ता विक्रीखतात नमूद पूर्ण मोबदला प्राप्त करून व त्यानुसार मुद्रांक शुल्क भरून श्री. संजय जगोबाजी बोंद्रे, श्री. मयूर संजयराव बोंद्रे, श्री. अमित संजयराव बोंद्रे व सौ. रंजना संजयराव बोंद्रे यांच्या नावे विक्री केली आहे.माझ्या अशिलांचे खालील मूळ लिंक विक्रीखत हरवले आहेत :

विक्रीखत दस्तऐवज क्र. ४७७०/२०११, दिनांक ०७/०६/२०११

विक्रीखत दस्तऐवज क्र. २७७३/२०१३, दिनांक ३०/०३/२०१३

विक्रीखत दस्तऐवज क्र. ६९१४/२०१३, दिनांक ३०/०८/२०१३

माझ्या अशिलांनी पिरामल फायनान्स लिमिटेड येथे कर्जासाठी अर्ज केला आहे.

याद्वारे सर्वसामान्य जनतेस कळविण्यात येते की, वरील व्यवहाराबाबत कोणास काही दावा, हरकत किंवा आक्षेप असल्यास अथवा वरील हरवलेले विक्रीखत कोणास सापडल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांच्या आत खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

**ॲड. आर.आर. तिवारी,**
**रामनगर,वर्धा.मो.नं.९९२२४२६१६८**

# सामान्य वीज ग्राहकांच्या हितासाठी ग्रीड सपोर्ट चार्ज -मुख्यमंत्री

**मुंबई जनमाध्यम :** सौर ऊर्जेच्या वाढत्या वापरामुळे वीज ग्रीडवर अतिरिक्त ताण येतो. या ताणामुळे निर्माण होणारा खर्च सामान्य ग्राहकांवर पडू नये, यासाठी 'ग्रीड सपोर्ट चार्ज' आकारण्यात आला आहे. हे शुल्क केवळ ०.१३ टक्के ग्राहकांवर लागू होते. हा कोणताही तोटा नसून काही ग्राहकांच्या अतिरिक्त नफ्यात झालेली मर्यादित कपात आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत दिली.

राज्यातील औद्योगिक व व्यावसायिक ग्राहकांसाठी वीज विक्री कराच्या वाढीबाबत विधानपरिषद सदस्य सतेज उर्फ बंटी पाटील यांनी प्रश्न उपस्थित केला. यावेळी सदस्य भाई जगताप, एकनाथ खडसे, डॉ. नीलम गोऱ्हे यांनी उपप्रश्न विचारत चर्चेत सहभाग घेतला. यावेळी ते बोलत होते.



मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, ग्रीड सपोर्ट चार्ज १ फेब्रुवारी २०१६ पासून लागू करण्यात आला असून तो पूर्वलक्षी प्रभावाने (रेट्रोस्पेक्टिव्ह) लागू केलेला नाही. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने (एमईआरसी) केलेल्या काही गणनांमध्ये ४० हजार कोटी रुपयांची तरतूद दुहेरी पद्धतीने विचारात घेतल्याचे शासनाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर आयोगाने त्यास स्थगिती देऊन नव्याने सुनावणी सुरू केली आहे.

राज्यातील सर्व फीडर्सवर स्मार्ट मीटर बसविण्याचे काम पूर्ण झाले असून वीज वापराच्या आकडेवारीत आता कोणत्याही प्रकारचा अंदाजाधारित हस्तक्षेप राहिलेला नाही. महाराष्ट्रातील औद्योगिक वीज दर अनेक राज्यांच्या तुलनेत कमी आहेत. २०२५-२६ मध्ये महाराष्ट्रातील दर प्रतियुनिट ८.१९ रुपये असून ते तामिळनाडू, तेलंगणा आणि मध्य प्रदेशपेक्षा कमी आहे. बहुवर्षीय दरनिश्चिती (मल्टी इयर टॅरिफ) अंतर्गत २०२९-३० पर्यंतचे दर निश्चित करण्यात आले असून त्या कालावधीत महाराष्ट्रातील वीज दर देशातील सर्वात स्पर्धात्मक राहतील, असे त्यांनी यावेळी सांगितले.

राज्यातील औद्योगिक वाढीचा दाखला देताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, गेल्या दोन वर्षांत राज्यातील वीज मागणीत तब्बल २० टक्क्यांची वाढ झाली आहे. जर महाराष्ट्रातील वीज दर खरोखरच जास्त असते, तर उद्योग इतर राज्यांकडे वळले असते. मात्र प्रत्यक्षात मोठ्या प्रमाणावर उद्योग महाराष्ट्रात गुंतवणूक करत आहेत.

## जाहीर नोटीस

माझी अशील सौ. सुप्रिया प्रवीण डोर्लीकर या मौजा – वर्धा, ता. वर्धा व जि. वर्धा येथील मालमत्तेच्या मालक आहेत. सदर मालमत्ता मौजा क्र. ८५, नगरपरिषद वर्धा हद्दीत, झोन क्र. २, वॉर्ड क्र. २०, शीट क्र. ६०, भूखंड क्र. ४१२९, क्षेत्रफळ ७९.८० चौ. मी. (८५८.६५ चौ. फूट) तसेच घर क्रमांक डब्लु.ए.आर.डी ०००१४८५९ (असेसमेंटनुसार जुना क्र. २००००७७) व त्यावरील बांधकामासह आहे.

सदर मालमत्तेच्या चतु:सीमा पुढीलप्रमाणे आहेत :

पूर्वेस : श्री. प्रवीण झांझळ यांचे घर

पश्चिमेस : श्री. इंगोले यांचे घर,

उत्तरेस : रस्ता,दक्षिणेस : बोळ व सौ. इंदुबाई कांगळे यांचे घर, श्री. मेघश्याम जगन्नाथजी मोहिते यांनी दिनांक २५/०८/२०२५ रोजी दस्तऐवज क्र. ३२५२/२०२५ अन्वये भूखंड क्र. ४१२९, क्षेत्रफळ ७९.८० चौ. मी. (८५८.६५ चौ. फूट) ही मालमत्ता संपूर्ण मोबदला प्राप्त करून व त्यानुसार मुद्रांक शुल्क भरून सौ. सुप्रिया प्रवीण डोर्लीकर यांच्या नावे विक्री केली आहे.

माझ्या अशील यांचे दिनांक ०६/११/१९८१ चे मूळ लिंक विक्रीखत, दस्तऐवज क्र. ३४०२/१९८१ हरवले आहे. सौ. सुप्रिया प्रवीण [illegible] यांनी इंडसइंड बँकेत कर्जासाठी अर्ज केला आहे.याद्वारे सर्वसामान्य जनतेस कळविण्यात येते की, वरील व्यवहाराबाबत कोणास काही हरकत, दावा किंवा आक्षेप असल्यास अथवा हरवलेले विक्रीखत कोणास सापडल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांच्या आत खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

**ॲड. आर.आर. तिवारी,**
**रामनगर, वर्धा मो.नं. ९९२२४२६१६८**

कोर्ट विद्यमान श्री समर्थ क्षिरसागर तहसिलदार, तथा तालुका दंडाधिकारी यांचे न्यायालय देवळी.

जन्म - मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये ज. मृ.नो.र.प्र.क्र.२२/२०२५-२६

## जाहीरनामा

ज्याअर्थी अर्जदार श्री आकाश पंजाबराव कुरसिंगे रा. कोळोणा (चोरे) ता. देवळी जि. वर्धा यांचा जन्म दिनांक २६/०१/१९९८ रोजी मौजा कोळोणा चोरे ता. देवळी येथे झाला असून जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) आणि महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी अर्धानियम व फोजदारी प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम २० चे पोटकलम (१) अंतर्गत अर्जदार श्री आकाश पंजाबराव कुरसिंगे रा. कोळोणा (चोरे) ता. देवळी जि. वर्धा यांचा जन्म दिनांक २६/०१/१९९८ रोजी मौजा कोळोणा (चोरे) ता. देवळी येथे झाला असून त्यांचे जन्माची नोंद ग्रामपंचायत कोळोणा (चोरे) ता. देवळी येथे उपलब्ध नसल्याने ग्रामपंचायत यांचे कार्यालयातील अधिकृत नोंदणी पुस्तिकेमध्ये नोंद घेण्याचा आदेश होणेबाबत या कार्यालयास ग्रामपंचायत कोळोणा (चोरे) ता. देवळी यांचेव्दारे प्रस्ताव प्राप्त झालेला आहे.

त्याअर्थी सदर व्यक्तीच्या जन्माच्या नोंदीबाबत हितसंबंधीत व्यक्तीचे आक्षेप / हरकती असल्यास ते त्यांनी निश्चित केलेल्या तारखेस स्वतः अथवा विधी व्यवसायीमार्फत किंवा मान्यता प्राप्त अभिकर्त्यामार्फत हजर राहून १५ दिवसाचे आत सादर करावे. उक्त तारखेनंतर व ठिकाणी अशा रितीने हजर राहण्यास व हरकती निवेदन करण्यास कसूर केल्यास त्यानंतर प्राप्त कोणत्याही हरकती व आक्षेप विचारात घेण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.


दिनांक :-२२/०६/२०२६

**तहसीलदार देवळी**

# लग्नपत्रिकेवर आता वधू-वराच्या नावापुढे लिहावी लागणार जन्मतारीख

## महाराष्ट्र सरकारचा मोठा निर्णय

**मुंबई /प्रतिनिधी-** महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने बालविवाह रोखण्यासाठी एक महत्त्वपूर्ण शिफारस केली आहे. लग्नपत्रिकेवरती आता नवरा-नवरीच्या नावापुढेही जन्मतारीख लिहावी लागणार आहे. राजस्थान सरकारच्या निर्णयानंतर आता महाराष्ट्र सरकारही निर्णय घेणार असून लवकरच नियम लागू करणार आहेत. बालविवाहाचे धक्कादायक वास्तव समोर आल्यानंतर सरकारने हा निर्णय घेतल्याचे म्हटले जात आहे.राज्यातील अनेक जिल्ह्यांत बालविवाहाचे प्रमाण चिंताजनक असल्याची माहिती विधानसभेत सरकारकडून सादर केली आहे. यात परभणी जिल्ह्यात ४८ टक्के मुलींचे अल्पवयात लग्न झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. तसेच बीडमध्ये ४३.७ टक्के, धुळ्यात ४०.५ टक्के आणि सोलापुरात ४०.३ टक्के मुलींचे १८ वर्षांपूर्वी विवाह झाल्याची माहिती आहे.बालविवाहामुळे मुलींच्या शिक्षण व आरोग्यावर परिणाम होत असल्याचे सरकारकडून मान्य झाले आहे. बालविवाह रोखण्यासाठी राज्यात कायदा, नियम व विशेष जनजागृती मोहीम राबविली जात असल्याची माहिती असून राजस्थानच्या धर्तीवर लग्नपत्रिकेवर वर-वधूची जन्मतारीख छापणे बंधनकारक करण्याच्या प्रस्तावाचा सरकारकडून अभ्यास सुरू आहे.



**बालविवाहाचे प्रमाण सर्वाधिक असलेले प्रमुख जिल्हे-**परभणी जिल्ह्यात ४८ टक्के, बीडमध्ये ४३.७ टक्के, धुळ्यात ४०.५ टक्के आणि सोलापूर जिल्ह्यात ४०.३ टक्के मुलींचे १८ वर्षांपूर्वी विवाह झाल्याची धक्कादायक माहिती सरकारने दिली आहे. याशिवाय इतरही अनेक जिल्ह्यांमध्ये बालविवाहाची ही आकडेवारी प्रशासनाची झोप उडवणारी आहे.

**मुलींच्या आरोग्यावर आणि शिक्षणावर गंभीर परिणाम-**बालविवाहामुळे केवळ कायद्याचेच उल्लंघन होत नसून, अल्पवयीन मुलींचे शिक्षण अर्धवट सुटत आहे. तसेच, कमी वयात मातृत्व लादले गेल्याने त्यांच्या आरोग्यावर आणि एकूणच मानसिक विकासावर अत्यंत घातक परिणाम होत असल्याचे महिला व बालविकास विभागाने नमूद केले आहे.

**कायद्यासोबतच जनजागृतीवर भर**

हा नियम राज्यभरात लागू करण्यासाठी शासन पातळीवर अंतिम मसुदा तयार केला जात असून, लवकरच याची अधिकृत घोषणा केली जाईल. मात्र, बालविवाह हा केवळ कायद्याचा विषय नसून ती समाजात खोलवर रुजलेली अनिष्ट प्रथा आहे. त्यामुळे या कडक नियमांसोबतच गावपातळीवर मोठ्या प्रमाणावर जनजागृती मोहीम आणि मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणे गरजेचे असल्याचे मत सामाजिक क्षेत्रातील तज्ज्ञांकडून व्यक्त केले जात आहे.

# आता कुटुंब नाही, तर सदस्यसंख्येनुसार मिळणार धान्य

**मुंबई/प्रतिनिधी-** देशातील सार्वजनिक वितरण प्रणाली आणि रेशन व्यवस्थेत मोठा बदल होण्याची शक्यता आहे. केंद्र सरकारने राष्ट्रीय अन्न सुरक्षा (सुधारणा) विधेयक २०२६ चा मसुदा जाहीर केला असून, अंत्योदय अन्न योजना अंतर्गत धान्य वितरणाच्या पद्धतीत बदल करण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. अन्न सुरक्षा अधिक मजबूत करणे आणि रेशन वितरण अधिक न्याय्य बनवणे हा या बदलामागील उद्देश असल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे. सध्या अंत्योदय अन्न योजनेअंतर्गत पात्र प्रत्येक कुटुंबाला दरमहा ३५ किलो धान्य दिले जाते. मात्र, नव्या प्रस्तावानुसार हे वितरण प्रति व्यक्ती ७ किलो धान्य प्रति महिना या आधारावर करण्याची योजना आहे. एका कुटुंबाला मिळणा-या धान्याची कमाल मर्यादा ३५ किलो प्रतिमहिना कायम राहणार आहे. म्हणजेच, कुटुंबातील सदस्यसंख्येनुसार धान्याचे वाटप होईल, पण एकूण धान्य ३५ किलोपेक्षा जास्त मिळणार नाही.सरकारच्या मते, सध्याच्या व्यवस्थेमुळे कुटुंबांच्या आकारानुसार असमानता निर्माण होते. लहान कुटुंबांना प्रति व्यक्ती अधिक धान्य मिळते, तर मोठ्या कुटुंबांना तुलनेने कमी धान्य मिळते. ही तफावत दूर करून प्रत्येक लाभार्थ्याला समान निकषांवर लाभ मिळावा यासाठी प्रति व्यक्ती धान्य वाटप करण्याची नवी पद्धत सुचवण्यात आली आहे. हा प्रस्ताव लागू झाल्यास रेशन वितरण अधिक पारदर्शक होण्याची अपेक्षा आहे. प्रत्येक व्यक्तीला त्याच्या गरजेनुसार धान्य उपलब्ध करून देणे सोपे होईल. विशेषतः मोठ्या आणि गरजू कुटुंबांना याचा अधिक फायदा मिळू शकतो, कारण आता धान्याचे वाटप कुटुंबातील सदस्यसंख्येच्या आधारे ठरणार आहे. केंद्र सरकारने या मसुदा विधेयकावर नागरिक, तज्ज्ञ आणि संबंधित घटकांकडून सूचना व हरकती मागवल्या आहेत. इच्छुक नागरिक १३ जुलै २०२६ पर्यंत आपली मते सरकारकडे पाठवू शकतात. प्राप्त सूचनांचा आढावा घेतल्यानंतर विधेयकात आवश्यक बदल करून पुढील प्रक्रिया राबवली जाणार आहे.



## *नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा-2 मध्ये 7,201 गावांचा समावेश*

**मुंबई/प्रतिनिधी-**राज्यातील २१ जिल्ह्यांमध्ये अंदाजे ६,००० कोटी रुपये किंमतीचा जागतिक बँक अर्थसहाय्यित नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोकरा) टप्पा-२ राबविण्यास तत्त्वत? मान्यता तर उर्वरित सर्व जिल्ह्यात कृषी समृद्धी योजना राबविण्यात येत आहे अशी माहिती राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांनी दिली. टप्पा-२ मध्ये २१ जिल्ह्यांतील एकूण ७,२०१ गावांची निवड करण्यात आली आहे. मंत्रिमंडळाच्या मान्यतेनंतर या गावांच्या यादीस जागतिक बँकेचीही मंजुरी मिळाली आहे.विधान परिषदेत लक्षवेधी सूचनेद्वारे पोकरा टप्पा-२ प्रकल्पात अहिल्यानगर जिल्ह्यातील गावांच्या समावेशाबाबत उत्तर देताना ते बोलत होते. यावेळी चर्चेमध्ये सदस्य विवेक कोल्हे यांनी सहभाग घेतला.राज्यमंत्री आशिष जयस्वाल म्हणाले, जागतिक बँकेच्या धोरणे व निकषांनुसार टप्पा-२ मध्ये अतिरिक्त जिल्हे, तालुके किंवा गावे समाविष्ट करण्यास काही मर्यादा आहेत. मात्र, राज्यातील इतर भागांतील शेतक-यांच्या मागणीचा विचार करून शासनाने नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या धर्तीवर संपूर्ण राज्यात कृषि समृद्धी योजना लागू केली आहे.राज्यमंत्री जयस्वाल यांनी सांगितले की,संवेदनशीलता निर्देशांक, हवामान बदलास असुरक्षितता निर्देशांक आणि नैसर्गिक आपत्ती निर्देशांक यांचा सखोल विचार करून जागतिक बँक अर्थसहाय्यित नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोकरा) टप्पा-२ राबविण्यास येत आहे.प्रकल्पाचा अंमलबजावणी आराखडा अंतिम करण्यात आला आहे. प्रकल्पाच्या अंमलबजावणीस प्रारंभ करण्यात आला असून राज्य शासन आणि जागतिक बँक यांच्यात १४ जानेवारी २०२६ रोजी ६,००० कोटी रुपयांचा करार करण्यात आला आहे.सध्या प्रकल्पांतर्गत निवड झालेल्या गावांमधून वैयक्तिक लाभाच्या विविध घटकांसाठी तसेच शेतकरी गटांसाठी कृषी अवजारे बँक स्थापन करण्यासाठी अर्जांना पूर्वसंमती देण्याची प्रक्रिया सुरू असून, शेतक-यांनी प्रत्यक्ष घटकांची अंमलबजावणी केल्यानंतर त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट लाभ हस्तांतरण (DBT) प्रणालीद्वारे अनुदान वितरित करण्यात येत आहे.

# तुकाराम मुंढेंच्या बदलीसाठी आंतरराष्ट्रीय ड्रग्ज लॉबीने 250 कोटी गोळा केलेत

**मुंबई/प्रतिनिधी-**राज्याच्या विधिमंडळाचं पावसाळी अधिवेशन सुरू आहे. या अधिवेशनादरम्यान विधानसभा आणि विधानपरिषदेत विविध विषयांवर चर्चा पार पडत आहेत. मात्र, आज (२४ जून) विधानसभेत या चर्चांदरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी विधानसभेत बोलताना एक मोठा दावा केला आहे.अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या बदलीसाठी आंतरराष्ट्रीय ड्रग्ज लॉबीकडून २५० कोटी रुपये गोळा करण्यात आल्याचा दावा जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे. जितेंद्र आव्हाड यांनी विधानसभेत बोलताना हा दावा केला असून त्यांच्या या वक्तव्यानंतर राज्यात एकच खळबळ उडाली आहे.

गेल्या काही दिवसांपासून अन्न व औषध प्रशासन आयुक्तम्हणून तुकाराम मुंढे यांनी राज्यभरात भेसळीच्या विरोधात मोहिम राबवत अनेक मोठ्या कारवाया केल्या आहेत. अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त म्हणून जबाबदारी स्वीकारल्यापासून ते आतापर्यंत तुकाराम मुंढे यांच्या विभागाने राज्यभरात अनेक ठिकाणी छापा टाकत कारवाया केल्या आहेत. त्यामुळे तुकाराम मुंढे हे सध्या चर्चेत आहेत. मात्र, असं असतानाच जितेंद्र आव्हाड यांनी आज केलेल्या दाव्यामुळे खळबळ उडाली आहे.




**जितेंद्र आव्हाड काय म्हणाले?**

तुकाराम मुंढे यांच्या बदलीसाठी आंतरराष्ट्रीय ड्रग्ज लॉबी कामाला लागली आहे. तुकाराम मुंढे यांच्या बदलीसाठी आंतरराष्ट्रीय ड्रग्ज लॉबीकडून २५० कोटी रुपये गोळा केले गेलेत, असा खळबळजनक दावा आमदार जितेंद्र आव्हाड यांनी विधानसभेत बोलताना केला आहे.

**सुधीर मुनगंटीवार काय म्हणाले?**

तुकाराम मुंढे यांचा टी आता टायगर मुंढे यांचा टी झाला आहे. त्यामुळे आता मागणी केली जात आहे की कमीत-कमी तीन वर्ष तुकाराम मुंढे यांची बदली करू नये, अशी मागणी सुधीर मुनगंटीवार यांनी विधानसभेत बोलताना केली आहे.

**मंत्री नरहरी झिरवाळ काय म्हणाले?**

सुधीर मुनगंटीवार यांच्या मागणीवर उत्तर देताना मंत्री नरहरी झिरवाळ म्हणाले की, तुकाराम मुंढे यांची बदली होणार नाही. तुकाराम मुंढे यांची बदली होउ नये, म्हणून सर्व सभागृह तुमच्याबरोबर आहे आणि आम्ही देखील तुमच्याबरोबर आहोत, असं मंत्री नरहरी झिरवाळ यांनी विधानसभेत बोलताना म्हटलं आहे.

**अर्जुन खोतकर काय म्हणाले?**

तुकाराम मुंढे यांच्यामुळे पहिल्यांदाच अन्न व औषध प्रशासन हा विभाग एवढा चर्चेत आला आहे. तुकाराम मुंढे असतील किंवा नरहरी झिरवाळ असतील, यांनी खूप चांगल्या पद्धतीने या संपूर्ण विषयात लक्ष घातलेलं आहे. मात्र, तुकाराम मुंढे यांना सोशल मीडियावर धमक्या येत आहेत. त्यामुळे त्यांना संरक्षण देण्यात यावं, अशी मागणी शिवेसना (शिंदे) पक्षाचे नेते तथा आमदार अर्जुन खोतकर यांनी विधानसभेत बोलताना केली आहे.

# नाल्यातील पाण्यात बुडून दोन शालेय विद्यार्थ्यांचा मृत्यू

**चंद्रपूर/प्रतिनिधी-** भद्रावती तालुक्यातील पाचगाव (मु.) येथे बुधवारी सकाळी घडलेल्या दुर्दैवी घटनेत नाल्यातील खड्ड्यात साचलेल्या पाण्यात बुडून दोन अल्पवयीन शालेय विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला. या हृदयद्रावक घटनेमुळे संपूर्ण गावावर शोककळा पसरली असून दोन्ही कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

मृत विद्यार्थ्यांची नावे सानिध्य विजय दुधनकर ( ११) आणि कार्तिक संदीप सावसाकडे ( १२) अशी आहेत. दोघेही वडेगाव येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत शिक्षण घेत होते. सानिध्य इयत्ता सहावीत तर कार्तिक इयत्ता सातवीत शिकत होता. मिळालेल्या माहितीनुसार, दोन्ही मुले गावालगतच्या नाल्यातील खड्ड्यात साचलेल्या पाण्यात पोहण्यासाठी गेली होती.

दरम्यान, गावात आलेल्या एका व्यक्तीच्या भाच्याला पाण्यातून बुडबुडे वर येताना दिसले. संशय आल्याने त्याने तातडीने ही बाब ग्रामस्थांच्या निदर्शनास आणून दिली. त्यानंतर गावक-यांनी घटनास्थळी धाव घेत शोधमोहीम सुरू केली. ग्रामस्थांनी दोन्ही मुलांना पाण्याबाहेर काढून तत्काळ मदतीचा प्रयत्न केला. मात्र, तोपर्यंत उशीर झाला होता. दोघांचाही मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाल्यानंतर गावात शोककळा पसरली. सानिध्य हा विजय दुधनकर यांचा एकुलता एक मुलगा होता, तर कार्तिक हा संदीप सावसाकडे यांचा एकुलता एक मुलगा होता. दोघांनाही प्रत्येकी एक बहीण आहे.

एकाच वेळी गावातील दोन चिमुकल्यांचा मृत्यू झाल्याने दुधनकर आणि सावसाकडे कुटुंबीयांवर मोठे दुःख कोसळले आहे. या घटनेने संपूर्ण पाचगाव परिसर हळहळला असून गावक-यांकडून दोन्ही विद्यार्थ्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर पाणीसाठ्यांच्या ठिकाणी मुलांनी जाणे टाळावे, तसेच पालकांनी अधिक दक्षता घ्यावी, अशी भावना यानिमित्ताने व्यक्त होत आहे.

# सामान्य वीज ग्राहकांच्या हितासाठी ग्रीड सपोर्ट चार्ज-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई/प्रतिनिधी-** सौर उर्जेच्या वाढत्या वापरामुळे वीज ग्रीडवर अतिरिक्त ताण येतो. या ताणामुळे निर्माण होणारा खर्च सामान्य ग्राहकांवर पडू नये, यासाठी 'ग्रीड सपोर्ट चार्ज' आकारण्यात आला आहे. हे शुल्क केवळ ०.१३ टक्के ग्राहकांवर लागू होते. हा कोणताही तोटा नसून काही ग्राहकांच्या अतिरिक्त नफ्यात झालेली मर्यादित कपात आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत दिली.राज्यातील औद्योगिक व व्यावसायिक ग्राहकांसाठी वीज विक्री कराच्या वाढीबाबत विधानपरिषद सदस्य सतेज उर्फ बंटी पाटील यांनी प्रश्न उपस्थित केला. यावेळी सदस्य भाई जगताप, एकनाथ खडसे, ड?. नीलम गो-हे यांनी उपप्रश्न विचारत चर्चेत सहभाग घेतला. यावेळी ते बोलत होते.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, ग्रीड सपोर्ट चार्ज १ फेब्रुवारी २०१६ पासून लागू करण्यात आला असून तो पूर्वलक्षी प्रभावाने (रेट्रोस्पेक्टिव्ह) लागू केलेला नाही. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने (एमईआरसी) केलेल्या काही गणनांमध्ये ४० हजार कोटी रुपयांची तरतूद दुहेरी पद्धतीने विचारात घेतल्याचे शासनाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर आयोगाने त्यास स्थगिती देउन नव्याने सुनावणी सुरू केली आहे.राज्यातील सर्व फीडर्सवर स्मार्ट मीटर बसविण्याचे काम पूर्ण झाले असून वीज वापराच्या आकडेवारीत आता कोणत्याही प्रकारचा अंदाजाधारित हस्तक्षेप राहिलेला नाही. महाराष्ट्रातील औद्योगिक वीज दर अनेक राज्यांच्या तुलनेत कमी आहेत. २०२५-२६ मध्ये महाराष्ट्रातील दर प्रतियुनिट ८.१९ रुपये असून ते तामिळनाडू, तेलंगणा आणि मध्य प्रदेशपेक्षा कमी आहे. बहुवर्षीय दरनिश्चिती (मल्टी इयर टॅरिफ) अंतर्गत २०२९-३० पर्यंतचे दर निश्चित करण्यात आले असून त्या कालावधीत महाराष्ट्रातील वीज दर देशातील सर्वात स्पर्धात्मक राहतील, असे त्यांनी यावेळी सांगितले.राज्यातील औद्योगिक वाढीचा दाखला देताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, गेल्या दोन वर्षांत राज्यातील वीज मागणीत तब्बल २० टक्क्यांची वाढ झाली आहे. जर महाराष्ट्रातील वीज दर खरोखरच जास्त असते, तर उद्योग इतर राज्यांकडे वळले असते. मात्र प्रत्यक्षात मोठ्या प्रमाणावर उद्योग महाराष्ट्रात गुंतवणूक करत आहेत.सौर उर्जेच्या वापराबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, सध्या निर्माण होणा-या सौर उर्जेपैकी सुमारे ३५ टक्के वीज दिवसा वापरली जाते, तर ६५ टक्के वीज रात्री बँकिंगच्या स्वरूपात मागितली जाते. यामुळे वितरण व्यवस्थेवर अतिरिक्त भार पडतो. हा प्रश्न सोडविण्यासाठी बॅटरी स्टोरेज हा प्रभावी पर्याय असून शासन मोठ्या प्रमाणावर बॅटरी स्टोरेज क्षमता उभारण्याचे काम करत आहे.०२२ मध्ये राज्यातील एकूण वीज निर्मितीत नूतनीकरणक्षम उर्जेचा वाटा १५ टक्के होता. विविध प्रकल्पांच्या माध्यमातून २०२९-३० पर्यंत हा वाटा ५२ टक्क्यांपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट आहे.



# राज्यातील ७५ टक्के शेतक-यांना दिवसा वीजपुरवठा

**मुंबई/प्रतिनिधी-**राज्यात सध्या वीजेची कोणतीही टंचाई नसून कृषी पंपांना नियमानुसार दिवसा आठ तास वीजपुरवठा केला जात आहे. राज्यातील सुमारे ७५ टक्के शेतक-यांना दिवसा वीज उपलब्ध झाली असून उर्वरित २५ टक्के शेतक-यांनाही यावर्षाअखेरीस दिवसा वीजपुरवठ्याच्या कक्षेत आणण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली.

> ■ **यावर्षाअखेरीस उर्वरित 25 टक्के शेतक-यांना दिवसा वीज पुरवठा देण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न**
>
> **-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

याबाबत सदस्य सदाभाउ खोत यांनी प्रश्न उपस्थित केला. तर सदस्य बच्चू कडू, प्रविण दरेकर यांनी उपप्रश्न उपस्थित केला.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मे महिन्यात काही वीज निर्मिती प्रकल्पांमध्ये एकाच वेळी तांत्रिक अडचणी निर्माण झाल्याने अल्पकाळासाठी भारनियमन करावे लागले होते. मात्र सध्या राज्यात कोणतेही भारनियमन करण्यात येत नाही. शेतक-यांसाठी राबविण्यात येत असलेल्या सौर कृषी पंप योजनेंतर्गत विविध भौगोलिक परिस्थितींना अनुरूप माडेल विकसित करण्यात आली आहेत. नदीकाठ, पूररेषा, कालवे तसेच खोल जलस्रोतांमधून पाणी उपसा करण्यासाठी मोनोपोल, बूस्टर पंप आणि तरंगत्या सौर पंपांची यशस्वी अंमलबजावणी करण्यात आली आहे. गेल्या तीन वर्षांत राज्यात १० लाखांहून अधिक सौर पंप बसविण्यात आले असून शेतक-यांकडून या योजनेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.वीज वितरण व्यवस्थेतील त्रुटी दूर करण्यासाठी केंद्र शासनाच्या आरडीएसएस योजनेअंतर्गत राज्यात सुमारे २५ हजार कोटी रुपयांची कामे सुरू करण्यात आली आहेत. यामध्ये फीडर विभक्तीकरण, नवीन उपकेंद्रे, अतिरिक्त रोहित्रे (डीपी) आणि वितरण यंत्रणेचे आधुनिकीकरण करण्यात येत आहे. पुढील तीन वर्षांत या कामांमुळे डीपी निकामी होण्याचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी होईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

डार्क झोन भागातील शेतक-यांनाही दिलासा देण्यासाठी खोल जलस्तर असलेल्या भागांमध्ये अधिक क्षमतेचे पंप, बूस्टर पंप आणि त्यावर अनुदान देण्याची व्यवस्था केली आहे. तसेच सौर पंपधारकांना वीजबिलाचा कोणताही प्रश्न राहत नसल्याचेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यातील वाढत्या वीज मागणीच्या पार्श्वभूमीवर २०३१-३२ पर्यंत ७८ हजार मेगावॅट वीज क्षमता उपलब्ध करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या क्षमतेचे प्रभावी वहन सुनिश्चित करण्यासाठी ट्रान्समिशन कारिडार उभारणीवर विशेष भर देण्यात येत असून टीबीसीबी पद्धतीद्वारे १६ हजार कोटी रुपयांची कामे सुरू झाली आहेत. पुढील तीन वर्षांत ट्रान्समिशन क्षेत्रात सुमारे ६० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. मुंबईच्या वीज सुरक्षेसाठी मुंबई आयलँडिंग संकल्पनेअंतर्गत महत्त्वाचे ट्रान्समिशन कारिडार पूर्ण करण्यात आले असून आता मुंबईत अतिरिक्त ३ हजार मेगावॅट वीज आणण्याची क्षमता निर्माण झाली आहे. त्यामुळे कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत मुंबईचा वीजपुरवठा अबाधित ठेवणे शक्य होणार आहे. पीएम सूर्य घर योजनेंतर्गत रूफटाप सौर उर्जा निर्मितीत महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर पोहोचला असून गृहसंकुलांनी मोठ्या प्रमाणावर सौर उर्जा स्वीकारल्यास त्यांच्या सामाईक वीज खर्चात मोठी बचत होउ शकते, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

# मुख्यमंत्र्यांच्या पुढाकारातून राबविलेल्या उपक्रमामुळे कैद्यांचे यशस्वी पुनर्वसन

**मुंबई/प्रतिनिधी-** गुन्हेगारीचा रस्ता सोडून कैद्यांनी पुन्हा एकदा समाजाच्या प्रवाहात यावे. भूतकाळ विसरून सन्मानाने जीवन जगावे आणि त्यांच्या कुटुंबालाही स्थैर्य मिळावे, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने राज्यातील विविध कारागृहांमध्ये कैद्यांच्या पुनर्वसनासाठी विशेष उपक्रम राबविला जात आहे.यासाठी 'टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स ' संस्थेशी सामंजस्य करार करण्यात आला आहे. या उपक्रमातून कैद्यांना गुन्हेगारी जग सोडून सकारात्मक आयुष्याची कास धरण्यासाठी मोठे मानसिक आणि सामाजिक बळ मिळत आहे. त्यांचे यशस्वी पुनर्वसन करण्यात येत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या संवेदनशील विषयाकडे केवळ कायदा, सुव्यवस्था किंवा शिक्षेच्या दृष्टिकोनातून न पाहता, व्यापक सामाजिक सुधारणा म्हणून पाहिले आहे. त्यांच्या दूरगामी विचार सरणीमुळे आणि सततच्या पाठपुराव्यामुळेच हा उपक्रम सध्या राज्यातील मुंबई, ठाणे, तळोजा, येरवडा (पुणे), नागपूर आणि नाशिक या प्रमुख मध्यवर्ती कारागृहामध्ये प्रभावीपणे सुरू आहे. यासोबतच भायखळा, कल्याण, लातूर आणि अलिबाग या जिल्हा कारागृहांमध्येही या उपक्रमांतर्गत कैद्यांच्या आयुष्याला नवी दिशा देण्याचे काम कारागृह प्रशासनाच्या सहाय्याने युद्धपातळीवर सुरू आहे. या उपक्रमाचे सकारात्मक आणि दूरगामी परिणाम आता दिसू लागले असून, कारागृहातील बंदीवान आपल्या नकारात्मक मानसिकतेतून बाहेर पडत आहेत. उपक्रमाची आखणी करताना कैद्यांच्या मानसिक, शारीरिक आणि आर्थिक अशा तिन्ही बाजूंवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. अनेकदा कायद्याच्या योग्य माहितीअभावी किंवा प्रदीर्घ न्यायालयीन प्रक्रियेमुळे कैदी नैराश्यात जातात. हीच बाब लक्षात घेउन कारागृहांद्वारे कायदेविषयक विशेष शिबिरे आयोजित केली जात आहेत.




तज्ज्ञ वकिलांमार्फत कैद्यांना त्यांच्या हक्कांची आणि कायदेशीर प्रक्रियेची सोप्या भाषेत माहिती दिली जात आहे. कैद्यांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्याची काळजी घेण्यासाठी नियमित वैद्यकीय आणि मानसोपचार शिबिरे आयोजित केली जात आहेत.

कैदी जेव्हा आपली शिक्षा पूर्ण करून कारागृहातून बाहेर पडेल, तेव्हा तो आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व्हावा आणि त्याने पुन्हा गुन्हेगारीकडे वळू नये, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. यासाठी विविध कौशल्य विकास वृद्धिंगत करणारी व्यावसायिक आणि तांत्रिक प्रशिक्षण शिबिरे चालवली जात आहेत. या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे कैद्यांचा त्यांच्या कुटुंबीयांशी तुटलेला संपर्क पुन्हा जोडून देणे हे आहे. कारागृहातील बंदिवानांचा त्यांच्या कुटुंबीयांशी नियमित आणि आदरयुक्त संवाद साधून दिला जातो. यातील सर्वात संवेदनशील पाउल म्हणजे, कैद्यांना त्यांच्या लहान मुलांसोबत प्रत्यक्षरित्या, कोणत्याही अडथळ्याविना समोरासमोर बसवून संवाद साधण्याची आणि त्यांना जवळ घेण्याची संधी दिली जात आहे. यामुळे कैद्यांमधील गुन्हेगारीची भावना नष्ट होउन त्यांच्यात जबाबदार पालक आणि कौटुंबिक व्यक्ती म्हणून जगण्याची तीव्र इच्छा निर्माण होण्याचा विश्वास आहे.हा उपक्रम केवळ कैदी कारागृहात असेपर्यंतच मर्यादित नाही, तर तो जेव्हा शिक्षा पूर्ण करून बाहेर पडेल, तेव्हा समाजाने त्यांचा स्वीकार करावा यासाठीही व्यवस्था करण्यात आली आहे. कारागृहातून सुटल्यानंतर समाजात ताठ मानेने जगता यावे, यासाठी त्यांना शासनाच्या विविध कल्याणकारी आणि स्वयंरोजगार योजनांचा थेट लाभ मिळवून देण्याकरिता मदत करण्यात येत आहे. बँक कर्ज, ओळखपत्रे आणि इतर कागदपत्रे मिळवून देण्याकरिता मदत करण्यात येत आहे.

एकंदरीत, गुन्हेगाराला केवळ शिक्षा न देता त्याचे माणूस म्हणून पुनर्वसन करणे आणि त्याला समाजाचा एक उपयुक्त घटक बनवणे, हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा हा प्रयोग महाराष्ट्राच्या सामाजिक आणि गृह विभागाच्या इतिहासातील एक मैलाचा दगड ठरत आहे.

**२०१७ ते २०२६ या कालावधीतील उपक्रमाविषयी थोडक्यात माहिती-** २०१७ ते २०२६ या कार्यकाळात हा उपक्रम अनेक कैद्यांपर्यंत पोहचला आहे. या उपक्रमांतर्गत ५ हजार ३०८ कैद्यांना जामीन आणि उच्च न्यायालयातील अपिलासाठी मदत करण्यात आली आहे. तसेच कायदेविषयक मदतीसाठी जिल्हा विधि सेवा प्राधिकरणाकडे ८ हजार ५७६ कैद्यांनी अर्ज केले आहेत. विविध कारागृहामध्ये २०५ कायदेविषयक जनजागृती आणि ३१८ आरोग्य शिबिरे घेण्यात आली.

उपक्रमातून २ हजार ७५८ कैद्यांनी विविध व्यावसायिक कौशल्य विकास उपक्रमांचे यशस्वी प्रशिक्षण पूर्ण केले आहे. राज्यातील ६ हजार ६८३ कैद्यांचा त्यांच्या मुलांची प्रत्यक्षरित्या संवाद साधण्यास मदत केली आहे. तसेच १ हजार ३७८ कैद्यांच्या मुलांना शिक्षणासाठी मदत करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे शासकीय योजनांच्या लाभ मिळवून देण्यासाठी ३ हजार ५४५ कैद्यांचे अर्ज सादर करण्यास सहाय्य करण्यात आले आहेत.

## *आता साखर होणार कडू*

**नवी दिल्ली/ पुणे :** पेट्रोल-डिझेल आणि एलपीजीच्या दरवाढीनंतर आता साखरेच्या किमतीत वाढ होणार आहे. अल निनोच्या संकटामुळे साखरेचे उत्पादन घटू शकते, असा निष्कर्ष एका अहवालातून व्यक्त करण्यात आल्याने साखरेच्या किमतीत मोठी वाढ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.भारत हा जगातील दुसरा सर्वात मोठा साखर निर्यातदार देश असला तरी भारतातील साखरेचा साठा ३० वर्षांतील नीचांकी पातळीवर पोहोचण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. पेट्रोलमध्ये वापरल्या जाणारया इथेनालच्या वाढत्या मागणीमुळे उसाची मागणी वाढली आहे. अल निनो आणि कमकुवत मान्सूनमुळे उस उत्पादनात घट होण्याचे प्रमाण बळावले आहे. त्यामुळे जागतिक साखर उत्पादनात लाखो टनांची घट होण्याची शक्यता आहे. २०२७-२८ च्या हंगामात पुरवठा आणखी कमी होउ शकतो. भारत जगातील सर्वात मोठ्या साखर उत्पादक देशांपैकी एक आहे. गरजा पूर्ण करण्यासाठी भारताने इतर देशांना होणारी निर्यात थांबवली, तर साखरेचे संकट अधिकच गंभीर होईल, अशी भीती वर्तवली जात आहे. उसाच्या संकटानंतर भारताला २०१६-१७ आणि २०१७-१८ मध्ये परदेशातून साखर आयात करावी लागली होती. अल निनोमुळे २०१५ मध्ये उसाची पेरणी कमी झाल्याने भारताने २००९ आणि २०१० मध्ये मोठ्या प्रमाणात साखर खरेदी केली होती.

# महिला सुरक्षेसाठी महिला सदस्यांची समिती स्थापन करणार -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई/प्रतिनिधी-** काही कॉर्पोरेट कंपन्यांमध्ये महिलांवरील छळाच्या घटनांबाबत विशिष्ट कार्यपद्धती दिसून येत आहे. त्यामुळे विद्यमान कायदे व नियमांचे पुनरावलोकन करण्याची गरज निर्माण झाली आहे. यासाठी विधानसभा व विधानपरिषदेतील महिला सदस्यांची संयुक्त समिती स्थापन करण्यात येणार असून ती महिला सुरक्षेसंदर्भातील कायदे, नियम आणि घडलेल्या घटनांचा अभ्यास करून आवश्यक सुधारणा सुचवेल. राज्य शासन त्या शिफारशींची अंमलबजावणी करेल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत दिली.नाशिक येथील टीसीएस कंपनीत महिला कर्मचा-यांचे लैंगिक व मानसिक शोषण केल्याबाबत विधानपरिषद सदस्य चित्रा वाघ यांनी प्रश्न उपस्थित केला. या चर्चेत डॉ. नीलम गो-हे, मनीषा कायंदे यांनी सहभाग घेतला. त्यावेळी ते बोलत होते.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, नाशिक येथील टीसीएस कंपनीतील महिला कर्मचा-यांच्या कथित लैंगिक व मानसिक शोषणाच्या प्रकरणाची चौकशी सुरू असून या प्रकरणात आतापर्यंत नउ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. संबंधित महिलेच्या तक्रारीवर तत्काळ कारवाई न करणा-या व्यवस्थापकाचाही आरोपी म्हणून समावेश करण्यात आला आहे. या प्रकरणात संबंधित महिलेवर लैंगिक शोषण आणि धर्मांतरासाठी दबाव टाकल्याचे आरोप आहेत. या संपूर्ण चौकशीत टीसीएस कंपनीने पूर्ण सहकार्य केले असून कंपनीचा या घटनेत कोणताही सहभाग आढळलेला नाही. राज्य शासन सूचवेल त्या सर्व उपाययोजना राबविण्याची तयारी कंपनीने दर्शविली आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, एका घटनेच्या आधारे टीसीएससारख्या देशातील अग्रगण्य भारतीय आयटी कंपनीच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणे योग्य ठरणार नाही. आयटी क्षेत्रात भारताला जागतिक स्तरावर ओळख मिळवून देण्यात आणि रोजगारनिर्मितीत कंपनीचे मोठे योगदान आहे.या प्रकरणाच्या तपासासाठी स्थापन करण्यात आलेल्या विशेष तपास पथकाने (एसआयटी) चौकशी जवळपास पूर्ण केली असून त्याच अहवालाच्या आधारे नउ एफआयआर दाखल करण्यात आले आहेत. सर्व प्रकरणांतील आरोपपत्रे दाखल झाल्यानंतर अंतिम निष्कर्ष समोर येतील, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. सदस्य मनीषा कायंदे यांनी उपस्थित केलेल्या सोलापूर येथील शासकीय आयटीआयमधील तक्रारीची तात्काळ चौकशी करण्यात येईल, तर तळेगाव दाभाडे येथील एका परदेशी कंपनीबाबतच्या तक्रारीची १५ दिवसांत वरिष्ठ स्तरावर चौकशी करून दोषींवर कारवाई केली जाईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## महायुतीची सरशी

महाराष्ट्रातील विधान परिषद निवडणुकांच्या निकालांमधून सत्ताधारी महायुतीने आपला एकतर्फी दबदबा सिद्ध करून विरोधकांचे वर्तुळ आणखी छोटे केले. एकूण १७ जागांसाठी झालेल्या या अत्यंत निवडणुकीत महायुतीने १६ जागांवर दणदणीत विजय मिळवला, तर खातेही न उघडता आल्यामुळे विरोधी पक्षांची महाविकास आघाडी या निवडणुकीत पूर्णपणे निष्प्रभ ठरली. १७ पैकी ६ जागांवर महायुतीचे उमेदवार आधीच बिनविरोध झाले होते. सोलापूर, जळगाव, सांगली-सातारा, नांदेड, नागपूर, भंडारा-गोंदिया, नाशिक, अमरावती, धाराशिव-लातूर-बीड, परभणी-हिंगोली आणि छत्रपती संभाजीनगर या उर्वरित ११ जागांसाठी १८ जून रोजी मतदान झाले होते. निकालामध्ये भाजपने सर्वाधिक ११ जागांवर विजय मिळवला, तर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला ३ जागा आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला २ जागा मिळाल्या. छ. संभाजीनगर-जालना स्थानिक स्वराज्य मतदारसंघ स्थापन झाल्यानंतर पहिल्यांदाच भाजपने येथे वर्चस्व प्रस्थापित केले. आजवर सहा निवडणुकांमध्ये काँग्रेस आणि उद्धव ठाकरेंचे वर्चस्व या मतदारसंघात राहिले; पण अतुल सावेंच्या नेतृत्वाखाली यावेळी भाजपने झेंडा फडकावला.नागपूर मतदारसंघात काँग्रेसकडे १७२ मतांचे संख्याबळ असूनही अतुल लोंढे यांना ४२ मते कमी मिळाल्याने भाजपच्या डॉ. राजीव पोतदार यांचा विजय झाला. अमरावतीमध्येही काँग्रेसच्या सदस्यांनी आणि मविआच्या घटक पक्षांनी महायुतीच्या उमेदवाराला मते देत त्यांचा विजय सुकर केला. नाशिकमध्ये महायुतीचे अधिकृत उमेदवार आणि शिंदे गटाचे नेते नरेंद्र दराडे यांचा पराभव झाला असला, तरी विजयी झालेले गोकुळ गीते यांना स्थानिक पातळीवर भाजपच्या नगरसेवकांनी आणि कार्यकर्त्यांनीच रसद पुरवल्याचे उघड झाले. गिरीश महाजन यांनी गीतेंच्या विजयासाठी केलेली मोर्चेबांधणी आघाडीच्या राजकारणात जोखमीची ठरू शकते. विरोधकांनी यावरून महायुतीत फूट पडल्याचे दावे करण्यास सुरुवात केली असली, तरी विजयाची एकामागून एक शिखरे पादाक्रांत करत जाताना अशा नाराजीच्या घटना सामंजस्याने हाताळत पुढे वाटचाल कशी करायची, हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना माहीत आहे. पक्षीय विस्तारासाठी द्वंद्व सुरू असले, तरी त्यांच्यातील मैत्रीचे बंधही तितकेच घट्ट आहेत. सत्तेच्या राजकारणामध्ये अशा गोष्टी घडतच असतात, याची जाणीव दोघाही नेत्यांना आहे.ठाणे, यवतमाळ, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग, पुणे, वर्धा-गडचिरोली-चंद्रपूर आणि अहिल्यानगरमध्ये विधान परिषदेचे उमेदवार बिनविरोध निवडून आणण्यामध्ये या दोघांची रणनीतीच यशस्वी ठरली. सातारा जिल्हा परिषद अध्यक्षपद निवडणुकीपासून महायुतीमधील भाजप आणि शिवसेना, राष्ट्रवादीमध्ये विसंवादाचे वातावरण निर्माण झाले होते. विधान परिषदेच्या निवडणुकांमध्ये याचे पडसाद उमटतील, अशी अपेक्षा विरोधक बाळगून होते; परंतु निकालांनी ही अपेक्षा फोल ठरवली. महाराष्ट्रातीलच नव्हे, तर देशातील सर्वच विरोधी पक्ष भाजपचे आणि खासकरून मोदी-शहा व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या राजकीय मुत्सद्देगिरीचे आकलन करण्यात अपयशी ठरत आहेत. पटलावर किंवा पृष्ठभागावर दिसणाऱ्या घटनांचा आधार घेत ते आपले आडाखे बांधत राहतात; पण पडद्यामागून हालणारी सूत्रे विरोधकांना धोबीपछाड करून निकालाचे पारडे फिरवतात. साताऱ्यातलेच उदाहरण घेतल्यास विधान परिषद निवडणुकांपूर्वी फडणवीसांनी शिंदे गटाचे शंभूराज देसाई आणि राष्ट्रवादीचे मकरंद पाटील यांच्याशी चर्चा करून महायुतीचा एकसंधपणा निवडणुकांमध्ये दिसलाच पाहिजे, यासाठीचे निर्देश दिले. त्याचा परिणाम निकालात दिसला.महाविकास आघाडीचे पराभूत उमेदवार अभयसिंह जगताप यांनी स्वतः ही बाब जाहीरपणे मान्य केली. फडणवीसांच्या जादुई करिष्म्याचा अनुभव राज्यासह विरोधी पक्षांनी २०२२ मध्ये घेतलेला आहे. तीन पक्षांचे महाविकास आघाडीचे सरकार सत्तेत असतानाही पहिल्या पसंतीच्या मतांचे शास्त्र अचूकपणाने अमलात आणतानाच विरोधकांच्या गोटात फूट पाडून त्यांनी आपले पाचही आमदार विजयी करून दाखवले होते. या निवडणुकांनंतरच एकनाथ शिंदे यांचे बंड घडून आले आणि महाविकास आघाडी सरकार कोसळले. आता तर मुख्यमंत्री या नात्याने राज्याची सर्व सूत्रे फडणवीसांच्या हाती आहेत. त्यामुळे एकेकाळी 'हारण्यासाठी का होईना; पण आम्ही निवडणूक लढतो' असे म्हणणाऱ्या भाजपचे सर्व उमेदवार विजयी होतील, यासाठी त्यांच्याकडून अभेद्य रणनीती आखली जाणे स्वाभाविकच होते.ताज्या निकालांनी विधान परिषदेतील ७३ पैकी ३५ आमदार भाजपचेच असल्यामुळे देवेंद्र फडणवीसांची महायुतीसह राज्याच्या राजकारणावरची पकड अधिक घट्ट झाली आहे. नाशिकचे विजयी अपक्ष उमेदवार गोकुळ गीते शिवसेनेत गेल्यामुळे त्यांचे संख्याबळ १२ वर गेले. आता राज्यपाल नियुक्त पाच सदस्यांची निवड झाल्यानंतर भाजप स्वबळावर बहुमताजवळ पोहोचलेला असेल. या विजयामुळे महायुतीचा विस्तार आणखी गतिमान होणार आहे. जिल्हा-तालुका पातळीवर नवे नेतृत्व तयार झाल्यामुळे कार्यकर्त्यांना नवी बळकटी मिळण्यास मदत होते. खरे पाहता, या निवडणुकांमध्ये प्रदीर्घ काळ काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे वर्चस्व होते. या निवडणुकांतील घोडेबाजार नेहमीच चर्चिला जायचा. विधान परिषदेवर वर्णी लावण्याचा गूळ लावून काँग्रेस-राष्ट्रवादीचे प्रादेशिक नेतृत्व अनेक वर्षे गुडघ्याला बाशिंग बांधून बसलेल्या नेत्यांना झुलवत राहायचे. काँग्रेस-राष्ट्रवादीने महामंडळे, विधान परिषद, पदवीधर मतदारसंघ यांच्या माध्यमातून तळागाळापर्यंत पक्षाचा विस्तार केला.आज भाजप तोच कित्ता गिरवत असला, तरी यामध्ये एक गुणात्मक फरक आहे. तो म्हणजे, नेत्यांची मक्तेदारी निर्माण न होऊ देता सातत्याने नव्या कार्यकर्त्यांना, उमेदवारांना संधी देऊन सत्तेच्या लोकशाहीकरणाचे तत्त्व अनुसरले जात आहे. दीर्घकालीन राजकारणाच्या दृष्टीने ही रणनीती यशस्वी ठरणारी आहे. याउलट स्थिती विरोधकांची आहे. निवडणुका जिंकण्यासाठीची विजिगीषू वृत्ती तर दूरच; पण ती लढण्यासाठीचा उत्साहही विरोधी पक्षांमध्ये दिसू नये, ही चिंताजनक बाब आहे. मविआमध्ये नाना पटोले वगळता एकाही नेत्याला या निवडणुकीचे गांभीर्य असल्याचे दिसले नाही. काही ठिकाणी सत्ताधाऱ्यांनाच अनुकूल भूमिका विरोधी पक्षांनी घेतली. उद्धव ठाकरे यांना या निवडणुकीचे कसलेच सोयरसूतक नाही, अशाप्रकारची त्यांची भूमिका राहिली. जळगावात उद्धवसेनेच्या उमेदवाराला पाच मते मिळाली, तर अमरावतीत काँग्रेसच्या उमेदवाराला शून्य मते मिळाली. विरोधी पक्षांची ही हाराकिरी अशीच राहिल्यास राज्यात वर्षाखेरीस होणाऱ्या पदवीधर आणि शिक्षक आमदारांच्या निवडणुका बिनविरोध पार पडल्यास नवल वाटण्याचे कारण नाही.

# युद्ध थांबले, भय कायम

**होर्मुझची समुद्रधुनी सर्वांसाठी कायम खुली राहणे हेच जागतिक शांतता आणि आर्थिक स्थैर्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. भविष्यातील संघर्ष टाळण्यासाठी शांतता, संवाद, सहकार्य आणि परस्पर सन्मान या मूल्यांवर आधारित आंतरराष्ट्रीय व्यवस्था उभारणे ही काळाची गरज आहे. अन्यथा सध्याच्या अनिश्चित आणि अस्थिर युद्धबंदीमुळे शाश्वत विकासाचा आणि शाश्वत शांततेचा मार्ग अधिकच धूसर होत जाईल.**

गेल्या २८ फेब्रुवारी २०२६ रोजी सुरू झालेल्या तिसऱ्या आखाती युद्धाला इस्रायलने 'रोअरिंग लायन' (गर्जणारा सिंह) असे नाव दिले होते, तर अमेरिकेने 'एपिक फ्युरी' म्हणजे 'महाभयानक महाकाव्य' असे सांकेतिक नाव दिले होते. स्वित्झर्लंडमध्ये झालेल्या युद्धबंदी करारानंतर हा गर्जणारा सिंह खरोखर शांत होईल का आणि डोनाल्ड ट्रम्प यांचे हे भयानक महाकाव्य सुखांत राहील की दुःखांत, हा वर्तमान जागतिक राजकारणतला सर्वाधिक चर्चेचा प्रश्न ठरला आहे. याखेरीजही आखाती युद्धातून काही नवे प्रश्न उभे राहिले आहेत. युद्धबंदी अनिश्चित आहे आणि शाश्वत विकासाचे लक्ष्यही युद्धामुळे अंधारात सापडले आहे. सारी मानवजात आणि सृष्टीच या अनिश्चिततेच्या भोवऱ्यात अडकली आहे. त्यामुळे या परिस्थितीचे नव्याने आकलन करण्याची गरज आहे.

१०७ दिवसांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर अखेर ६० दिवसांचा युद्धविराम झाला; पण हा दोन महिन्यांचा कालावधी म्हणजे नव्या वादळापूर्वीची शांतता तर नाही ना, अशी शंका येते. कारण, जी-७ परिषदेत बोलताना राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी 'इराणने जर शस्त्रसंधीतील अटींचे पालन केले नाही, तर आम्ही पुन्हा बॉम्बहल्ले सुरू करू,' असा सज्जड इशारा दिला. त्यामुळे युद्ध थांबले; पण युद्धाची भीती कायम अशी आज जगाची स्थिती झाली आहे.२१ व्या शतकात युद्ध सुरू करणे सोपे; पण युद्ध थांबविणे त्याहून अवघड आहे. कारण, युद्धामुळे प्रश्न सुटत नाहीत, उलट त्यांची गुंतागुंत वाढते. या सत्याची प्रचिती पुन्हा एकदा येत आहे. अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्ष आता एका महत्त्वाच्या वळणावर आहे. हा संघर्ष कायमचा थांबविण्यासाठी ठोस तरतुदी असलेला आणि उभयपक्षी मान्य होणारा करार कधी विकसित होतो, हा खरा प्रश्न आहे.

होर्मुझची समुद्रधुनी एकदा खुली केल्यानंतर ती तशीच सुरू राहील याची हमी कोण देणार? ती पुन्हा खुली ठेवण्यासाठी आणि बंदरांवरील निर्बंध हटविण्यासाठी ६० दिवसांचा सामंजस्य करार किती प्रभावी राहील आणि किती काळ टिकेल, याबाबत प्रश्नचिन्ह कायम आहे. यामुळे ही शस्त्रसंधी अत्यंत अस्थिर आणि चंचल असल्याचे दिसून येते. इराणचा अणू कार्यक्रम रोखण्याबाबत अमेरिकेला हवे असलेले आश्वासन आणि इस्रायलची लेबनॉनमधील सुरू असलेली युद्ध मोहीम यांसारखे गंभीर मुद्दे अद्याप अनुत्तरित राहिले आहेत. ६० दिवसांचा कालावधी घड्याळाचे काटे पुन्हा उलट्या दिशेने फिरवू शकतो.



इराणच्या युरेनियम संवर्धन कार्यक्रमाबाबत आणि प्रादेशिक सशस्त्र गटांबाबतच्या निर्बंधांबाबतचे प्रमुख मतभेद आजही कायम आहेत. ही चर्चा केवळ इराण आणि अमेरिका यांच्यापुरती मर्यादित नाही. त्यामध्ये इस्रायल हा त्रिकोणाचा तिसरा बिंदू अत्यंत महत्त्वाचा आणि नाजूक आहे. शिवाय पश्चिम आशियातील राजकीय गुंतागुंत या प्रश्नाला अधिक गंभीर बनवते. इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू वारंवार सांगतात की, अमेरिका आणि इराण यांच्यातील बोलणीच्या चौकटीला इस्रायल मुळीच बांधील नाही. त्यामुळे लेबनॉनवरील कारवाया थांबविण्यासाठी इस्रायल का म्हणून ऐकेल, असा त्यांचा प्रश्न आहे. यावर डोनाल्ड ट्रम्प यांनी नेतान्याहूंना वेडा, खुळा किंवा मूर्ख असे संबोधले असले, तरी आम्ही आमचा अजेंडा सुरूच ठेवू, असे इस्रायली नेतृत्वाचे म्हणणे आहे.

होर्मुझची समुद्रधुनी हा या वादाचा केंद्रबिंदू आहे. साठ दिवसांच्या युद्धबंदीमुळे या समुद्रधुनीतून व्यापार आणि वाहतूक पुन्हा खुली होईल. तथापि, दीर्घकालीन अटी मात्र कमालीच्या अस्पष्ट आणि धूसर आहेत. भविष्यकाळात इराणला वाहतूक शुल्क अथवा टोल आकारण्याची परवानगी दिली जाईल की नाही, याबाबत शंका आहे. युद्धात झालेले नुकसान भरून काढण्यासाठी अशा प्रकारचा महसूल मिळण्याचा अधिकार इराणला असावा, असे तेहरानला वाटते; परंतु अमेरिका त्याला कितपत प्रतिसाद देईल, याबाबत अनिश्चितता आहे.

इराणचा अणुऊर्जा कार्यक्रम आणि त्यावर अमेरिकेला लादावयाची बंधने हासुद्धा एक महत्त्वाचा वादाचा विषय आहे. या प्रश्नावरील कोंडी फोडण्यासाठी अमेरिका आग्रही आहे; मात्र इराणच्या अणुऊर्जा कार्यक्रमावर महत्त्वपूर्ण निर्बंध लादणे सोपे नाही. त्या बदल्यात इराण आपल्यावरील आर्थिक निर्बंध शिथिल करण्याची आणि अमेरिकेची नौदल नाकेबंदी उठविण्याची मागणी करत आहे. या मुद्द्यावर एकमत होईल की नाही, याबाबत शंका आहे.

अमेरिका सतत शत्रुत्वपूर्ण भूमिका घेत असेल, तर इराणने ते का सहन करावे, असा प्रश्न तेहरानकडून उपस्थित केला जात आहे. खरे तर, होर्मुझच्या आखातालगतच्या प्रदेशात इराणचे महत्त्वपूर्ण हितसंबंध आहेत. मग, तेथे सातत्याने नौदलाची उपस्थिती ठेवून नाकेबंदी करण्याचा अमेरिकेला कितपत अधिकार आहे, याबाबत वाद आहे. त्यातही भारतीय व्यापारी जहाजांवर झालेले हल्ले आणि त्यात गेलेले निष्पाप जीव नैतिक दृष्टिकोनातून गंभीर प्रश्न निर्माण करतात. अमेरिकेने आपले नौदल तेथे कायम ठेवले, तर भविष्यातही संघर्षाचे नवे बिंदू निर्माण होऊ शकतात. त्यामुळे इराणला वाटणारी भीती पूर्णपणे निराधार मानता येणार नाही.

पश्चिम आशियात प्रादेशिक सुरक्षेचे प्रश्न अधिकाधिक गुंतागुंतीचे बनत आहेत. इराणने अमेरिकेच्या लष्करी तळांवर हल्ले केल्यानंतर व्यापक स्थैर्याचा प्रश्न अधिक गंभीर बनला आहे. इस्रायल-इराण संघर्ष आणि हिजबुल्ला, हमास आणि इतर इराणसमर्थक सशस्त्र गट, संघटना यांच्या भूमिकेचे काय करायचे, हा मोठा प्रश्न आहे. इराणने या गटांना आपण समर्थन देणार नाही, याची स्पष्ट हमी दिली पाहिजे; परंतु इस्रायलने अभिवचन दिल्याखेरीज इराण हे करणार नाही. त्यामुळे मध्यपूर्वेतील प्रादेशिक तणावाची गुंतागुंत सुटण्याऐवजी अधिकच जटिल तर होणार नाही ना, अशी भीती कायम आहे. परिणामी, शाश्वत शांतता अजूनही दूर आहे. साठ दिवसांच्या या घड्याळाचे काटे सुलट्या दिशेने फिरतील की पुन्हा उलट्या दिशेने, याची हमी आज कोणीही देऊ शकत नाही. त्यामुळे या सामंजस्य कराराविषयीची अनिश्चितता वाढत आहे. एक व्यापक आणि बंधनकारक यंत्रणा निर्माण होत नाही, तोपर्यंत हा तोडगा म्हणजे केवळ कागदी कलमांची मांडणी ठरेल. विकसित केलेली व्यवस्था राबविण्याचे काम संयुक्त राष्ट्रसंघाकडे सोपविले जावे आणि तेथे शांतिसेना तैनात केली जावी. त्याशिवाय संघर्ष थांबणे अवघड आहे.

अमेरिका, इराण आणि इस्रायल यांच्यातील हा त्रिकोणी संघर्ष पश्चिम आशियाला उद्ध्वस्त करत आहे. तेथील पायाभूत सुविधांचा मोठ्या प्रमाणात विनाश होत आहे. शिवाय संयुक्त अरब अमिरात, बहरीन, कुवेत आणि ओमान यांसारख्या देशांवर इराणचे सातत्याने हल्ले झाल्यामुळे तेथील सरकारे आणि नागरिक कमालीचे त्रस्त झाले आहेत. दोघांच्या संघर्षात या संपूर्ण प्रदेशात मोठ्या प्रमाणात वित्तहानीला सामोरे जावे लागले आहे. अमेरिका जर या छोट्या देशांचे रक्षण करू शकत नसेल, तर या देशांनी आपल्या संरक्षणासाठी पर्यायी व्यवस्था विकसित करणे भाग आहे. खरे तर, अशाप्रकारच्या दीर्घकालीन संघर्षामुळे अमेरिकेचेही मोठे नुकसान होणार आहे; परंतु याची डोनाल्ड ट्रम्प यांना कितपत जाणीव आहे, हा प्रश्न उपस्थित होतो.

शंभर दिवसांच्या युद्धानंतर इराणमधील लोकजीवन मोठ्या प्रमाणात विस्कळीत झाले आहे. तेथे महागाईने कळस गाठला असून जीवनावश्यक वस्तूंसाठी जनतेला प्रचंड संघर्ष करावा लागत आहे. याबाबतच्या काही कथा अतिशयोक्ती वाटू शकतात; परंतु त्यामागील कठोर वास्तव दुर्लक्षित करता येणार नाही. नागरिकांचा वाढता संताप आणि त्यांच्या मनात निर्माण झालेला संशय हा युद्धबंदीविषयीच्या अनिश्चिततेमुळे अधिक तीव्र होत आहे. नेतेमंडळी या युद्धविरामाचे ढोल बडवीत असली, तरी पूर्णपणे युद्धबंदी लागू होत नाही तोपर्यंत अनिश्चितता संपणार नाही. युद्ध टाळण्यासाठी व्यापक आणि कठोर सामरिक यंत्रणा उभी केली पाहिजे. तसे झाले नाही, तर अनेक वर्षांच्या निर्बंधांमुळे आणि अलीकडील युद्धाच्या तणावामुळे आधीच अस्थिर आणि कठीण परिस्थितीत सापडलेल्या इराणी नागरिकांना आणखी मोठ्या संकटांना सामोरे जावे लागेल. त्यामुळे इराणमधील अनेक नागरिकांना अजूनही या युद्धबंदीबाबत कमालीची शंका वाटते. ही साठ दिवसांची शस्त्रसंधी अशीच पुढे चालू राहावी आणि युद्ध कायमचे थांबावे, अशी युद्धग्रस्त प्रदेशातील सामान्य नागरिकांची भावना आहे; परंतु दुर्दैवाने इराणमधील नेते असोत, अमेरिकेतील असोत किंवा इस्रायलमधील असोत, ते जमिनीवरील वास्तवाचा पुरेसा विचार करताना दिसत नाहीत.

वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमसारख्या संस्थांच्या मते, साठ दिवसांची युद्धबंदी तात्पुरती असण्याची शक्यता अधिक आहे. दीर्घकालीन स्वरूपात ती कशी राबविली जाईल यासाठी आवश्यक असलेली व्यापक यंत्रणा अद्याप विकसित झालेली नाही. इराणसमर्थक सशस्त्र गट आणि त्यांच्यावर कारवाया करणारे इस्रायली लष्कर यांच्यातील संघर्ष जोपर्यंत थांबत नाही, तोपर्यंत केवळ अमेरिकेने जाहीर केलेल्या युद्धबंदीला मर्यादित अर्थ राहतो. संयुक्त राष्ट्रसंघाने या युद्धबंदीचे स्वागत केले असले, तरी पुढील काळात केवळ एखाद्या मध्यस्थ देशावर किंवा तात्पुरत्या राजनैतिक प्रयत्नांवर अवलंबून न राहता अशी व्यापक यंत्रणा उभारणे आवश्यक आहे, जी शांतता निर्माण करेल आणि तिचे संरक्षणही करेल. दुर्दैवाने अद्याप त्या दिशेने ठोस पावले पडताना दिसत नाहीत. त्यामुळे प्रश्नांची गुंतागुंत वाढत आहे.

होर्मुझची समुद्रधुनी सर्वांसाठी कायम खुली राहणे हेच जागतिक शांतता आणि आर्थिक स्थैर्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. जगातील पुरवठा साखळी सुरळीत राहावी, सर्वांना पुरेसे इंधन उपलब्ध व्हावे आणि प्रत्येक देशाचे सार्वभौमत्व व सुरक्षा यांचा सन्मान राखला जावा, यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे. भविष्यातील संघर्ष टाळण्यासाठी शांतता, संवाद, सहकार्य आणि परस्पर सन्मान या मूल्यांवर आधारित आंतरराष्ट्रीय व्यवस्था उभारणे ही काळाची गरज आहे. अन्यथा सध्याच्या अनिश्चित आणि अस्थिर युद्धबंदीमुळे शाश्वत विकासाचा आणि शाश्वत शांततेचा मार्ग अधिकच धूसर होत जाईल.

**नेत्यांमध्ये विश्वासाचा अभाव**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे अत्यंत अनिश्चित आणि अनेकदा अप्रत्याशित भूमिका घेणारे नेते म्हणून ओळखले जातात. ते आज काय बोलतील आणि उद्या काय करतील, याचा नेम नसल्याची टीका वारंवार केली जाते. त्यांच्या अशा अनपेक्षित वक्तव्यांमुळे प्रश्न सुटण्याऐवजी अधिक गुंतागुंतीचे बनत आहेत आणि कराराचे भवितव्यही प्रश्नांकित बनले आहे. त्यामुळे या करारात किती कलमे आहेत, यापेक्षा त्यामध्ये परस्पर विश्वासाचा अभाव आहे, ही खरी समस्या आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या भेटीदरम्यान भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पश्चिम आशियातील शांतता प्रक्रियेबाबत केलेले वक्तव्य महत्त्वाचे आहे. त्यांनी शांततेसाठी सुरू असलेल्या प्रयत्नांचे स्वागत केले; परंतु त्याचबरोबर दोन्ही पक्षांनी वस्तुनिष्ठ भूमिका घेऊन संवाद आणि कूटनीतीच्या माध्यमातून पुढील वाटचाल करावी, अशी अपेक्षाही व्यक्त केली. दोन्ही पक्षांना जमिनीवरील वास्तव स्वीकारले पाहिजे. काही बाबतीत तडजोड करावी लागेल. अनेकदा एक पाऊल पुढे टाकण्यासाठी एक पाऊल मागे घ्यावे लागते. तसे झाले नाही, तर भविष्यातील व्यापक संघर्षाची शक्यता पूर्णपणे नाकारता येणार नाही.

## मा.प्रा.बी.टी.भाऊ देशमुख यांचे स्मारक विद्यापीठात उभारण्यात यावे

मा.प्रा.बी.टी. भाऊ देशमुख हे केवळ एक लोकप्रतिनिधी नव्हते, तर ते विदर्भाच्या अस्मितेचे,शिक्षक चळवळीचे, उच्च शिक्षण क्षेत्राचे आणि लोकहितवादी विचारांचे एक सशक्त प्रतीक होते. शिक्षक, प्राध्यापक, विद्यार्थी, शेतकरी, कर्मचारी आणि सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी त्यांनी आयुष्यभर निस्वार्थपणे संघर्ष केला. महाराष्ट्र विधान परिषदेतील त्यांच्या कार्यकाळात त्यांनी विदर्भाच्या अनुशेषाचा प्रश्न, सिंचनाचा प्रश्न, शिक्षण क्षेत्रातील समस्या आणि जनसामान्यांच्या वेदना सातत्याने व प्रभावीपणे मांडल्या.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ आणि उच्च शिक्षण क्षेत्राशी त्यांचे नाते अत्यंत जिव्हाळ्याचे होते. शिक्षक संघटनांच्या माध्यमातून त्यांनी शिक्षण क्षेत्राला नवी दिशा दिली. हजारो शिक्षक, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांच्या आयुष्याला त्यांनी प्रेरणेची दिशा दिली,त्यांचे व्यक्तिमत्त्व म्हणजे साधेपणा, मूल्यनिष्ठा, अभ्यासू वृत्ती, लोकशाहीवरील श्रद्धा आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी यांचा सुंदर संगम होता.

आज भाऊ आपल्यात नाहीत; परंतु त्यांचे विचार, त्यांचा संघर्ष, त्यांचे कार्य आणि त्यांनी दिलेली प्रेरणा चिरंतन आहे. अशा महान व्यक्तिमत्त्वाच्या स्मृती जतन करणे हे केवळ कर्तव्य नसून पुढील पिढ्यांप्रती आपली जबाबदारी आहे.म्हणूनच संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या परिसरात मा. प्रा. बी. टी. भाऊ देशमुख यांचे भव्य स्मारक उभारण्यात यावे, अशी अमरावतीकर नागरिकांची आणि असंख्य शिक्षक, प्राध्यापक, विद्यार्थी, माजी विद्यार्थी व नागरिकांची मनापासून मागणी आहे.हे स्मारक केवळ एका व्यक्तीची आठवण जपणारे ठरणार नाही, तर शिक्षण, सामाजिक बांधिलकी, लोकशाही मूल्ये आणि विदर्भाच्या विकासासाठी संघर्ष करणाऱ्या एका युगपुरुषाच्या कार्याचा प्रेरणास्रोत म्हणून भावी पिढ्यांना मार्गदर्शन करेल.

मा. प्रा. बी. टी. भाऊ देशमुख यांचे स्मारक संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात उभारून त्यांच्या कार्याला अभिवादन करण्यात यावे, हीच सर्व अमरावतीकरांची आणि विदर्भवासीयांची कृतज्ञ भावनेतून व्यक्त होत असलेली विनम्र अपेक्षा!

**नितीन पवित्रकार**
मो.९६६५३०९५८१

## बैलावरून तहसील कार्यालयात आलेला शेतकरी-व्यवस्थेच्या अपयशाची जिवंत साक्ष

राजुरा, जिल्हा चंद्रपूर येथील तहसील कार्यालयात एक शेतकरी चक्क बैलावर बसून आला आणि 'संपूर्ण कर्जमुक्ती झालीच पाहिजे, तीही विनाअट व विनाशर्ती!' अशी ठाम मागणी केली. अनेकांना हे दृश्य वेगळे, आश्चर्यकारक किंवा आंदोलनाचा एक अनोखा प्रकार वाटू शकतो. परंतु या घटनेकडे केवळ एक बातमी किंवा व्हायरल व्हिडिओ म्हणून पाहणे ही मोठी चूक ठरेल. कारण हा बैलावर बसलेला शेतकरी म्हणजे आजच्या भारतीय शेतीची, ग्रामीण अर्थव्यवस्थेची आणि सत्ताधाऱ्यांच्या अपयशी धोरणांची जिवंत साक्ष आहे.

स्वातंत्र्य मिळून जवळपास ८० वर्षे झाली. देशात उद्योगधंदे वाढले, महानगरे उभी राहिली, तंत्रज्ञानाने झेप घेतली,अब्जाधीशांची संख्या वाढली,पण अन्नदाता शेतकरी मात्र आजही कर्जाच्या ओझ्याखाली दबलेला आहे. ज्याच्या घामावर देशाची अर्थव्यवस्था उभी आहे, तोच शेतकरी आज तहसील कार्यालयात बैलावर बसून आपले दुःख मांडण्यास मजबूर झाला आहे, ही बाब अत्यंत वेदनादायक आहे.

शेतकऱ्यांच्या नावाने हजारो योजना जाहीर केल्या गेल्या.कर्जमाफीच्या घोषणा झाल्या.अनुदानांची आश्वासने दिली गेली.परंतु वास्तव काय आहे?शेतकऱ्यांच्या उत्पादनाला आजही उत्पादन खर्चावर आधारित रास्त भाव मिळत नाही. बियाणे, खते, कीटकनाशके, वीज,मजुरी आणि इंधन यांचे दर सातत्याने वाढत आहेत,पण शेतमालाचे दर मात्र अस्थिर आहेत. परिणामी शेतकरी अधिकाधिक कर्जबाजारी होत आहे.

जर गेल्या ६०-७० वर्षांत शेती आधारित उद्योगधंदे मोठ्या प्रमाणावर उभे राहिले असते, ग्रामीण भागात प्रक्रिया उद्योगांची साखळी निर्माण झाली असती, कापूस, सोयाबीन,डाळी, फळे, भाजीपाला यावर आधारित उद्योग गावागावात पोहोचले असते, तर आज शेतकऱ्याला आपल्या मालाला मूल्यवर्धन करून अधिक उत्पन्न मिळाले असते.दुर्दैवाने असे घडले नाही. ग्रामीण विकासाच्या घोषणा झाल्या, पण ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा मजबूत करण्यासाठी आवश्यक धोरणात्मक निर्णय घेतले गेले नाहीत.

आजही अनेक शेतकरी आपल्या मालाला भाव नसल्यामुळे रस्त्यावर फेकून देतात. कधी कांदा रडवतो, कधी सोयाबीन, कधी कापूस, तर कधी टोमॅटो. उत्पादन वाढले तरी संकट, उत्पादन कमी झाले तरी संकट. ही परिस्थिती कोणत्याही प्रगत अर्थव्यवस्थेची लक्षणे नाहीत.शेतकरी बैलावर बसून तहसील कार्यालयात आला, यामागे केवळ प्रतीकात्मक आंदोलन नाही तर व्यवस्थेला विचारलेला एक गंभीर प्रश्न आहे. ज्या देशात शेतकरी आधुनिक कृषी उद्योजक बनायला हवा होता, त्या देशात तो अजूनही कर्जमाफीसाठी दारोदार भटकत आहे. ज्या शेतकऱ्याच्या हातात आधुनिक साधने असायला हवी होती, त्याला आजही आपले दुःख मांडण्यासाठी बैलाची साथ घ्यावी लागत आहे.

खरे तर हा शेतकरी बैलावर नाही तर व्यवस्थेच्या अपयशावर स्वार होऊन तहसील कार्यालयात पोहोचला आहे. त्याच्या मागणीकडे केवळ कर्जमाफीच्या चष्म्यातून पाहता येणार नाही. ही मागणी आहे शेतकऱ्याला न्याय देण्याची, त्याला सन्मानाने जगण्याची संधी देण्याची, त्याच्या मालाला योग्य भाव देण्याची आणि शेतीला खऱ्या अर्थाने फायदेशीर व्यवसाय बनविण्याची.

जर शेतीमालाला हमीभाव, निर्यात स्वातंत्र्य, बाजारपेठेचे स्वातंत्र्य, शेती आधारित उद्योगांचे जाळे, साठवणूक व प्रक्रिया सुविधा आणि शेतकरी केंद्रित आर्थिक धोरणे राबवली गेली असती तर आज हा गरीब शेतकरी बैलावर बसून तहसील कार्यालयात आला नसता. उलट तो घोड्यावर बसून, स्वतःच्या कष्टाने उभ्या केलेल्या समृद्धीचा अभिमान बाळगत थाटात फिरत असता.

शेतकरी कर्जमुक्ती हा अंतिम उपाय नाही, तर शेतकऱ्याला कायमस्वरूपी आर्थिक स्वातंत्र्य देणारी व्यवस्था निर्माण करणे हा खरा उपाय आहे. अन्यथा बैलावरून आलेला हा एक शेतकरी उद्या लाखो शेतकऱ्यांच्या असंतोषाचे प्रतीक ठरेल. आज आवश्यकता आहे ती शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे दयेने नव्हे तर न्यायाच्या दृष्टीने पाहण्याची. कारण शेतकरी भीक मागत नाही, तो आपल्या श्रमाचा योग्य मोबदला मागत आहे. आणि जोपर्यंत हा न्याय मिळत नाही, तोपर्यंत अशा आंदोलनांची तीव्रता वाढतच जाणार आहे.

**विलास तुळशीराम ताथोड**
राज्य कार्यकारणी सदस्य
शरद जोशी द्वारा स्थापित शेतकरी संघटना, अकोला
मो.७०२०५८५२६१

गुरूवार, दि. २५ जून २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com
जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# पुसदमध्ये गोळीबार प्रकरणाचा 12 तासांत छडा..!

## एलसीबीची धडक कारवाई,दोन आरोपी जेरबंद

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पुसद, दि. २४ : पुसद शहरातील सार्वजनिक बांधकाम विभाग (PWD) कार्यालयासमोर जुन्या वादातून झालेल्या गोळीबार प्रकरणाचा अवघ्या काही तासांत छडा लावत स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) दोन आरोपींना अटक केली आहे. या घटनेमुळे परिसरात निर्माण झालेली दहशत आणि कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर ठरला असताना पोलिसांनी दाखविलेल्या तत्परतेमुळे आरोपींना पळ काढण्याची संधी मिळाली नाही.**




मिळालेल्या माहितीनुसार, २३ जून रोजी सायंकाळी साडेचारच्या सुमारास सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालया समोर दोन गटांमध्ये जुना वाद उफाळून आला. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले आणि त्यानंतर एका गटाकडून गावठी पिस्तुलातून गोळीबार करण्यात आल्याची घटना घडली. या प्रकारामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. या प्रकरणी वजाहद अली खान ऊर्फ अंजूम खान यांच्या तक्रारीवरून वसंतनगर पोलीस ठाण्यात अब्दुल वाजिद अब्दुल रऊफ, अब्दुल राजीक अब्दुल रऊफ आणि शेख फहिम शेख करीम यांच्याविरुद्ध विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आरोपींच्या तात्काळ अटकेचे आदेश दिले. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गुप्त माहितीच्या आधारे सहारा पार्क गार्डन परिसरात पहाटेच्या सुमारास सापळा रचला. पोलिसांनी अत्यंत शिताफीने कारवाई करत अब्दुल वाजिद (वय ४०) आणि अब्दुल राजीक (वय ३३), दोघेही रा. रहेमनगर, वसंतनगर, पुसद यांना ताब्यात घेतले. अटक करण्यात आलेल्या आरोपींना पुढील तपासासाठी वसंतनगर पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, एलसीबीचे पोलीस निरीक्षक सतीश चवरे तसेच वसंतनगरचे पोलीस निरीक्षक दिनेश झांबरे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई पार पडली. दरम्यान, गोळीबारासाठी वापरण्यात आलेले शस्त्र, घटनेमागील नेमके कारण आणि फरार आरोपींचा शोध याकडे तपास यंत्रणेचे लक्ष लागले असून प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

# माहिती दडपण्याचा प्रशासनाचा प्रयत्न..!

## नगरसेवक डॉ. नीरज वाघमारे यांचे ठिय्या आंदोलन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २४ :** नगर परिषद यवतमाळ प्रशासनाकडून लोकप्रतिनिधींना आवश्यक माहिती देण्यास होत असलेल्या कथित टाळाटाळीविरोधात नगरसेवक तथा गटनेते डॉ. नीरज वाघमारे यांनी मंगळवारी विभाग प्रमुखांच्या दालनाबाहेर ठिय्या आंदोलन करून तीव्र नाराजी व्यक्त केली. बांधकाम, नियोजन, आरोग्य, विद्युत व पाणीपुरवठा विभागांकडे विविध जनहिताच्या विषयांवरील माहिती मागवूनही प्रशासनाकडून समाधानकारक प्रतिसाद मिळत नसल्याचा आरोप त्यांनी केला.




नगरसेवक म्हणून माहिती मागविण्याचा कायदेशीर अधिकार असताना संबंधित विभागांकडून वारंवार टाळाटाळ होत असल्याने अखेर सकाळी ११ वाजता आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागल्याचे डॉ. वाघमारे यांनी सांगितले. यावेळी नगरसेविका मीराताई वीर यांनीही आंदोलनात सहभाग घेत प्रशासनाने लोकप्रतिनिधींना वेळेत माहिती उपलब्ध करून देण्याची मागणी केली. डॉ. वाघमारे म्हणाले, नागरिकांच्या प्रश्नांवर प्रभावीपणे काम करण्यासाठी प्रशासनाकडील माहिती अत्यावश्यक असते. मात्र माहितीच उपलब्ध होत नसेल तर लोकप्रतिनिधींना जनतेसमोरील जबाबदाऱ्या पार पाडणे कठीण होते. प्रशासनाने पारदर्शकतेची भूमिका स्वीकारून मागितलेली माहिती तात्काळ द्यावी, अशी मागणी त्यांनी केली.लोकप्रतिनिधींना माहिती नाकारण्यामागे नेमके काय दडले आहे, असा सवाल उपस्थित करत नागरिकांच्या हितासाठी व पारदर्शक प्रशासनासाठी संघर्ष सुरूच राहणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला.

# पाटणबोरीत १३ तास वीज गुल..!

## पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांची भटकंती

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पाटणबोरी, दि. २४ :** तालुक्यातील सर्वात मोठ्या गावांपैकी एक असलेल्या पाटणबोरी येथे वारंवार खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे नागरिक त्रस्त झाले असून, सोमवारी रात्री गेलेली वीज तब्बल १३ तासांनंतर पूर्ववत झाल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागला. पाटणबोरी येथे स्वतंत्र ३३ केव्हीचे वीज उपकेंद्र (पॉवर हाऊस) असतानाही दिवसातून अनेक वेळा वीजपुरवठा खंडित होत असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे.



वारंवार होणाऱ्या वीज खंडितीमुळे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला असून, नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, दिनांक २२ जून २०२६ रोजी रात्री सुमारे ११:३० वाजता खंडित झालेला वीजपुरवठा तब्बल १३ तासांनंतर सुरू झाला. या कालावधीत अनेकांचे मोबाईल बंद पडले, पाणीपुरवठा विस्कळीत झाला तसेच दैनंदिन कामांवरही परिणाम झाला. नागरिकांनी असा आरोप केला आहे की, संबंधित विभागाकडून या समस्येकडे गांभीर्याने पाहिले जात नसल्याने वारंवार वीजपुरवठा खंडित होण्याच्या घटना घडत आहेत. यापूर्वीही अनेक वेळा या संदर्भात बातम्या प्रसिद्ध करण्यात आल्या, मात्र वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अद्याप ठोस उपाययोजना केल्या नसल्याची खंत नागरिकांनी व्यक्त केली आहे.या संदर्भात वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष देऊन वारंवार होणारी वीज खंडिती थांबविण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अन्यथा किसान सभेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा कॉम्रेड चंद्रशेखर सिडाम यांनी दिला आहे.

# प्रभाग क्र. २७ विकासापासून वंचित..! घनश्याम नगरातील नागरिकांचा संताप

✦जनमाध्यम | प्रतिनिधी१

**यवतमाळ, दि. २४ :** प्रभाग क्र. २७ अंतर्गत घनश्याम नगर येथील तुटलेली व बुजलेली नाली, साचलेले सांडपाणी तसेच इतर नाल्या व रस्त्यावर नागरी समस्यांबाबत नागरिकांनी आज नगराध्यक्ष व उपाध्यक्ष यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. मागील दोन वर्षांपासून नालीची दुरवस्था असून सांडपाण्याचा निचरा होत नसल्याने परिसरात दुर्गंधी पसरत आहे. पावसाळ्यापूर्वी तातडीने नाली दुरुस्त करून सिमेंट कॉँक्रीट रपटा अथवा मोठे सिमेंट पाईप बसविण्याची मागणी नागरिकांनी केली.



तसेच प्रभागातील अनेक रस्ते खड्डेमय झाले असून अनेक नाल्यांचीही अवस्था जीर्ण झाली आहे. त्यामुळे नवीन रस्ते व नाल्यांच्या बांधकामासाठी तातडीने निधी उपलब्ध करून कामे हाती घेण्याची मागणी करण्यात आली. नागरिकांनी यावेळी नाराजी व्यक्त करत सांगितले की, प्रभागातील नगरसेवक व नगरसेविका समस्या जाणून घेण्यासाठी अथवा त्यांचे निराकरण करण्यासाठी परिसरात फिरकत नाहीत. विशेष म्हणजे, नियोजन सभापती पदावर प्रतिनिधित्व असूनही प्रभागासाठी विशेष निधी मंजूर करण्यात अपयश आल्याचा आरोपही नागरिकांनी केला. नगराध्यक्ष व उपाध्यक्ष यांनी लवकरच पाहणी करून प्रभागातील समस्या सोडविण्याचे आश्वासन दिले. यावेळी कैलास मेश्राम, निलेश मानकर व सामाजिक कार्यकर्ते दिनेश हरणे उपस्थित होते.

# थोडक्यात

## कळंब तालुक्यात दोन शेतमजुरांचा जागीच मृत्यू, एक युवक गंभीर जखमी

**कळंब :** कळंब तालुक्यातील मौजा उमरी येथे सोमवारी दुपारी सुमारे ४ वाजताच्या सुमारास शेतात काम सुरू असताना आकाशीय वीज कोसळून दोन जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर एक युवक गंभीर जखमी झाल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, मौजा उमरी येथील गट क्रमांक ५११/१, क्षेत्र ०.९१ हेक्टर आर असलेल्या शेतात ही दुर्घटना घडली. या घटनेत भीमराव रामभाऊ लाटकर (वय ५५ वर्षे) आणि निखिल वाल्मिक भोयर (वय ३२ वर्षे), दोघेही रा. उमरी, यांचा जागीच मृत्यू झाला. तर साहील भीमराव लाटकर (वय २० वर्षे) हा गंभीर जखमी झाला असून त्याला तातडीने उपचारासाठी यवतमाळ येथे हलविण्यात आले आहे. अचानक कोसळलेल्या विजेमुळे परिसरात शोककळा पसरली असून गावकऱ्यांनी घटनास्थळी मोठी गर्दी केली. महसूल प्रशासनाने घटनेची प्राथमिक नोंद घेतली असून पुढील पंचनामा आणि मदत प्रस्तावाची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या दुर्दैवी घटनेमुळे उमरी गावावर शोककळा पसरली असून मृतांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. आकाशीय वीज कोसळण्याच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी आणि शेतमजुरांनी पावसाळ्यात अधिक सतर्क राहण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

## महेश नवमी,वंशोत्पत्ती दिन उत्साहात समारोप

**उमरखेड :** माहेश्वरी समाजाच्या वंशोत्पत्ती दिनानिमित्त महेश नवमी उत्सव शहरातील स्व. शेठ गो. सो. सारडा राजस्थानी भवन येथे १३ ते २३ जूनदरम्यान विविध सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. महेशोत्सवा निमित्त बालसंस्कार शिबिर, क्रीडा स्पर्धा, व्यापारविषयक चर्चासत्र, आनंदमेळा, स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, शिवभजन स्पर्धा, रक्तदान व रक्ततपासणी शिबिर आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. महेश नवमीच्या दिवशी बसवेश्वर संस्थानातील महादेव मंदिरात पूजन व अभिषेक करण्यात आला. त्यानंतर ग्रामीण रुग्णालयात फळवाटप करून सामाजिक बांधिलकी जपण्यात आली. सायंकाळी काढण्यात आलेल्या भव्य शोभायात्रेत समाजातील महिला, पुरुष, युवक व बालकांनी पारंपरिक वेशभूषेत सहभाग घेत शहराचे लक्ष वेधले. मुख्य समारंभात जिल्हा माहेश्वरी संघटनेचे अध्यक्ष विजयानंद भुतडा अध्यक्षस्थानी होते, तर प्रेरक वक्ते कमलजी बागडी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी विविध स्पर्धांतील विजेत्यांचा गौरव करण्यात आला. तसेच यंदाचा 'महेश भूषण' पुरस्कार माजी नगराध्यक्ष स्व. सुरेशचंद्र जेठमलजी माहेश्वरी यांना मरणोत्तर प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाची सांगता महाआरती व महाप्रसादाने झाली.

## शिवरामजी मोघे येथे जागतिक योग दिन साजरा

**पांढरकवडा :** शिवरामजी मोघे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, केळापूर येथे राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभागाच्या वतीने जागतिक योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अजय सोळंके होते. योग तज्ज्ञ डॉ. विनोद चव्हाण यांच्या उपस्थितीत प्रा. पुरुषोत्तम उदार यांनी विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचाऱ्यांना विविध योगासने, प्राणायाम आणि योगाचे शारीरिक-मानसिक आरोग्यातील महत्त्व पटवून दिले. अध्यक्षीय भाषणात डॉ. सोळंके यांनी योग ही निरोगी व संतुलित जीवनशैली असल्याचे सांगितले. कार्यक्रमात मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. आयोजनासाठी एनएसएस कार्यक्रम अधिकारी डॉ. अमर वंजारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# काळी (दौ.) येथे अप्पर तहसील कार्यालयाची मागणी..!

## संध्या रणवीर यांचे महसूल मंत्र्यांना निवेदन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**महागाव, दि. २४ :** महागाव तालुक्यातील काळी (दौ.) या तालुकादर्जा प्रस्तावित गावात अप्पर तहसील कार्यालय स्थापन करण्यात यावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्या संध्या संदेश रणवीर यांनी महसूल मंत्री तसेच अमरावती विभागीय आयुक्त यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



हे निवेदन तहसीलदार महागाव यांच्या मार्फत सादर करण्यात आले. राज्य शासनाने अलीकडेच ६९ अप्पर तहसील कार्यालयांना मंजुरी दिली असून यवतमाळ जिल्ह्यातील काही मंडळांचा त्यात समावेश करण्यात आला आहे. मात्र, तहसील दर्जासाठी प्रस्तावित असलेल्या काळी (दौ.) मंडळाला वगळण्यात आल्याने या भागावर अन्याय झाल्याची भावना नागरिकांमध्ये आहे, असे रणवीर यांनी नमूद केले.काळी (दौ.) मंडळाचे राजकीय, भौगोलिक व प्रशासकीय विभाजन झाल्यामुळे नागरिकांना विविध शासकीय कामांसाठी अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे महागाव तालुक्याचे क्षेत्रफळ, ग्रामीण भागातील नागरिकांची गैरसोय व प्रशासकीय सुलभता लक्षात घेऊन काळी (दौ.) येथे अप्पर तहसील कार्यालय तातडीने मंजूर करावे, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

# पीक कर्जासाठी सिबिलची अट नाही, शेतकऱ्यांना तात्काळ कर्ज द्या

## जिल्हाधिकाऱ्यांचे बँकांना स्पष्ट निर्देश

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २४ :** खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना वेळेत आर्थिक मदत मिळावी यासाठी पीक कर्ज मंजुरी प्रक्रियेला गती देण्याचे निर्देश जिल्हाधिकारी विकास मीना यांनी बँक अधिकाऱ्यांना दिले. महसूल भवन येथे झालेल्या जिल्हा सल्लागार समितीच्या बैठकीत त्यांनी शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य देण्याची भूमिका स्पष्ट केली. जिल्हाधिकारी मीना म्हणाले की, एल निनोच्या संभाव्य परिणामांमुळे शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागू शकतो.




त्यामुळे पीक कर्जासाठी अर्ज करणाऱ्या शेतकऱ्यांना सिबिल स्कोअरची अट न लावता कर्ज मंजूर करावे. वन टाईम सेटलमेंट (ओटीएस) केलेल्या शेतकऱ्यांनाही प्राधान्याने कर्जपुरवठा करावा. पशुपालकांसाठीही विशेष कर्ज मोहीम राबविण्याचे निर्देश त्यांनी दिले. बैठकीत प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, मुद्रा योजना, पीएम स्वनिधी, प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा, सुरक्षा विमा, जनधन व अटल पेन्शन योजनेच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला. प्रलंबित कर्ज प्रकरणे व तक्रारी तातडीने निकाली काढण्याचे आदेशही देण्यात आले. यंदाच्या खरीप हंगामासाठी जिल्ह्याला २२०० कोटी रुपयांच्या पीक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट देण्यात आले असून आतापर्यंत ८७१ कोटी रुपयांचे कर्ज वितरित झाले आहे. उद्दिष्टपूर्तीसाठी सर्व बँकांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले. बैठकीस विविध विभागांचे अधिकारी, नाबार्ड व बँक प्रतिनिधी उपस्थित होते.

# दमदार पावसाने दिलासा; पेरणीला वेग, मात्र बियाणे व कर्जाच्या प्रश्नांनी शेतकरी चिंतेत

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २४ :** यवतमाळ जिल्ह्यासह परिसरात गेल्या दोन-तीन दिवसांपासून झालेल्या दमदार पावसामुळे शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह आणि जोरदार वाऱ्यांसह झालेल्या पावसामुळे खरीप हंगामातील पेरणीच्या कामांना वेग आला असून शेतकरी शेतात उतरू लागले आहेत. दीर्घकाळ पावसाची प्रतीक्षा करणाऱ्या शेतकऱ्यांना अखेर दिलासा मिळाला आहे.



पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असून गेल्या काही दिवसांपासून असलेल्या उष्णतेच्या लाटेपासून नागरिकांचीही सुटका झाली आहे. आकाशात ढगांची गर्दी, विजांचा कडकडाट आणि सततच्या पावसामुळे संपूर्ण परिसरात प्रसन्न वातावरण निर्माण झाले आहे. मात्र, काही शेतकऱ्यांनी पावसाच्या अपेक्षेने यापूर्वीच धूळपेरणी केली होती. त्यानंतर पुरेसा पाऊस न झाल्याने कपाशीसह इतर पिकांचे बियाणे उगवले नाही. परिणामी अनेकांना आता नव्याने पेरणी करावी लागणार असून वाढत्या बियाणे दरांमुळे आर्थिक भार वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. यावर्षी कमी पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आल्याने कमी पाण्यात येणारी पिके घेण्याच्या शासनाच्या सूचनांमुळे शेतकरी संभ्रमावस्थेत आहेत. त्यातच कर्जमाफीचा प्रश्न प्रलंबित असून नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना जाहीर करण्यात आलेली ५० हजार रुपयांची प्रोत्साहन रक्कम अद्याप मिळालेली नसल्याने नाराजी व्यक्त होत आहे. दरम्यान, जिल्हाधिकारी विकास मीना यांनी बँकांना शेतकऱ्यांची पीक कर्ज प्रकरणे प्राधान्याने मंजूर करण्याचे निर्देश दिले आहेत. जिल्हा सल्लागार समितीच्या बैठकीत शेतकऱ्यांचे सिबिल गुणांकन ग्राह्य न धरता तातडीने पीक कर्ज वितरित करण्याचा निर्णय घेण्यात आला असून यामुळे शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# तलाठी निलंबन कारवाईच्या निषेधार्थ तलाठ्यांचे धरणे आंदोलन.!

## काळ्या फिती लावून शासनाचा केला निषेध.

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पुसद, दि. २४ :** चार तलाठ्यांवर सूडबुद्धीने केलेल्या कारवाईचा निषेध म्हणून मंगळवारी पुसद तलाठी संघटनेने आंदोलन केले. मंगळवारी विदर्भ पटवारी संघाच्यावतीने आक्रमक भूमिका घेत जिल्ह्यात १६ तालुक्यातही धरणे आंदोलन करण्यात आले.



नेर तालुक्यातील चार ग्राम महसूल अधिकाऱ्यांवर जिल्हा प्रशासनाकडून सूडबुद्धीने कारवाई करण्यात आल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. विदर्भ पटवारी संघाचे जिल्हाध्यक्ष भरत पिसे यांच्यावर जाणीवपूर्वक करण्यात आलेल्या निलंबनाचा निषेध म्हणून पुसद तालुक्यातील सर्व पटवाऱ्यांनी काळ्या फिती लावून या आंदोलनात सहभाग घेतला. यापूर्वी १८ जून रोजी जिल्हाधिकाऱ्यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले होते नेर तहसीलदारांची सखोल चौकशी करण्यात यावी, ग्राम महसूल अधिकाऱ्यांचे थकित वेतन त्वरित अदा करण्यात यावे, जिल्ह्यातील ग्राम महसूल अधिकाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांची पूर्तता करण्यात यावी आदी मागण्या निवेदनातून करण्यात आल्या. मागण्या मान्य न केल्यास संपूर्ण जिल्ह्यात तीव्र स्वरुपात कामबंद आंदोलन करण्यात येईल असा इशारा झाला होता. ती कारवाई जिल्हाधिकारी यांनी ठरवून करण्यात आलेली असल्याचे पटवारी संघांचे म्हणणे आहे. अन्यायकारक केलेल्या कारवाई मुळे ग्राम महसूल अधिकारी संवर्गाचे मनोधैर्य खचलेले असुन संपूर्ण संवर्गात असंतोषाची भावना निर्माण झाली आहे. या अन्यायकारक निलंबनाचा उपविभाग शाखा पुसद/तहसील येथे जाहीर निषेध नोंदवला आहे.२३जून रोजी मंगळवारी झालेल्या आंदोलनात उपस्थित संपूर्ण पुसद तालुक्यातील ग्राम महसूल अधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# परिवहन मंत्र्यांच्या हस्तक्षेपाने आरटीओ कर्मचाऱ्यांचा संप मागे

## प्रलंबित मागण्यांवर सकारात्मक चर्चा; राज्यातील आरटीओ सेवा पूर्ववत

**अमरावती/का.प्र.**

गेल्या आठ दिवसांपासून सुरू असलेला राज्यातील मोटार वाहन विभाग (आरटीओ) कर्मचाऱ्यांचा बेमुदत संप अखेर मागे घेण्यात आला असून, आज पासून राज्यभरातील आरटीओ कार्यालयांमधील कामकाज सुरळीतपणे सुरू होणार आहे. परिवहन मंत्री मा. ना. प्रताप सरनाईक यांनी संघटनेच्या प्रतिनिधींशी सकारात्मक चर्चा करून प्रलंबित मागण्यांबाबत आश्वासक भूमिका घेतल्याने हा तोडगा निघाला.

आरटीओ कर्मचारी संघटनेने सेवा प्रवेश नियम, पदोन्नती, पदनाम बदल, सरळसेवा नियुक्ती, तसेच आश्वासित प्रगती योजनेसह विविध प्रलंबित मागण्यांसाठी १६ जूनपासून बेमुदत संप पुकारला होता. या संपामुळे राज्यातील वाहन नोंदणी, परवाना, कर वसुली आणि इतर अनेक सेवा प्रभावित झाल्या होत्या.

संपाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील अनेक आमदार व खासदारांनी परिवहन मंत्र्यांकडे कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेण्याची मागणी केली होती. तसेच विविध माध्यमांतून या प्रश्नाला मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी मिळाल्याने शासनावरही निर्णय घेण्यासाठी दबाव वाढला होता.

सोमवारी मंत्रालयात झालेल्या बैठकीत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा केली.

**संघटनेचे राज्य उपाध्यक्ष तथा अमरावती विभागीय अध्यक्ष अनिल मानकर यांनी सांगितले की, शासनाने मागण्यांबाबत गांभीर्य दाखवून सकारात्मक चर्चा केल्याने आंदोलन मागे घेण्याचा निर्णय घेण्यात आला. जनतेची गैरसोय टाळणे आणि विभागीय कामकाज पूर्वपदावर आणणे हे संघटनेचेही प्राधान्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.**

यावेळी पदोन्नतीच्या प्रश्नावर तातडीने कार्यवाही करण्याचे तसेच इतर मागण्यांबाबत निश्चित कालमर्यादेत निर्णय घेण्याचे आश्वासन देण्यात आले. परिवहन आयुक्त स्तरावरही प्रलंबित प्रश्न निकाली काढण्यासाठी विशेष बैठक घेण्याचे ठरविण्यात आले आहे.

शासनाकडून मिळालेल्या लेखी व तोंडी आश्वासनांनंतर संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी संप स्थगित करण्याचा निर्णय घेतला.

**संप मागे घेतल्यानंतर आरटीओ कार्यालयांतील कामकाज पूर्ववत सुरू होण्याची प्रक्रिया सुरू झाली असून, प्रलंबित प्रकरणांचा निपटारा प्राधान्याने करण्यात येणार आहे. त्यामुळे वाहनधारकांना दिलासा मिळणार असून, विभागाच्या महसूल वसुलीलाही गती मिळणार आहे. त्यामुळे राज्यातील सर्व आरटीओ कार्यालयांतील सेवा पूर्ववत सुरू होतील, अशी माहिती मोटर वाहन विभाग कर्मचारी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष तथा अमरावती विभागीय आरटीओ संघटनेचे अध्यक्ष अनिल मानकर यांनी दिली आहे.**

# सावरखेड पिंगळाईत विजेचा लपंडाव

**लेहेगाव/वार्ताहर**

वीज वितरण कंपनी अंतर्गत येणाऱ्या सावरखेड पिंगळाई गावठाण फिडरवर अनेक दिवसापासून विजेता लपंडाव चालू असून गावातील नागरिकांना रात्र रात्रभर वीज नसल्यामुळे त्रासाला सामोरे जावे लागते.भरमसाठ बिल भरून सुद्धा नागरिकांना हा विजेच्या लपंडावाचा त्रास सहन करावा लागतो.

विजेच्या लपंडावाचा त्रास जर बंद झाला नाही तर सावरखेड पिंगळाई फिडर वरील नागरिकांना आंदोलन करावे लागेल असा इशारा देण्यात आला आहे.

येथील नागरिकांना दरवर्षी पावसाळ्यात विजेच्या लपंडावाचा मोठ्या प्रमाणात त्रास होतो. रात्र रात्र अंधारात काढावी लागते त्यामुळे विद्यार्थ्यांना सुद्धा मोठा परिणामाला तोंड द्यावे लागते आणि सोबतच वृद्ध नागरिक आणि लहान बालकांना सुद्धा या विजेच्या लपंडावाना मोठ्या प्रमाणात त्रास होतो. तरी या संदर्भात लेहेगाव वीज वितरण कंपनीचे कनिष्ठ अभियंता यांना अनेकदा या संदर्भात लेखी अर्जाद्वारे निवेदन दिले आहे. परंतु या निवेदनाचा अजून पर्यंत काहीच फायदा झाला नाही. वीज वितरण कंपनीच्या ढेपाळ कारभारामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागतो. गावात लाईनमनची नियुक्ती आहे परंतु लाईनमन मुख्यालय वास्तव्यात राहत नसल्यामुळे रात्रीला जर लाईन गेली तर खाजगी माणसाकडून लाईन चालू करून घ्यावी लागते. त्यामुळे लाईनमन मुख्यालयी राहिल्यास ग्राहकांना विजेच्या लपंडावापासून त्रास कमी होऊ शकतो.

या गंभीर बाबीची वीज वितरण कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी नोंद घ्यावी.

# तिवस्यात मुलासह सुनेला गाडीखाली चिरडण्याचा प्रयत्न

**अमरावती/का.प्र**

कौटुंबिक वादावरून सासऱ्याने मुलगा व सुने सोबत वाद घालून चारचाकी वाहन मुलासह सुनेच्या अंगावर चढविण्याचा धक्कादायक प्रकार तिवसा पोलीस ठाण्याच्या हद्दीत रविवार २१ जून रोजी दुपारी १२:३० वाजताच्या दरम्यान राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या एका हॉटेलजवळ घडला.

यामध्ये सून जखमी झाल्याने सुनेच्या तक्रारीवरून सासऱ्यासह इतर तीन जणांविरुद्ध हत्येचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी सासऱ्याला अटक केली आहे. मोहम्मद जमा इद्रीस खान (६५) असे अटक करण्यात



### सासऱ्यासह इतर तीन जणांविरुद्ध गुन्हा दाखल

आलेल्या सासऱ्याचे नाव आहे.

गेल्या तीन वर्षांपासून मुलगा आझाद खान व वडिलांमध्ये प्रॉपर्टीचा वाद सुरु होता.

याच रागाच्या भरात वडिल मोहम्मद जमा इद्रीस खान यांनी रवीवारी आझाद खान यांच्या हॉटेल आस्वाद येथे येऊन शिवीगाळ करत स्वता जवळ असलेली एमएच २७ बीव्ही ६११५ क्रमांकाचे वाहन थेट हॉटेलच्या आत शिरविण्याचा प्रयत्न केला. ज्यामुळे हॉटेलचे मोठे नुकसान झाले. दरम्यान यावेळी पती-पत्नी हॉटेल बाहेर येताच दोघांच्याही अंगावर वाहन चढवण्याचा प्रयत्न करण्यात आला.

यात सूनेच्या अंगावर वाहन आल्याने पायाला दुखापत झाली. ही सर्व घटना सीसीटीव्ही कॅमेरामध्ये कैद झाल्याने पोलीसांनीं या घटनेचीं गंभीर दाखल घेऊन सुनेच्या तक्रारीवरून मोहम्मद जमा इद्रीस खान, मोहम्मद सज्जाद जमा खान यांच्यासह एका महिलेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास तिवसा पोलीस निरीक्षक गोपाल उपाध्ये यांच्या मार्गदर्शनात सुरु आहे.

# अंजनगाव सुर्जी शहरात हेल्मेट सक्तीची कारवाई सुरू

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

ग्रामीण पोलीस अधीक्षकांच्या आदेशानंतर जिल्ह्यात हेल्मेट सक्तीची अंमलबजावणी कडक करण्यात आली आहे. याच पार्श्वभूमीवर अंजनगाव सुर्जी शहरात आजपासून वाहतूक पोलिसांनी दुचाकीचालकांवर कारवाईला सुरुवात केली. हेल्मेट नसलेल्या वाहनचालकांना दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागत आहे. 'हेल्मेट ही फक्त सक्ती नाही, तर ती प्रत्येकाच्या जिवाची सुरक्षा रक्षक आहे,' असे पोलिसांनी स्पष्ट केले. अमरावती ग्रामीणमध्ये मागील वर्षी झालेल्या अपघातात ६५% मृत्यू हेल्मेट न घातल्याने झाले, असा दाखलाही त्यांनी दिला.

वारंवार नियम मोडणाऱ्यांवरच मोटार वाहन कायद्यानुसार ५०० ते १००० रुपयांपर्यंत दंड आकारला



जात आहे.सध्या अंजनगाव सुर्जी पोलीस स्टेशन हद्दीत विशेष मोहीम राबवली जात आहे. शाळा, महाविद्यालयांसमोरही जनजागृती केली जाणार आहे. नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने हेल्मेटचा वापर करावा, असे आवाहन पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून करण्यात आले आहे. एकीकडे जीव वाचवण्यासाठी हेल्मेट आवश्यक आहे हे मान्य करताना, दुसरीकडे दैनंदिन वापरातील अडचणींवर तोडगा काढावा, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

प्रत्येक वेळी २ मिनिटांच्या कामासाठी हेल्मेट घालणे, काढणे, सांभाळणे खूप त्रासदायक आहे,असे एका स्थानिक दुचाकीचालकाने सांगितले.अनेक नागरिकांचे म्हणणे आहे की, हेल्मेट सक्ती असावी पण ती फक्त महामार्गावर किंवा लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी असावी.

'शहरातल्या शहरात २०-३० च्या वेगाने फिरताना हेल्मेटचा उकाडा सहन होत नाही. घामाने डोकं खराब होते. त्यातच हेल्मेट चोरीला जाण्याची भीती वेगळी,' असे मत महिला दुचाकीचालकांनी व्यक्त केले.

# चांदूर रेल्वे नगरपरिषदेत 'चहा पेक्षा किटली गरम'

## किटली आणि चमच्यांकडून न.प.कामात अडथळा

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

नगरपालिकेत सद्या नगराध्यक्ष व नगरसेवकांपेक्षा एका व्यक्तीकडून विकासकामाबाबत अधिकारी, कर्मचाऱ्यांना धारेवर धरुन त्यांना जाब विचारल्या जात आहे. त्याच्या नया वर्तनाने अधिकारी, कर्मचारी त्रस्त झाल्याने येथे 'चहा पेक्षा कॅटरीच गरम' अशी चर्चा आता रंगू लागली आहे.

मागील चार वर्षांपासून चांदूर रेल्वे नगर परिषदेमध्ये प्रशासकराज होते. नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुका झाल्यानंतर जनतेतून नगराध्यक्ष निवडून आला. येथे वंचितच्या प्रियांका विश्वकर्मा ह्या नगराध्यक्ष असून भाजपाचे बच्चू वानरे हे उपाध्यक्षपद आहेत. यांच्या माध्यमातून शहरातील मुलभूत प्रश्न सोडविले जातात. अशात गटार साफसफाई, पाणीटंचाई, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या समस्या आणि कर संबंधित बाबींसारख्या दैनंदिन कामासाठी शहरातील नागरिक नगराध्यक्ष व नगरसेवकांकडे येतात. एका व्यक्तीकडून त्या नागरिकरांशी थेट संपर्क करीत स्वःताच त्यांच्याशी चर्चा करताना दिसतात. सदरचे विषय नगराध्यक्ष तसेच संबंधित नगरसेवकांपर्यंत जाण्याआधीच खासगी व्यक्तीकडून त्याची पडताळणी करुन ते थेट प्रशासनाकडे मांडले जात असल्याची प्रचिती येथे आली आहे.

त्यामुळे येथे चहा पेक्षा कॅटरीच गरम अशी चर्चा आता सुरू झाली आहे. यामध्ये त्या व्यक्तीकडून अधिकाऱ्यांची चौकशी करणे, त्यांना जाब विचारणे, त्यांची स्वःताच कानउघाडणी करणे, असे प्रकार येथे सुरू असल्याची जोरदार चर्चा आहे. त्यामुळे येथे नगराध्यक्ष, नगरसेवकांचे काय काम, असाही प्रश्न उपस्थित केल्या जात आहे.

पालिकेत निवडून आलेला प्रतिनिधी शिवाय कोणत्याही व्यक्तीला शासकीय नियमांची पायमल्ली, समिती बैठका, विशेष बैठका, सर्वसाधारण बैठका किंवा इतर पालिका विभागांमध्ये रोज उपस्थित राहण्याचा किंवा कामात हस्तक्षेप करण्याचा कोणताही कायदेशीर अधिकार नाही.

जर कोणी असे करत असेल तर अशा व्यक्तीबद्दल मुख्याधिकारी नाही तर जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार करता येते. ज्यामध्ये घटनेचा संपूर्ण तपशील असावा लागतो.

## प्रहार शिक्षक संघटनेच्या दणक्याने

# बालभारती झुकली; मात्र पुन्हा भाषिक खोडी, फुले दांपत्याचा थेट उल्लेख टाळला!

## ऐतिहासिक चुकीची घेतली जाहीर कबुली; अधिकृत शुद्धिपत्रक निर्गमित!


**अमरावती/का.प्र.**

इयत्ता ३ रीच्या पाठ्यपुस्तकात क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पहिल्या मुलींच्या शाळेचा इतिहास 'मर्यादित' केल्याप्रकरणी प्रहार शिक्षक संघटनेने घेतलेल्या आक्रमक पवित्र्याला अखेर अवघ्या ७२ तासांत मोठे यश आले आहे. संघटनेचे राज्याध्यक्ष महेश ठाकरे यांनी २१ जून रोजी बालभारतीच्या संचालिका अनुराधा ओक आणि शिक्षण मंत्र्यांना दिलेल्या पुराव्यासह निवेदनाची प्रशासनाने गंभीर दखल घेतली आहे. बालभारतीने आपल्या अक्षम्य ऐतिहासिक चुकीची जाहीर कबुली देत अखेर राज्यभरातील शाळांसाठी अधिकृत 'शुद्धिपत्रक'जारी केले आहे.

पाठ्यपुस्तक मंडळाच्या संचालिका अनुराधा ओक यांच्या स्वाक्षरीने प्रसिद्ध झालेल्या अधिकृत पत्रानुसार (क्रमांक: ह/इति/रा.शास्त्र/२९१५, दिनांक २३/०६/२०२६), इयत्ता तिसरीच्या 'आपल्या सभोवतालचे जग भाग २' या पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. १५ वरील 'माहित आहे का तुम्हांला?' या चौकटीत आता अधिकृत बदल करण्यात आला आहे.

बदलाचा मुख्य मजकूर:- पाठ्यपुस्तकातील जुने वाक्य 'ही महाराष्ट्रातील पहिली मुलींची शाळा होय' हे पूर्णपणे बदलून आता तिथे 'ही महाराष्ट्रातीलच नव्हे तर भारतातील पहिली मुलींची शाळा होय. ही भारतीयांनी मुलींसाठी स्थापन केलेली पहिलीच शाळा होय.' असा नवीन मजकूर समाविष्ट केला आहे.या नवीन वाक्याच्या औचित्यावर बोट ठेवत प्रहार शिक्षक संघटनेने तीव्र आक्षेप घेतला आहे.

ही शाळा कोणी सुरू केली, याचे उत्तर अख्ख्या जगाला माहीत असताना, तिथे 'क्रांतिसूर्य महात्मा फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले' यांच्या नावाचा



स्पष्ट उल्लेख करणे बालभारतीला का डाचत आहे? 'भारतीयांनी' या व्यापक शब्दाच्या आडोश्याखाली मूळ महापुरुषांचे नावे जाणीवपूर्वक अदृश्य किंवा मर्यादित करण्याचा हा प्रशासकीय घाट तर नाही ना? अशी शंका आता उपस्थित केली जात आहे.

हा केवळ एका शब्दाचा बदल नसून देशातील स्त्री शिक्षणाच्या खऱ्या आणि जाज्वल्य इतिहासाचा विजय आहे, अशी भावना प्रहार शिक्षक संघटनेने व्यक्त केली आहे.

बालभारतीने काढलेले हे शुद्धिपत्रक शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव, शिक्षण आयुक्त, तसेच राज्यातील सर्व प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांच्या मुख्याध्यापकांना तात्काळ अंमलबजावणीसाठी पाठवण्यात आले आहे. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या चालू अभ्यासक्रमात सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शिकवताना हाच सुधारित आणि खरा इतिहास शिकवावा, अशा स्पष्ट सूचना या पत्रकाद्वारे देण्यात आल्या आहेत.या गंभीर भाषिक आणि वैचारिक चुकीवर प्रहार शिक्षक संघटनेचे राज्याध्यक्ष महेश ठाकरे यांनी आपली स्पष्ट आणि आक्रमक भूमिका मांडली आहे.

> महापुरुषांच्या अस्मितेसाठी आणि विद्यार्थ्यांच्या अचूक शिक्षणासाठी प्रहार शिक्षक संघटना सदैव पहिल्या फळीत लढत राहील, हाच संदेश या विजयाने पुन्हा एकदा अधोरेखित केला आहे!
>
> **महेश ठाकरे**
> राज्याध्यक्ष, प्रहार शिक्षक संघटना

# संक्षिप्त

## भाजपा महिला मोर्चाच्या शहर सरचिटणीसपदी तृप्ती वाठ

**अमरावती -** बडनेरा येथील सामाजिक कार्यकर्त्या तथा समता परिषदेच्या जिल्हाध्यक्षा तृप्ती वाठ यांची भाजपा महिला मोर्चाच्या शहर जिल्हा सरचिटणीस पदावर नियुक्ती ज्येष्ठ नेत्या निवेदिता चौधरी व महिला मोर्च्याच्या अध्यक्षा सुधा तिवारी यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देऊन नुकतीच करण्यात आली.याप्रसंगी भाजपा शहर अध्यक्ष डॉ.नितीन धांडे, महापौर तेजचंद तेजवानी प्रामुख्याने उपस्थित होते. पक्षात महिला शक्तीचे संघठन कार्यास प्राधान्य देऊन ते सक्षम करणार असल्याचे अभिवचन नियुक्ती प्रसंगी तृप्ती वाठ यांनी दिले.याप्रसंगी सविता भागवत, शीतल वाघमारे, जया माहुरे,, सुरेखा लुंगारे, गंगा खारकर, सुरेखा त्यागी, रजनी आमले, जयश्री कुबडे, प्रियंका वरदानी महिला मोर्चाच्या आदी सदस्या उपस्थित होत्या.नियुक्ती बद्दल तृप्ती वाठ यांचे अनेकांनी अभिनंदन केले.



## जिल्हा सामान्य रुग्णालयात व्यसनमुक्ती दिन

**अमरावती -** जिल्हा सामान्य रूग्णालयात आज जागतिक व्यसनमुक्ती दिन साजरा करण्यात आला. प्रभारी अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नरेंद्र सोळंके अध्यक्षस्थानी होते.यावेळी मानसोपचार तज्ज्ञ डॉ. अमोल गुल्हाने, डॉ. प्रेषीत मढवी, डॉ. ऋषिकेश घोरपडे, अधिसेविका ललिता अटाळकर, भावना पुरोहित, श्रद्धा हरकंचे, प्रमोद भक्ते, सुनील कळतकर, सारा बांगड, सचिन टवलारे आदी उपस्थित होते. यावेळी डॉ. सोळंके, डॉ. गुल्हाने, डॉ. मढवी, श्रीमती पुरोहीत यांनी उपस्थितांना व्यसनमुक्तीबाबत उपचार आणि निदान याबात मार्गदशन केले. सारा बांगड यांनी सूत्रसंचालन केले. प्रमोद भक्ते यांनी आभार मानले.

## शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी अर्ज प्रक्रिया सुरू

**अमरावती -** शासकीय वसतिगहात प्रवेशासाठी अर्ज प्रक्रिया सुरू झाली आहे. यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी अर्ज करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शासकीय वसतिगृह युनिट क्र. ४, जेल रोड, अमरावती, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले गुणवंत मुलींचे शासकीय वसतिगृह, जेल रोड, अमरावती, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शासकीय वसतिगृह, कॅम्प, अमरावती, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शासकीय वसतिगृह, अमरावती, १२५ जयंती विलासनगर येथे शैक्षणिक सत्र २०२६-२७ करीता कनिष्ठ महाविद्यालयीन आणि अव्यावसायिक महाविद्यालयीन विभागाकरीता दि. १५ जुलैपर्यंत ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरू आहे.प्रवेशाकरीता इच्छुक विद्यार्थ्यांनी र्र्स्ैंहौ.र्स्ैंप्ू.दु या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने अर्ज सदर करावेत. ऑनलाईन केलेला अर्ज डाऊनलोड करुन त्याची प्रिंट आणि सोबत आवश्यक कागदपत्रे वसतिगृहास सादर करावीत. वसतिगृहात प्रवेश मिळाला नसल्यास विद्यार्थ्यांना स्वाधार योजनेंतर्गत आर्थिक सहाय्य दिले जाणार आहे, असे शासकीय वसतिगृहाच्या गृहपाल यांनी कळविले आहे.

## स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थ्यांना नशामुक्तीची शपथ

**अमरावती -** डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनातील सभागृहात सामजिक न्याय विभागाच्या वाचनालयाकरीता पात्र विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यासाठी प्रवेश परीक्षा घेण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांना नशामुक्तीची शपथ देण्यात आली.यावेळी प्रादेशिक उपायुक्त माया केदार, सहायक आयुक्त समाज कल्याण राजेंद्र जाधवर, सहायक आयुक्त समाज कल्याण मंगला मून, श्री. वाठ, मनोज मेरत, विशेष अधिकारी श्री. मोरे, समाज कल्याण निरिक्षक आर. जे. महालकर उपस्थित होते. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्यांना नशामुक्त भारत अभियान, विकसित भारत की पहचान बाबत सामुदायिक शपथ देण्यात आली. तसेच nmba.dosje.gov.in वेबसाईटवर ऑनलाईन शपथ घेणे, तसेच अभियानामध्ये सहभागी होण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.सामाजिक न्याय आणि अधिकारीता विभागामार्फत २६ जून रोजी आंतरराष्ट्रीय मादक पदार्थ गैरवापर आणि अवैध तस्करी विरोधी दिवस साजरा केला जातो. त्यानुसार सर्व महाविद्यालय, शासकीय अनुदानित वसतिगृह, व्यसनमुक्ती केंद्रात नागरिकांच्या सहभागासाठी विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येतात.

## 'स्वाधार' योजनेतील त्रृटी पूर्ण करण्यासाठी ७ जुलैपर्यंत मुदतवाढ

**अमरावती -** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेच्या सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी अर्ज केलेल्या, परंतु कागदपत्रातील त्रुटींमुळे कार्यालयस्तरावर प्रलंबित असलेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी दि. ७ जुलैपर्यंत त्रृटी पूर्ण कराव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे.राज्य शासनाने शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळाला नसलेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील अकरावी, बारावी, तसेच बारावीनंतरच्या व्यावसायिक आणि अव्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना भोजन, निवास आणि इतर शैक्षणिक सुविधांसाठी थेट आर्थिक मदत देण्यासाठी 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना' सुरू केली आहे. सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी ज्या विद्यार्थ्यांनी अर्ज केले आहेत, त्यांच्यापैकी काही अर्ज कागदपत्रातील कमतरतेमुळे कार्यालयात प्रलंबित आहेत. या प्रलंबित विद्यार्थ्यांची यादी कार्यालयाच्या दर्शनी भागात लावण्यात आली आहे.कार्यालयाकडून वेळोवेळी सूचना देऊनही अनेक विद्यार्थ्यांनी अद्याप त्रृटी पूर्तता केलेली नाही, ज्यामुळे त्यांचे अर्ज प्रलंबित आहेत.विद्यार्थ्यांचे अर्ज त्रृटीमुळे प्रलंबित आहेत, त्यांनी शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार आवश्यक कागदपत्रे कार्यालयात संबंधित शाखेकडे जमा करावीत. या मुदतीत त्रृटी पूर्ण केली नसल्यास, याची सर्वस्वी जबाबदारी लाभार्थी विद्यार्थ्यांची राहणार आहे. तसेच १६ जून ते ७ जुलै २०२६ या कालावधीत दुपारी ३ ते ५ यावेळेत स्वत: उपस्थित राहून त्रृटी पूर्तता करून घेण्यासाठी सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, अमरावती येथे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.अधिक माहितीसाठी समाज कल्याण कार्यालय किंवा दुरध्वनी क्र. ०७२१-२६६१२६१ वर संपर्क साधावा.

## शिक्षक मतदारसंघाची निवडणूक-२०२६

# काँग्रेसच्या पुनर्जन्माची नांदी ठरणार का?

अमरावती विभागातील काँग्रेस पक्ष सध्या एका महत्त्वाच्या वळणावर उभा आहे. विधानसभा निवडणुकीतील अपयश, विधान परिषद स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील पराभव आणि पक्षांतर्गत गटबाजीमुळे काँग्रेसची संघटनात्मक ताकद कमकुवत झाल्याचे चित्र दिसत आहे. अनेक दशकांपासून काँग्रेसची विचारधारा जनसामान्यांपर्यंत पोहोचवणाऱ्या निष्ठावान कार्यकर्त्यांमध्येही निराशा निर्माण झाली आहे.

लोकसभा निवडणुकीत बळवंत वानखेडे यांच्या विजयामुळे कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले होते. काँग्रेस पुन्हा उभारी घेईल, अशी अपेक्षा निर्माण झाली होती. मात्र त्यानंतरच्या विधानसभा आणि विधान परिषद निवडणुकांतील निकालांनी त्या आशांवर पाणी फेरले. यामुळे काँग्रेससमोर केवळ निवडणूक जिंकण्याचे नव्हे, तर स्वतःची विश्वासार्हता आणि संघटनात्मक ताकद पुन्हा निर्माण करण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे.

याच पार्श्वभूमीवर ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२६ मध्ये होणारी शिक्षक मतदारसंघाची निवडणूक काँग्रेससाठी अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. ही निवडणूक केवळ विधान परिषदेची एक जागा जिंकण्याची संधी नाही, तर पक्षाची हरवलेली प्रतिष्ठा पुनर्स्थापित करण्याची आणि जनमानसातील विश्वास पुन्हा मिळवण्याची ऐतिहासिक संधी आहे.

आज कार्यकर्त्यांच्या मनातील सर्वात मोठा प्रश्न असा आहे की काँग्रेस या निवडणुकीत पुन्हा एखाद्या आयात उमेदवारावर विश्वास ठेवणार का? विविध पक्षांमध्ये उड्या मारणाऱ्या, शैक्षणिक क्षेत्राशी थेट संबंध नसलेल्या किंवा केवळ आर्थिक ताकदीच्या जोरावर राजकारण करणाऱ्या व्यक्तींना उमेदवारी देऊन पक्षाला नेमका काय फायदा होणार आहे? अशा व्यक्ती निवडून आल्यावर पक्षाच्या संघटनात्मक उभारणीत किती योगदान देणार, हा देखील महत्त्वाचा प्रश्न आहे.

शिक्षक मतदारसंघ हा सामान्य राजकीय मतदारसंघ नाही. येथे शिक्षक, प्राध्यापक, शिक्षण क्षेत्रातील अभ्यासू आणि जागरूक मतदार मतदान करतात. त्यामुळे या मतदारसंघात केवळ पैसा किंवा राजकीय प्रभाव पुरेसा ठरत नाही. शैक्षणिक क्षेत्रातील काम, सामाजिक स्वीकार्यता, वैचारिक बांधिलकी, नेतृत्वक्षमता आणि संघटन उभारण्याची क्षमता हे गुण अधिक महत्त्वाचे ठरतात.




काँग्रेसने जर या निवडणुकीकडे केवळ उमेदवार निवडीचा कार्यक्रम म्हणून पाहिले तर ती मोठी चूक ठरेल. उलट पक्षाने याला संघटनात्मक पुनर्बांधणीची मोहीम मानले पाहिजे. आज निवडणुकीसाठी अवघे चार महिने शिल्लक आहेत. या चार महिन्यांत पाच जिल्हे आणि सुमारे ५६ तालुक्यांतील शिक्षकांपर्यंत पोहोचणे ही काँग्रेससाठी मोठी कसोटी असणार आहे.

भारतीय जनता पक्षाने शिक्षक मतदारसंघाच्या पार्श्वभूमीवर विविध जिल्ह्यांमध्ये मेळावे, संवाद कार्यक्रम, संघटनात्मक बैठका आणि संभाव्य मतदारांशी संपर्क मोहीम सुरू केली आहे. त्याच धर्तीवर काँग्रेसनेही तातडीने जिल्हा, तालुका आणि शहर स्तरावर शिक्षक मेळावे, शिक्षण परिषद, संवाद सभा आणि विविध शिक्षक संघटनांशी चर्चासत्रांचे आयोजन करणे आवश्यक आहे.

पक्षाने प्रथम शिक्षक संघटना, शिक्षण क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्ती, प्राध्यापक, मुख्याध्यापक आणि युवा शिक्षक नेत्यांशी संवाद साधून व्यापक सहमती निर्माण करावी. त्यानंतर सर्वांना मान्य होईल असा सक्षम, संघर्षशील, अभ्यासू आणि निष्ठावान उमेदवार निश्चित करावा. उमेदवाराची घोषणा शेवटच्या क्षणी करण्याऐवजी त्याला वेळेत मैदानात उतरवून विभागभर प्रचाराचे वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे.

आज काँग्रेससमोर निवड केवळ एका उमेदवाराची नाही, तर पक्षाच्या भवितव्याची आहे. जर पक्षाने गटबाजी, व्यक्तिपूजा आणि आर्थिक निकष बाजूला ठेवून तळागाळातील निष्ठावान नेतृत्वावर विश्वास दाखवला, तर शिक्षक मतदारसंघ काँग्रेसच्या पुनरुज्जीवनाचा पाया ठरू शकतो. लोकसभा निवडणुकीत कार्यकर्त्यांनी ज्या एकजुटीने काम करून विजय मिळवून दिला, त्याच पद्धतीने शिक्षक मतदारसंघातही काँग्रेसने विचारांशी बांधिलकी असलेल्या, शैक्षणिक क्षेत्रात काम करणाऱ्या आणि संघटनात्मक क्षमता असलेल्या नेतृत्वाच्या पाठीशी उभे राहिले, तर इतिहास घडू शकतो.

आज काँग्रेससमोर दोन मार्ग आहेत. एक म्हणजे पुन्हा आयात नेतृत्व, गटबाजी आणि तात्पुरत्या समीकरणांच्या राजकारणाचा माग. दुसरा म्हणजे आत्मपरीक्षण, संघटनात्मक शुद्धीकरण आणि नव्या नेतृत्वाला संधी देण्याचा माग. यापैकी दुसरा मार्ग निवडला तर शिक्षक मतदारसंघाची निवडणूक काँग्रेसच्या पुनर्जन्माची सुरुवात ठरू शकते.

पराभवाची धूळ झटकून नव्या उमेदीने उभे राहण्याची हीच वेळ आहे. शिक्षक मतदारसंघ काँग्रेससाठी केवळ निवडणूक नाही, तर पक्षाच्या भवितव्याची, संघटनात्मक पुनर्बांधणीची आणि जनविश्वास पुन्हा मिळवण्याची निर्णायक परीक्षा आहे. या परीक्षेत काँग्रेसने योग्य निर्णय घेतला, तर अमरावती विभागात पक्षाच्या नव्या पर्वाची सुरुवात होऊ शकते.



**डॉ. मेघश्याम करडे,** अमरावती
मो.९४०४१ ०३५३९

# विद्यापीठात बी.एस्सी. 'डेटा सायन्स ॲन्ड ॲनालिटिक्स' ची प्रवेश प्रक्रिया

डिजीटल तंत्रज्ञानाच्या युगात वाढती औद्योगिक गरज लक्षात घेता, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयात बी.एस्सी. (डेटा सायन्स ॲन्ड ॲनालिटिक्स) या विशेष पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. हा अभ्यासक्रम 'अप्रेंटिसशिप एम्बेडेड डिग्री प्रोग्राम' अंतर्गत डिझाइन करण्यात आला असून, याद्वारे विद्यार्थ्यांना थेट उद्योग जगतातील कामाचा प्रत्यक्ष अनुभव मिळणार आहे. कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या पुढाकारामुळे हा अभ्यासक्रम विद्यापीठात सुरू झाला आहे.



अभ्यासक्रमाची प्रमुख वैशिष्टय- तीन वर्षाच्या (६ सेमिस्टर) अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना एका संपूर्ण सेमिस्टरसाठी नामांकित कंपन्यांमध्ये 'अप्रेंटिसशिप' (प्रशिक्षण) करण्याची संधी मिळणार आहे.

आधुनिक पायाभूत सुविधा- सुसज्ज संगणक प्रयोगशाळा, हाय-स्पीड १ जीपीबीएस इंटरनेट आणि संपूर्ण कॅम्पसमध्ये मोफत वाय-फाय सुविधा. त्याचप्रमाणे शासनाच्या नियमानुसार सर्व प्रकारच्या शिष्यवृत्ती, भव्य ग्रंथालय, मुला-मुलींसाठी स्वतंत्र वसतीगृहाची सोय करण्यात आली आहे.

या अभ्यासक्रमात आयटी क्षेत्राची सध्याची मागणी लक्षात घेता पायथन फॉर डेटा सायन्स, ॲडव्हान्स एक्सलसह डेटा विश्लेषण, बिग डेटा ॲनालिटिक्स आणि बिझनेस इंटेलिजन्स, पॉवर बीआय टूल, फूल स्टॅक डेव्हलपमेंट अशा विषयांचे विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जाईल.

करिअरच्या सुवर्णसंधी-हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना डेटा सायंटिस्ट, बिझनेस अनालिस्ट, फायनान्शियल अनालिस्ट, रिस्क अनालिस्ट, डेटाबेस ॲडमिनिस्ट्रेटर, डेटा व्हिज्युअलायझेशन स्पेशलिस्ट यांसारख्या उच्च पगाराच्या पदांवर करिअर करण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

पात्रता आणि प्रवेश प्रक्रिया-इयत्ता १२ वी (विज्ञान शाखा) उत्तीर्ण, ज्यामध्ये गणित विषय अनिवार्य आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी जाहिरातीत दिलेला क्यूआर कोड स्कॅन करून थेट अर्ज करावेत. अधिक माहितीसाठी प्रा. राजेश भोयर मो. क्र. ९४२२८५८५८४ यावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# मराठी भाषेचे मारेकरी आम्हीच?

महाराष्ट्र राज्याचे विद्यमान विधानसभा अध्यक्ष असलेले राहूल नार्वेकर यांनी २२ जून २०२६ रोजी म्हणजेच विधिमंडळात स्व.आशाताई भोसले यांना सभागृहात ज्या पद्धतीने श्रद्धांजली वाहिली आणि कागदावर लिहून आणलेल्या एका उता-याचे जाहीर वाचन केले, तेव्हा आमची मायमराठी असलेली मराठी भाषा अतिशय दुःखी कष्टी झाली असेल हे मात्र खरे!

आमच्या महाराष्ट्राचे विधानसभा अध्यक्ष अशाप्रकारे मराठी भाषेचे वाचन करीत असेल तर मला वाटते की,या मराठी भाषेचे खरे मारेकरी आम्हीच तर नाही ना?मा.राज ठाकरे यांनी व्यक्त केलेल्या भावना अतिशय वास्तव आहे.कारण मग दिनानाथ मंगेशकर यांचे नाव जर आम्ही दिनदयाळ घेत आहोत तर सारेच नवल आहे.

एकीकडे २७ फेब्रुवारी रोजी कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनी मराठी भाषा गौरव दिवस म्हणून साजरा करतो.त्या आपल्या महाराष्ट्रात विधानसभा अध्यक्ष असलेले नार्वेकर हे जर अशाप्रकारे मराठी भाषेत श्रद्धांजली अर्पण करतात तेव्हा आपल्या विधीमंडळात उपस्थित एकाही आमदार यांनी याबाबत काहीच बोलू नये?

महाराष्ट्र राज्यातील एकीकडे मराठी शाळा बंद पडत आहेत.इंग्रजी माध्यमाच्या शाळा मोठ्या प्रमाणावर सुरू आहेत.त्यामुळे आम्हीच मराठी भाषा, मराठी शाळा बंद करण्याचा प्रयत्न तर करत आहोत काय असे अनेक प्रश्न या निमित्ताने निर्माण झाले आहेत हे मात्र खरे आहे.दहावीच्या विद्यार्थ्यांना जर आज मराठी भाषा वाचता येत नसेल तर ते आमचे अपयश आहे?

आमच्या संतांनी अहोरात्र या मराठी भाषेचे गोडवे आपले अभंग,मग ते संत तुकाराम महाराज असोत किंवा ज्ञानेश्वर महाराज असोत,जनाबाई,संत नामदेव महाराज यांनी मराठी भाषा जिवंत राहण्यासाठी अहोरात्र मराठी भाषेत साहित्य निर्माण केले...

आम्ही आज? अशाच प्रकारे मराठी साहित्य, मराठी भाषा यांची उपेक्षा करत राहीलो तर मायमराठी भाषेचे मारेकरी आम्हीच ठरणार आहोत.ही घटना महाराष्ट्र राज्यातील एक दुदैवी घटना घडली आहे.कारण लता मंगेशकर,आशाताई यांनी आपले आयुष्य मराठी गझल, गाणी, संगीत यासाठी वेचले.अशा मान्यवरांना जर आम्ही जाहीरपणे अशी श्रद्धांजली अर्पण करतो यापेक्षा आमच्या मराठी भाषेचे दुःख काय असू शकते.....

मराठी भाषा जगली पाहिजे,तीचे संवर्धन, आणि संरक्षण करण्यासाठी सत्ताधारी, किंवा विरोधक असा कोणताही प्रश्न नसून महाराष्ट्रातील सर्व सामान्य माणूस म्हणून आपण एकत्र येण्याची गरज आहे हे मात्र खरे आहे....

तरच आम्ही म्हणू ....
लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी
जाहले खरेच धन्य ऐकतो मराठी
धर्म पंथ जात एक जाणतो मराठी
एवढ्या जगात माय मानतो मराठी..

**विष्णू सोळंके**
मो.७०२०३००८२४

# 'व्हिटिलिगो'वेगळी ओळख कमतरता नाही!

दरवर्षी २५ जून रोजी जागतिक 'व्हिटिलिगो' दिवस साजरा केला जातो.२०२६ च्या जागतिक व्हिटिलिगो दिवसाची मुख्य मध्यवर्ती संकल्पना 'फ्रोम स्टीग्मा टू स्ट्रेंथ (कलंकाकडून ताकदीकडे)' ही आहे ! त्वचेचा रंग नाहीसा करणारा 'व्हिटिलिगो' हा एक दीर्घकालीन स्वयंप्रतिरोधक आजार आहे, जो गोंधळ आणि सामाजिक कलंकाचे कारण ठरू शकतो.जागतिक लोकसंख्येच्या १-२% लोकांना होणारा 'व्हिटिलिगो' हा आजार, त्वचेला रंग देणाऱ्या मेलॅनिन या रंगद्रव्याच्या निर्मितीमध्ये अडथळा आणातो. या अडथळ्यामुळे शरीराच्या विविध भागांवर पांढरे डाग तयार होतात.हा एक असा आजार आहे, ज्यामध्ये त्वचेचा नैसर्गिक रंग जाऊन पांढरे डाग पडतात जे अनेकदा शरीराच्या दोन्ही बाजूंना एकसारखे दिसतात.शरीरावर कुठेही दिसू शकतो,परंतु सामान्यतः सूर्यप्रकाशाच्या संपर्कात येणाऱ्या भागांवर,जसे की चेहरा, हात, पाय आणि जननेंद्रियांच्या आसपासच्या भागांवर याचा परिणाम होतो. याव्यतिरिक्त, याचा परिणाम श्लेष्मल पटलां(म्युकस मेम्ब्रेन) वर होऊ शकतो, ज्यात तोंडाचा आतील भाग आणि डोळे यांचा समावेश आहे. हा आजार संसर्गजन्य नाही ज्यामध्ये शरीराची रोगप्रतिकारशक्ती नकळत स्वतःच्याच रंगपेशींना(मेल्यानोसाईट) नष्ट करते. आनुवंशिकता हे एका कारणांपैकी एक असू शकते, परंतु १०० पैकी केवळ ३० रुग्णांमध्येच आनुवंशिकतेचा संबंध आढळतो.




काय खावे: आहाराबाबतच्या सविस्तर मार्गदर्शनासाठी आहारात ताजी फळे, हिरव्या पालेभाज्या, गाजर,आणि ओमेगा-३ युक्त अक्रोड यांसारख्या अँटिऑक्सिडंट्सनी समृद्ध पदार्थांचा समावेश करावा धान्ये: शिळे तांदूळ, गहू, जव (बार्ली) डाळी: तूर, मूग फळे आणि भाज्या:लिंबू, हळद, शेवगा, टिंडा, डाळिंब, परवळ, दुधी भोपळा,कारले, दोडका, मध, इत्यादी.सुंठ, आले, बडीशेप, हिंग, काळे मीठ, कोमट पाण्यासोबत १ चमचा एरंडेल तेल, लसूण, जिरे, जायफळ,मध.शक्य तितके कारल्याचे सेवन करावे.काय टाळावे: प्रक्रिया केलेले अन्न, अति तिखट-मसालेदार पदार्थ आणि मद्यपान टाळावे.काही अभ्यासानुसार ग्लूटेनचे अतिसेवन देखील बाधक ठरू शकते. जीवनसत्त्वे- व्हिटॅमिन बी १२ आणि फॉलिक ॲसिड: हे व्हिटॅमिन्स पेशींच्या निर्मितीमध्ये आणि त्वचेचा मूळ रंग परत आणण्यात (रीपिग्मेंटेषण) अत्यंत उपयुक्त ठरतात?व्हिटॅमिन डी आणि ई:या व्हिटॅमिन्सचे शरीरातील प्रमाण संतुलित ठेवल्याने फोटोथेरपीचे परिणाम सुधारतात.तांबे आणि जस्त वास्तव-गैरसमज: हा आजार कुष्ठरोग आहे किंवा एकमेकांना स्पर्श केल्याने, सोबत जेवल्याने पसरतो, अशी समाजात अजूनही भीती व गैरसमज आहेत?हा आजार पूर्णपणे असंक्रमक (नॉन कोनटेजीयस ) आहे. तो स्पर्श, श्वास किंवा एकत्र खाण्याने कधीही दुसऱ्या व्यक्तीला होत नाही. या आजाराचा उपचार यांसारख्या विश्वासू स्त्रोतांचा आधार घ्यावा. तसेच मानसिक समुपदेशन (कौसेलिंग) करून घेणे अत्यंत गरजेचे आहे.

**तारा द्वा.शर्मा**

# मानसशास्त्रातील व्यवसायसंधी व राष्ट्रीय शैक्षणिक धोरण

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासात काही महत्त्वाची वळणं येतात, त्या वळणा वरून नेमके कुठे जायचे? याबाबत बहुतांश विद्यार्थी संभ्रमित झालेले दिसतात. साधारणतः दहावीनंतर व बारावीनंतर ही महत्त्वाची वळणे विद्यार्थ्याला योग्य मार्ग निवडण्याच्या दृष्टीने महत्त्वाची ठरतात.

आधुनिक काळात मानसशास्त्राला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. असे असले तरी कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर विदर्भामध्ये तरी मानसशास्त्र हा विषय फारच कमी ठिकाणी उपलब्ध आहे. त्यामुळे या विषयांची ओळख नसल्याने विद्यार्थी नवीन विषय निवडताना संभ्रमात पडतात. शिवाय मानसशास्त्राबद्दल असलेले गमतीदार गैरसमज सुद्धा यामध्ये भर घालतात. या अनुषंगाने मानसशास्त्रात कोणकोणत्या व्यवसाय संधी उपलब्ध आहेत याचा संक्षिप्त ऊहापोह .

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार साधारणपणे १२ वी नंतर मानसशास्त्र हा मेजर विषय घेऊन तीन वर्षे किंवा चार वर्षाची पदवी पूर्ण करावी लागते. पुढे या विषयात पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करून नंतर पुढील विविध क्षेत्रांमध्ये त्या त्या गरजेनुसार शिक्षण घेऊन व्यवसाय करता येणे शक्य आहे.यातील काही प्रमुख क्षेत्र पुढील प्रमाणे आहेत.

नैदानिक मानसशास्त्र : या क्षेत्रात प्रवेश करण्याकरिता पदव्युत्तर शिक्षण घेतल्यानंतर नैदानिक मानसशास्त्रात एम. फिल. ही पदवी घेणे गरजेचे असते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात एम.फील. हे नाव बदललेले असून आता मास्टर्स इन क्लिनिकल सायकॉलॉजी असे नाव प्रचलित झालेले आहे. ही दोन वर्षाची पदवी, आर.सी.आय.अर्थात रिहॅबिलिटेशन कौन्सिल ऑफ इंडिया यांनी मान्यता दिलेल्या संस्थेमधून पूर्ण केल्यास विद्यार्थ्याला रीतसर नैदानिक क्षेत्रात कार्य करण्याचा परवाना मिळतो तसेच यामध्ये प्रोफेशनल डिप्लोमा इन क्लिनिकल सायकॉलॉजी हा एक वर्षाचा पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम सुद्धा करता येतो.

या अंतर्गत सौम्य ते गंभीर स्वरूपाच्या मनोविकृतीचे निदान व उपचार, मानसिक ताण तणाव यावर मनोचिकित्सा करणे, मूल्यमापन करणे, बुद्धिमत्ता, व्यक्तिमत्व व इतर मानसशास्त्रीय चाचण्या घेणे, नैराश्य चिंता, तणाव, व्यसन, मानसिक विकार यावर उपचार करणे अशी कार्य करता येतात.यासाठी नोकरीच्या जागा या रुग्णालय, महाविद्यालय, विद्यापीठ येथे अध्यापन करणे, खाजगी व्यवसाय करणे, पुनर्वसन केंद्र, मानसिक आरोग्य केंद्र, इ. ठिकाणी नैदानिक मानसशास्त्रज्ञ म्हणून कार्य करता येते.

समुपदेशन मानसशास्त्रज्ञ याकरिता मानसशास्त्रातील पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केल्यानंतर समुपदेशनातील पदव्युत्तर पदविका पूर्ण करावी व शिवाय प्रात्यक्षिकासह प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर या क्षेत्रात समुपदेशन मानसशास्त्रज्ञ म्हणून कार्य करता येऊ शकते. या अंतर्गत वैयक्तिक, शैक्षणिक,कौटुंबिक, वैवाहिक समस्या सोडवण्यास मदत करणे, त्यांचे व्यवस्थापन व भावनिक विकास करण्यास सहकार्य करणे इ. कार्य करता येतात. या अंतर्गत शाळा, महाविद्यालय, समुपदेशन केंद्र, स्वयंसेवी संस्था, तसेच खाजगी प्रॅक्टिस सुद्धा करता येणे शक्य असते.

**शालेय मानसशास्त्रज्ञ :** या क्षेत्रात सुद्धा मानसशास्त्रातील पदव्युत्तर शिक्षण घेतल्यानंतर शालेय समुपदेशनाचा मान्यता प्राप्त अभ्यासक्रम पूर्ण करून शैक्षणिक क्षेत्रात कार्य करता येते. या अंतर्गत शाळा, शैक्षणिक संस्था, विशेष प्रशिक्षण शाळा या ठिकाणी कार्य करून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व भावनिक अडचणींवर मार्गदर्शन करणे, मूल्यांकन करणे, करिअर मार्गदर्शन करणे, विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांना सहकार्य करणे, अशा स्वरूपाची कामे करावी लागतात. सध्या तर महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार प्रत्येक शाळेत शंभर विद्यार्थ्यांच्या मागे एक शालेय समुपदेशक असावा असे म्हटले आहे. त्यामुळे सर्व शाळा आणि एकूण विद्यार्थी संख्या पाहता फार मोठ्या प्रमाणावर शालेय समुपदेशकांची गरज भासणार आहे, म्हणून या ठिकाणी सुद्धा फार मोठ्या प्रमाणावर व्यवसाय संधी उपलब्ध होणार आहे.

**औद्योगिक व संघटनात्मक मानसशास्त्रज्ञ :** या क्षेत्रात औद्योगिक मानसशास्त्र हा विषय घेऊन पदव्युत्तर पदवी पूर्ण करून किंवा एम.ए. मानवी संसाधन विकास यातील पदवी, एम.बी.ए. पीएच.डी. इ. शिक्षण पूर्ण करून औद्योगिक संस्था, शासकीय संस्था, कॉर्पोरेट क्षेत्र, मानव संसाधन विभाग, कन्सल्टन्सी संस्था, औद्योगिक सल्लागार, या प्रकारची कार्य करता येतात. यामध्ये कर्मचारी निवड व प्रशिक्षण, कार्य प्रेरणा व नेतृत्व विकास, कर्मचारी समाधान व कार्यक्षमता वाढवणे, कर्मचाऱ्यांचे मनोबल तसेच उत्पादकता वाढवण्यासाठी नियोजन करणे, अशा प्रकारची कार्य करावी लागतात.

**क्रीडा मानसशास्त्रज्ञ:** या क्षेत्रात मानसशास्त्रातील पदव्युत्तर शिक्षण क्रीडा मानसशास्त्र हा विषय घेऊन पूर्ण केल्यानंतर यातील पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम केल्यास क्रीडा क्षेत्रात खेळाडूंचा आत्मविश्वास वाढवणे, प्रेरणा व मानसिक तयारी करणे, स्पर्धेतील ताणतणावाचे व्यवस्थापन करणे, इ. कार्य करावी लागतात.याकरिता राष्ट्रीय अकादमी, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रीडा संघ, तसेच फिटनेस संस्था इ. ठिकाणी कार्याच्या संधी उपलब्ध होतात.

**फॉरेन्सिक मानसशास्त्रज्ञ :** यालाच न्यायवैद्यक मानसशास्त्र असेही म्हणतात.या क्षेत्रात कायदा आणि मानसशास्त्र यांची सांगड घातलेली असते.याकरिता एम.ए. फॉरेन्सिक मानसशास्त्र केल्यानंतर न्यायालय, पोलीस विभाग,कारागृह,तपास संस्था इ. ठिकाणी कार्यकर्ता येते.या अंतर्गत गुन्हेगारीचे मानसिक मूल्यांकन, न्यायालयीन कार्यात तज्ञ म्हणून कार्य करणे, गुन्हेगारी वर्तनाचा अभ्यास करणे, इ.कार्य करावी लागतात.

**पुनर्वसन मानसशास्त्रज्ञ :** या क्षेत्रात सुद्धा एम. ए. किंवा एम. एस सी. पुनर्वसन मानसशास्त्र ही पदवी घेऊन किंवा मानसशास्त्राच्या क्षेत्रातील कोणत्याही शाखेतील पदव्युत्तर शिक्षण घेऊन मास्टर्स इन रिहॅबिलिटेशन सायकॉलॉजी ही पदवी आर.सी.आय. मान्यता प्राप्त संस्थेमधून पूर्ण करून रीतसर परवाना मिळवून पुनर्वसन केंद्र,रुग्णालय, स्वयंसेवी संस्था, इ. ठिकाणी कार्य करता येते.या अंतर्गत अपंगत्व,अपघात किंवा गंभीर आजारातून सावरणाऱ्या व्यक्तींना मदत करणे, मानसिक व सामाजिक पुनर्वसन करणे, इ.कार्य करावी लागतात.

**सायबर मानसशास्त्रज्ञ:** हे सुद्धा मानसशास्त्रातील एक उदयोन्मुख क्षेत्र आहे. मानसशास्त्रातील पदव्युत्तर शिक्षण घेतल्यानंतर सायबर सायकोलॉजी, डिजिटल सायकॉलॉजी या क्षेत्रातील विशेष प्रशिक्षण किंवा प्रमाणपत्र अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर,सोशल मीडियाचा मानसिक आरोग्यावरील परिणाम अभ्यासणे, इंटरनेट व स्मार्टफोनचे व्यसन यावर संशोधन व सायबर बुलिंग याचे परिणाम अभ्यासणे,त्यावर उपाययोजना करणे, ऑनलाइन वर्तन, डिजिटल ओळख आणि व्यक्तिमत्व यांचा अभ्यास करणे, ऑनलाईन फसवणूक, फिशिंग आणि सायबर गुन्ह्यामागील मानवी वर्तनाचे विश्लेषण करणे तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता, वर्चुअल रियालिटी आणि गेमिंगच्या मानसशास्त्रीय परिणामाचा अभ्यास करणे इ. कामे करता येतात. याकरिता संशोधन संस्था, विद्यापीठ, महाविद्यालय, माहिती व तंत्रज्ञान क्षेत्र, सायबर सुरक्षा कंपन्या, सोशल मीडिया व डिजिटल वेल बीइंग प्रकल्प, मानसिक आरोग्य व समुपदेशन केंद्रे इ. ठिकाणी कार्य करता येते.

**सैन्य मानसशास्त्रज्ञ :** मानसशास्त्रातील क्लिनिकल सायकॉलॉजी, कौन्सिलिंग सायकॉलॉजी अथवा उपयोजित मानसशास्त्र यामध्ये विशेष पदव्युत्तर शिक्षणानंतर पीएच.डी. पदवी पूर्ण केल्यानंतर मिलिटरी सायकॉलॉजिस्ट म्हणून भारतीय आर्मी,भारतीय नेव्ही, इंडियन एअर फोर्स, डिफेन्स रिसर्च व डेव्हलपमेंट ऑर्गनायझेशन, सैन्य रुग्णालय, संरक्षण संस्था, सैनिक पुनर्वसन केंद्र, संरक्षण प्रशिक्षण अकादमी इ. ठिकाणी कार्य करता येते. या अंतर्गत सैनिकांची निवड व मूल्यांकन करणे, व्यक्तिमत्व, नेतृत्व, निर्णय क्षमता, भावनिक स्थिरता, यांचे मापन करणे, विशेष दलांसाठी योग्य उमेदवार निवडणे,चिंता, नैराश्य, तणाव व्यवस्थापन, युद्धजन्य मानसिक समस्या हाताळणे, प्रशिक्षण व विकास कार्यक्रमांचे नियोजन करणे इ. स्वरूपाची कार्य करावी लागतात.

**संशोधक व प्राध्यापक :** मानसशास्त्रातील पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केल्यानंतर यूजीसी नेट किंवा सेट परीक्षा उत्तीर्ण करणे, त्यानंतर मानसशास्त्रातील आचार्य पदवी पूर्ण करून महाविद्यालय, विद्यापीठ येथे अध्यापन, संशोधन कार्य करणे,संशोधन लेख व पुस्तके प्रकाशित करणे, मानसशास्त्रीय संशोधक म्हणून कार्य करणे इ. कामे करता येतात.

ज्या व्यतिरिक्त सुद्धा अनेक क्षेत्र असे आहेत की ज्या ठिकाणी विविध व्यवसायाच्या संधी उपलब्ध होऊ शकतात जसे, वैकासिक मानसशास्त्र, बोधात्मक मानसशास्त्र, चेतामानसशास्त्र, आरोग्य मानसशास्त्र, पर्यावरण मानसशास्त्र,सकारात्मक मानसशास्त्र, अभियांत्रिकी मानसशास्त्र असे कितीतरी क्षेत्र मानसशास्त्रामध्ये आहेत जिथे व्यवसायाच्या संधी उपलब्ध होऊ शकतात.


या सर्व क्षेत्रांमध्ये कार्य करण्याकरिता केवळ सिद्धांतिक ज्ञान पुरेसे नसून प्रत्यक्ष ज्ञान सुद्धा गरजेचे आहे. सध्याच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये विद्यार्थ्यांनी निवडलेल्या मेजर विषयाला व्यावसायिक कौशल्य अभ्यासक्रम (व्ही.एस.सी.) हा एक आयाम जोडण्यात आलेला आहे. जो राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे शक्तिस्थळ आहे असे म्हणणे अतिशयोक्ती होणार नाही कारण आता कोणत्याही व्यवसायामध्ये आपले स्थान निर्माण करायचे असल्यास विद्यार्थ्यांमध्ये त्या व्यवसायाकरिता लागणारी कौशल्य विकसित करणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे या आयामावर गांभीर्याने मेहनत घेतल्यास विद्यार्थ्यांना त्यांची व्यावसायिक कौशल्य विकसित करण्यास नक्कीच मदत होईल यात शंका नाही, मात्र मेजर या विषयाशी संबंधित व्हर्टीकल्स बाबत शासन किती गंभीर आहे याची कल्पना मात्र सध्या करता येणं कठीण आहे. तरी शासनाला खरोखर विद्यार्थ्यांच भलं करायचं आहे आणि शिक्षणामधून व्यावसायिक कौशल्य विकसित करायचे आहेत, यावर तत्वतः विश्वास ठेवून आपण एक शिक्षक म्हणून आपले कार्य प्रामाणिकपणे करून विद्यार्थ्यांसाठी सतत क्रियाशील राहू या शंका नाही.

**डॉ. गजानन र. रत्नपारखी**
मानसशास्त्र विभाग प्रमुख
महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, अमरावती



# दिवसा अंधार, रात्री उजेड!

## सस्ती वीज उपकेंद्राच्या कारभाराविरोधात ग्रामस्थ संतप्त



### वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे शेतकरी, नागरिक हैराण

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील सस्ती वीज उपकेंद्राच्या भोंगळ आणि निष्काळजी कारभारामुळे परिसरातील ग्रामस्थांना मोठ्या मनस्तापाला सामोरे जावे लागत असल्याचा आरोप होत आहे. गेल्या काही दिवसांपासून दिवसा वारंवार वीजपुरवठा खंडित होत असून रात्री मात्र सुरळीत वीजपुरवठा केला जात असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

खेट्री परिसरातील अनेक गावांमध्ये दिवसा अचानक वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रकार सातत्याने घडत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांची कृषी कामे, लघुउद्योग तसेच घरगुती कामकाज विस्कळीत होत आहे. वाढत्या उकाड्यात नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असून विद्यार्थ्यांच्या अभ्यासावरही परिणाम होत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. यात भर म्हणजे, मागील दोन महिन्यांपासून संबंधित लाईनमन परिसरात फिरकत नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. प्रभारी लाईनमनकडूनही आवश्यक ती दखल घेतली जात नसल्याने विद्युत यंत्रणेत निर्माण होणारे बिघाड त्वरित दूर होत नाहीत. परिणामी, किरकोळ तांत्रिक समस्या देखील अनेक दिवस प्रलंबित राहत असल्याचे चित्र आहे.

ग्रामस्थांनी याबाबत अनेक वेळा वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रारी केल्या. मात्र अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याने नागरिकांमध्ये संताप वाढत आहे. संबंधित विभागाच्या उदासीन भूमिकेमुळे वीज ग्राहकांना नाहक मनस्ताप सहन करावा लागत असल्याची भावना व्यक्त होत आहे. सस्ती उपकेंद्रातील वीजपुरवठा व्यवस्थेतील अनियमितता तात्काळ दूर करून नियमित आणि अखंड वीजपुरवठा सुरू करावा, तसेच जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

#### “ कनिष्ठ अभियंत्यांचा फोन कायम ‘स्विच ऑफ’?

वीजपुरवठ्यातील बिघाड, तांत्रिक अडचणी किंवा ग्राहकांच्या तक्रारींचे निराकरण करण्याची जबाबदारी कनिष्ठ अभियंत्यावर असते. मात्र सस्ती वीज उपकेंद्रातील कनिष्ठ अभियंत्यांचा मोबाईल फोन बहुतांश वेळा बंदच असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. ’अधिकाऱ्यांचाच फोन लागत नसेल तर समस्या मांडायची कुणाकडे?’ असा सवाल उपस्थित करत ग्रामस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. प्रशासनाने याची गंभीर दखल घेऊन ग्राहकांसाठी प्रभावी संपर्क व्यवस्था उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी होत आहे.

# भरतपूर–नकाशी मार्गावर भीषण अपघात

## पिंपळखुटा येथील महिलेचा जागीच मृत्यू

■ प्रतिनिधी | खेट्री ■

अकोला-वाडेगाव मार्गावरील भरतपूर-नकाशी दरम्यान बुधवारी दुपारी झालेल्या भीषण दुचाकी अपघातात पातूर तालुक्यातील पिंपळखुटा येथील २५ वर्षीय महिलेचा जागीच मृत्यू झाला. या दुर्घटनेत दोन लहान मुले गंभीर जखमी झाली असून दुसऱ्या दुचाकीवरील चालकाच्याही गंभीर दुखापती झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पिंपळखुटा येथील आशिक शाह हे पत्नी समीना बी आशिक शाह (वय २५) व दोन मुलांसह दुचाकीने अकोल्याकडे जात होते. बुधवारी दुपारी सुमारे १२ वाजताच्या सुमारास भरतपूर-नकाशी दरम्यान त्यांच्या दुचाकीची अकोल्याकडून वाडेगावकडे येणाऱ्या दुसऱ्या दुचाकीशी समोरासमोर जोरदार धडक झाली.



अपघात इतका भीषण होता की, समीना बी या दुचाकीवरून खाली फेकल्या गेल्या आणि त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. अपघातात त्यांची दोन्ही मुले गंभीर जखमी झाली असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. तसेच दुसऱ्या दुचाकीवरील चालकालाही गंभीर दुखापत झाली असून त्याचा पाय तुटल्याची माहिती प्रत्यक्षदर्शींनी दिली.

घटनेची माहिती मिळताच बाळापूर पोलीस ठाणे व वाडेगाव पोलिस चौकीचे कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी जखमींना रुग्णवाहिकेद्वारे उपचारासाठी अकोला येथे रवाना केले. तसेच घटनास्थळाचा पंचनामा करून वाहतूक सुरळीत केली.

या अपघातामुळे काही काळ अकोला-वाडेगाव मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. अचानक घडलेल्या या दुर्घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून मृत महिलेच्या पश्चात पती व दोन लहान मुले असा परिवार आहे. या प्रकरणाचा पुढील तपास बाळापूर पोलीस करीत आहेत.

# तुकाराम मुंढे यांना मुदतवाढ द्या

## शेतकरी राजा ग्रुपची मुख्यमंत्र्यांकडे मागणी



■ प्रतिनिधी | खेट्री ■

अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांना त्यांच्या पदावर कायम ठेवून मुदतवाढ देण्यात यावी, अशी मागणी पातूर तालुक्यातील शेतकरी राजा ग्रुपच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री यांना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत निवेदन सादर करण्यात आले.

शेतकरी राजा ग्रुपने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, तुकाराम मुंढे हे कर्तव्यदक्ष, प्रामाणिक आणि जनहिताला प्राधान्य देणारे अधिकारी म्हणून ओळखले जातात. अन्न व औषध प्रशासन विभागात कार्यरत असताना त्यांनी अन्नपदार्थ व औषधांच्या गुणवत्तेबाबत कठोर भूमिका घेत अनेक प्रभावी निर्णय राबविले. त्यांच्या कार्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना सुरक्षित व दर्जेदार अन्न व औषधे उपलब्ध होण्यास मदत झाली आहे.

संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी नमूद केले की, राज्यात अशा धाडसी आणि कार्यक्षम अधिकाऱ्यांची नितांत गरज आहे. जनहिताच्या दृष्टीने घेतलेल्या त्यांच्या निर्णयांमुळे प्रशासनाविषयी लोकांचा विश्वास वाढला आहे. त्यामुळे त्यांच्या कार्याची दखल घेत शासनाने त्यांना पदावर कायम ठेवून मुदतवाढ द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. मुंढे यांच्या संभाव्य बदलीबाबत जनतेमध्ये नाराजीची भावना निर्माण होऊ शकते, असेही निवेदनात म्हटले असून शासनाने या मागणीचा सकारात्मक विचार करावा, अशी अपेक्षा शेतकरी राजा ग्रुपने व्यक्त केली आहे.

निवेदन सादर करताना शेतकरी राजा ग्रुपचे रवि सोनोने, ज्ञानेश्वर गाडगे, सदा घोरे, दशरथ सरदार, गणेश ताले, गोपाल पजई, राहुल पाटील, शालिग्राम राऊत यांच्यासह अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### जिल्ह्यात पावसाची शक्यता

**अकोला :** जिल्ह्यात दि. २४ जून ते २८ जूनपर्यंत काही ठिकाणी विजाच्या कडकडासह पाऊस पडण्याची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान केंद्राने वर्तवली आहे.यादरम्यान ताशी ४० ते ५० किमी प्रतितास याप्रमाणे हवेचा वेग राहण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी सोसाट्याचा वारा आणि ढगांच्या गडगडाटांसह विजा आणि पाऊस पडण्याचा अंदाज केंद्राने व्यक्त केला आहे.

# अकोला येथील मुरारका हॉस्पिटलमध्ये कुत्रिम पाय वितरण शिबिर

## गुडघ्या पासून खाली व वर पाय गमावणाऱ्या दिव्यांग व्यक्तींसाठी मोफत उपक्रम

■ प्रतिनिधी | अकोला ■

कुत्रिम पाय वितरण शिबिरात आपली सेवा देणारे संत गजानन महाराज, शेगाव येथील रहिवासी असणारे ज्येष्ठ अस्थिरोग तज्ञ डॉ. कैलाश मुरारका हे अनेक वर्षा पासून जयपूर फूट अर्थात कुत्रीम पाय वितरण उपक्रम राबिवत आहेत. या उपक्रमला विदर्भातील विविध जिल्ह्यातील दिव्यांग व्यक्तींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. त्यामुळे अनेकदा जयपूर फूट ,कृत्रिम पाय शिबिर घेण्यात आले.



सन २०१२ मध्ये विदर्भात प्रथमच अकोला येथील मुरारका हॉस्पिटल मध्ये जयपुर फूट सेंटर सुरू करून त्यास लागणारे आवश्यक उपकरणे, साधन आणून येथेच जयपूर फूट,कृत्रिम पाय बनवणे त्यांनी सुरू केले. या केंद्राचे उद्घाटन माजी आ. स्व गोवर्धन शर्मा,आ हरीशभाऊ पिंपळे यांच्या हस्ते करण्यात आले होते. आता पर्यंत या केंद्रात १५०० पेक्षा जास्त मोफत जयपूर फूट वितरण करून विक्रम प्रस्थापित केला आहे. डॉ कैलाश मुरारका त्यांनी १९८३ मध्ये मुंबई येथील केईएम हॉस्पिटल व एसआरसीसी हाजी अली येथून आर्थोपेडिकचे वैद्यकीय उच्च शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर शेगाव व अकोला येथे आपली सेवा सुरू केली.

१९८४ पासून मुरारका हॉस्पिटलचा विस्तार करून आजपर्यंत त्यांची अकोला व शेगावला सेवा सुरू आहे. त्यांच्या समवेत त्यांचे सुपुत्र आर्थोपेडिक तज्ञ डॉ. अचिन मुरारका हे पण नियमित सेवा देत आहेत. डॉ आचिन यांनी यूएसए फीनिक्स व न्यूयॉर्क, कनाडा ,टोरंटो येथून जॉईंट रिप्लेसमेंट व आर्थोस्कोपीचे वैद्यकीय शिक्षण प्राप्त केले आहे. ते मुरारका हॉस्पिटल येथे २०१७ पासून आपली आर्थोपेडिक, जॉईंट रिप्लेसमेंट व आर्थोस्कोपी क्षेत्र मध्ये वैद्यकीय सेवा देत आहे. या जयपूर फूट कुत्रिम पाय शिबिराचा लाभ घेण्यासाठी ज्यांचे पाय अपघात, गँगरीन अथवा अन्य कारणास्तव गमावविले आहेत अश्या दिव्यांग रुग्णांनी स्थानीय दुर्गा चौक येथील मुरारका हॉस्पिटल मध्ये संपर्क साधावा. गुडघ्यापासून खाली व वर पाय गमावणाऱ्या गरजू दिव्यांग व्यक्ती साठी हे कुत्रीम पाय तज्ञाकडून निर्माण करून ते दिव्यांग व्यक्तींना लावण्यात येणार आहेत. यात उच्च दर्जाचे जयपूर फूट डॉ. कैलाश मुरारका, हर्षित मुरारका याच्या मार्गदर्शनात बसविण्यात येणार आहेत.

या मोफत शिबिरासाठी गरजू महिला व पुरुष दिव्यांग व्यक्तींच्या नावाची नोंदणी सुरू झाली असून गरजुनी आपल्या ४ बाय ६ साईजचे दोन फोटो व माहिती सह आपले नाव नोंदणी २३ जून ते ८ जुलै २०२६ पर्यंत मुरारका हॉस्पिटल, दुर्गा चौक, जठारपेठ रोड, अकोला येथे करावी असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# ‘पं. दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा’; सुशिक्षित युवक- युवतींना रोजगाराची सुवर्णसंधी

■ प्रतिनिधी | अकोला ■

नोकरीच्या शोधात असलेल्या सुशिक्षित युवक-युवतींना स्थानिक तसेच इतर जिल्ह्यातील नामवंत खासगी कंपन्या, कारखाने आणि उद्योगसमूहांच्या माध्यमातून चांगल्या रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रातर्फे श्री शिवाजी कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात येत्या २९ जुन, २०२६ रोजी सकाळी १० वा. ’पं. दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

अकोला जिल्हयातील युवक युवतींना नोकरीच्या संधी मिळवून देण्याच्या उद्देशाने जास्तीत जास्त उमेदवारांना रोजगार मेळाव्या मधून नोकरी देण्याचा प्रयत्न जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र करते. त्यात विविध उद्योजकांना आवश्यक असणा-या वेगवेगळ्या पात्रतेच्या पदाकरिता प्रिसीजन मॅपिंग जिआयएस प्रा. लि. अमरावती, धुत ट्रान्समिशन लि. छत्रपती संभाजीनगर, अश्पा ग्लोबल सर्व्हिसेस प्रा. लि, नागपूर, क्वेस कॉर्प लिमिटेड, पुणे उत्कर्ष स्मॉल फायनान्स बैंक, नागपूर खंडेलवाल ऑटोव्हील्स प्रा. लि., अकोला (मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत) केअर हॉस्पिटल कार्डियाक अँड सुपरस्पेशालिटी, अकोला (मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत) गुजरात अंबुजा एक्सपोर्ट्स लि. अकोला, (मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत). ई आस्थापना / कंपन्यांचे प्रतिनिधी प्रत्यक्ष उपस्थित राहून उमेदवारांच्या थेट मुलाखती घेतील व मुलाखत देऊन पात्र ठरणा-या उमेदवारांना लगेचच नोकरीची संधी मिळेल. या मेळाव्यामध्ये गरजू विद्यार्थ्यांनी सहभागी होण्यासाठी ैण्ैर्ीि दन.गह या संकेत स्थळावर भेट द्या. एम्प्लॉईमेंट या टॅबवर क्लिक करा. जॉब सीकर हा पर्याय निवडून आपला नोंदणी/आधार कार्ड क्र. व पासवर्ड साईन इन करा. आपल्या होम पेजवरील जॉब फेअर हा पर्याय निवडा. डिस्ट्रिक्ट मध्ये अकोला जिल्हा निवडून फील्टर बटनबर क्लिक करावे. नंतर सदर दिनांकित मेळावा निदर्शनास येईल त्यासमोर असलेल्या ॲक्कान बटनच्या खाली व्ह्यू व अप्लाय बटन दिसेल. तदनंतर मेळाव्यास उपस्थित राहणारे उद्योजक व त्यांच्याकडील पदाबाबत माहिती दिसेल, आपल्या पात्रतेनुसार पदाची निवड करून अप्लाय बटनवर क्लिक करा.

# एकल महिला धोरणाबाबत जिल्हास्तरीय बैठकीत मंथन

**अकोला :** विधवा, घटस्फोटित, परित्यक्ता, अविवाहित तसेच इतर एकल महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी स्वतंत्र आणि व्यापक एकल महिला धोरण तयार करण्यात येत आहे. या निर्मिती प्रक्रियेत स्थानिक स्तरावरील सूचना, अनुभव आणि अपेक्षांचा समावेश करण्यासाठी बैठक जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयात सोमवारी झाली.

महिला व बाल विकास आयुक्त, जिल्हाधिकारी वर्षा मीना, मुख्य कार्यकारी अधिकारी अनय नावंदर यांच्या मार्गदर्शनानुसार या बैठकीत एकल महिलांच्या विविध प्रश्नांवर सखोल चर्चा करण्यात आली. यावेळी व्यापक व लोकाभिमुख धोरण निर्मितीसाठी विविध क्षेत्रातील मान्यवर, स्वयंसेवी संस्था व महिला संघटनांच्या प्रतिनिधींनी सहभाग नोंदविला. राज्य महिला आयोगाच्या माजी सदस्या डॉ. आशा मिरगे, राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे माजी सदस्य ॲड. संजय सेंगर, राज्य अन्न आयोगाच्या सदस्या माया इरातकर, बाल कल्याण समितीच्या अध्यक्षा ॲड.अनिता गुरव, सदस्य ॲड. शीला तोषणीवाल, राजेश देशमुख, प्रा. प्रांजली जैस्वाल, डॉ. सीमा तायडे, नारी शक्ती फाऊंडेशनच्या सुमैय्या अली, ॲड. राधा मिश्रा, झिंगूबाई बोलके आदी मान्यवर उपस्थित होते.केवळ

# पिढीला आपल्या शुद्धतेची ओळख करून द्या – सोनी

■ प्रतिनिधी | अकोला ■

समाज हळूहळू आपली शुद्धता हरवत चालला आहे. त्यामुळे आजची पिढी योग्य मार्गदर्शनाच्या अभावामुळे समाजाची पारंपरिक ओळख नाश करत आहे.यामुळे त्याचा सांस्कृतिक व सामाजिक रचनेवर परिणाम होत आहे. या गंभीर धोक्याची जाणीव होताच समाजाने आपली पारंपरिक शुद्धता राखणे अनिवार्य असल्याचे मत जालना येथील उद्योगपती द्वारकाप्रसाद सोनी यांनी व्यक्त केले.



माहेश्वरी समाज ट्रस्टच्या वतीने व सर्व संबंधित संस्थांनी माहेश्वरी भवनात महेश नवमी मोठ्या उत्साहाने साजरी केली. या कार्यक्रमात मुख्य अतिथी म्हणून सोनी यांनी समाजाच्या सदस्यांना मार्गदर्शन केले.समाजाचे अध्यक्ष विजयकुमार तोष्णीवाल यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या समारंभात प्रधानमंत्री विजयकुमार राठी, उत्सव प्रमुख नरेश बियाणी, पूजा यजमान गोपाल पनपालिया, महिला मंडळाच्या अध्यक्षा वंदना हेडा, वरिष्ठ प्रकोष्ठाचे अध्यक्ष सुरेश माहेश्वरी, वरिष्ठ महिला प्रकोष्ठाच्या अध्यक्षा प्रमिला लाहोटी, प्रगती मंडळाचे अध्यक्ष सूरज काबरा, नवयुवती मंडळाच्या अध्यक्षा नंदिनी बजाज आदी उपस्थित होते.भगवान महेशाची पूजा करून कार्यक्रमाचे प्रारंभ करण्यात आले. द्वारकाप्रसाद सोनी यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की समाजाची युवा पिढी मोठ्या पगाराची अपेक्षा घेऊन नोकरीच्या मागे धावत आहे, परंतु समाज नोकरी करणारा नव्हे तर नोकरी देणारा व्हायला हवा.

## जाहीर नोटीस

### वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. ९००/२०२६ — प्रोसेस नं.७८३८/२०२६
चौ.ता. ३०/०७/२०२६ — दिनांक : २०/०६/२०२६

**अर्जदार :** १. सफिया सुलताना तार मोहम्मद रा. रझा मस्जिद जवळ, हाजी नगर, अकोट फैल, अकोला. ता. जि. अकोला. २. साजिद अहमद तार मोहम्मद रा. हाजी नगर, अकोट फैल, रझा मस्जिदच्या मागे, अकोला. ता. जि. अकोला. ३. अस्मा ताझीन मोहम्मद अन्वरूददीन रा. रफिक किराणा शॉप जवळ, हाजी नगर, अकोट फैल, रझा मस्जिदच्या मागे, अकोला. ता. जि. अकोला, ४. मोहम्मद सोहेल फझल तार मोहम्मद रा. रझा मस्जिदच्या मागे, अकोट फैल, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : तार मोहम्मद मोहम्मद याकुब
**पत्ता :-** रा. व्दारा मोहम्मद सोहेल फझल तार मोहम्मद रझा मस्जिदच्या मागे, हाजी नगर, अकोट फैल, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत तार मोहम्मद मोहम्मद याकुब यांचे दि. ०८/०४/२०२६ रोजी हाजी नगर, अकोट फैल अकोला, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांने कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे..

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ३०/०७/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २०/०६/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

### वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. ७८१/२०२६ — प्रोसेस नं.६६२६/२०२६
चौ.ता. २३/०६/२०२६ — दिनांक : ०८/०५/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती कस्तुराबाई रामचंद्र वानखडे २. दिलीप रामचंद्रजी वानखडे ३. अशोक रामचंद्रजी वानखडे १ ते ३ रा. गौरक्षण रोड, सिद्धेश्वर मंदीराजवळ, मलकापुर, अकोला, ता. जि. अकोला. ४. सौ. आशाताई मोहनराव धनभर रा. मु. पोस्ट किनखेड पूर्णा, ता. अकोट, जि. अकोला. ५. सौ. कल्पना राजेश जुमळे रा. शिवमंदीर जवळ गोदेवाडा, बोरगाव मंजू, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : रामचंद्र सिताराम वानखडे
**पत्ता :-** रा. गौरक्षण रोड, सिद्धेश्वर मंदीराजवळ, मलकापुर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७ कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत रामचंद्र सिताराम वानखडे यांचे दि. १८/११/२०२३ रोजी राहत्या घरी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २३/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०८/०५/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

### वि. ०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. ८८५/२०२६ — प्रोसेस नं.७६५७/२०२६
चौ.ता. २९/०७/२०२६ — दिनांक : १७/०६/२०२६

**अर्जदार :** १. साधना अशोक बोरकर रा. डी १२, पांडे सदन, मोहिली गाव, साकिनाका पाइप लाइन, साकीनाका, मुंबई ४०००७२ २. सुभाष माधवराव मेश्राम रा. सिद्धार्थ नगर, आंबेडकर चौक, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला. मो. नं. ९९२३६२७४८७ ३. सुनिता सुरेश नाइक रा. बी एफ ४९, एम ओ जी लाइन, इंदौर, इंदौर शहर २, मध्यप्रदेश. ४५२००२ ४. संजय माधवराव मेश्राम रा. सिद्धार्थ नगर, आंबेडकर चौक, मोठी उमरी, उमरी प्र, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. माधवराव जानुजी मेश्राम २. श्रीमती गौकर्णाबाई माधवराव उर्फ माधवराम मेश्राम
**पत्ता :-** रा. सिद्धार्थ नगर, उमरी (मोठी) अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत माधवराव जानुजी मेश्राम यांचे दि. २२/०५/२०२५ रोजी व तसेच मयत श्रीमती गौकर्णाबाई माधवराव उर्फ माधवराम मेश्राम यांचे दि. १८/०९/२०२० रोजी अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २९/०७/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १७/०६/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

### वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. ८९०/२०२६ — प्रोसेस नं.७८१९/२०२६
चौ.ता. ३०/०७/२०२६ — दिनांक : २०/०६/२०२६

**अर्जदार :** १. वैभव किशोर पाठक २. गौरव किशोर पाठक दोघेही रा. ताले अपार्टमेंट क्र. ४, फ्लॅट क्र. ३, सिद्धि विनायक मंगल कार्यालयाच्या बाजुला, रणपिसे नगर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. किशोर हनुमानप्रसाद पाठक २. अंजली किशोर पाठक
**पत्ता :-** रा. ताले अपार्टमेंट क. ४, फ्लॅट क्र. ३, सिद्धि विनायक मंगल कार्यालयाच्या बाजुला, रणपिसे नगर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत किशोर हनुमानप्रसाद पाठक यांचे दि. १४/०४/२०२६ रोजी ओझोन हॉस्पिटल, अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे. तसेच मयत अंजली किशोर पाठक यांचे दि. १६/०४/२०२१ रोजी आयकॉन हॉस्पिटल, अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ३०/०७/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २०/०६/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

### वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. ८५९/२०२६ — प्रोसेस नं. ७७५१/२०२६
चौ.ता. ३०/०७/२०२६ — दिनांक : १९/०६/२०२६

**अर्जदार :** १. भारती मंगलसिंग डाबेराव मो. नं. ९६९९३५६७७५ २. जान्हवी मंगलसिंग डाबेराव ३. कमलाबाई मंगलसिंग डाबेराव सर्व रा. किनखेड ता. अकोट जि. अकोला. सध्या रा. जि. प. क्वार्टर, उमरी रोड, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : मंगलसिंग अभिमान डाबेराव
**पत्ता :-** रा. जि. प. क्वार्टर, उमरी रोड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार ह्यांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत मंगलसिंग अभिमान डाबेराव यांचे दि. १७/०५/२०२६ रोजी राहते घरी जि. प. क्वार्टर, उमरी रोड, अकोला. ता. जि. अकोला. येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ३०/०७/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १९/०६/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १९८**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## संक्षिप्त

### दुचाकीच्या धडकेत दोघे जखमी

**आष्टी** - भरधाव दुचाकीच्या धडकेत दोन जण गंभीर जखमी झाल्याची घटना बसस्टॉपसमोर घडली. या अपघातात श्रावण हरिभाऊ सातपुते (५९, रा. बारीपुरा) व भाजीपाला विक्रेता मारोतराव इंगोले हे गंभीर जखमी झाले आहेत. प्राप्त माहितीनुसार, श्रावण सातपुते हे भाजीपाला खरेदीसाठी गेले असताना तळेगावकडून वेगाने येणाऱ्या एमएच ४९ आर ७०९४ क्रमांकाच्या दुचाकीने त्यांना जोरदार धडक दिली. धडकेनंतर दुचाकीने जवळच असलेल्या मारोतराव इंगोले यांनाही उडविले. या अपघातात दोघांनाही गंभीर दुखापत झाली असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. याप्रकरणी दुचाकीस्वार रोशन सुरेश उईके (रा. मादापूर) याच्याविरुद्ध निष्काळजीपणे वाहन चालविल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

### विहिरीत आढळला अनोळखी व्यक्तीचा मृतदेह

**हिंगणघाट** - तालुक्यातील वेळा शिवारात एका शेतातील विहिरीत अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली. राहुल सायंकार यांच्या शेतातील विहिरीत पाण्यावर मृतदेह तरंगताना दिसून आला. शेतमजुरांच्या निदर्शनास ही बाब आल्यानंतर त्यांनी तत्काळ पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून पंचनामा केला व मृतदेह बाहेर काढून उत्तरीय तपासणीसाठी रुग्णालयात पाठविला. मृत व्यक्तीची ओळख अद्याप पटलेली नसून त्याचे वय अंदाजे मध्यमवयीन असल्याचे सांगण्यात येत आहे. घटनेमागील कारण स्पष्ट झालेले नसून पोलिस विविध अंगांनी तपास करीत आहेत. याप्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून मृतकाची ओळख पटविण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

### आजाराला कंटाळून वृद्ध महिलेची आत्महत्या

**देवळी** - दीर्घकालीन आजाराला कंटाळून एका वृद्ध महिलेने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना वायगाव (निपाणी) येथे उघडकीस आली. मायाबाई नगराळे (६५) असे मृत महिलेचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मायाबाई यांनी घरातील छताच्या लाकडी फाट्याला नायलॉन दोरीच्या साहाय्याने गळफास घेतला. कुटुंबीयांच्या निदर्शनास ही बाब आल्यानंतर त्यांना तातडीने खाली उतरविण्यात आले; मात्र तोपर्यंत त्यांचा मृत्यू झाला होता. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. प्राथमिक तपासात त्या काही काळापासून आजारी असल्याची माहिती समोर आली असून त्यातूनच त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. याप्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद करून पुढील तपास सुरू आहे.

### शेतशिवारात अज्ञात व्यक्तीचा मृतदेह

**वर्धा** - तुळजापूर ते पहेलानपूर मार्गालगत असलेल्या शेतशिवारात अज्ञात व्यक्तीचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली. दहेगाव पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संदीप कावळे यांच्या शेताजवळील एका झाडाखाली ५५ ते ६० वर्षे वयोगटातील पुरुषाचा मृतदेह पडलेल्या अवस्थेत आढळून आला. स्थानिक नागरिकांनी याची माहिती पोलिसांना दिल्यानंतर घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा करण्यात आला. मृत व्यक्तीची ओळख अद्याप पटलेली नसून त्याच्याजवळ कोणतीही ओळखपत्रे मिळून आली नसल्याची माहिती आहे. मृत्यूचे नेमके कारण समजू शकले नसल्याने मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठविण्यात आला आहे. पोलिसांनी मर्ग दाखल करून मृतकाची ओळख पटविण्याचे प्रयत्न सुरू केले असून विविध अंगांनी तपास केला जात आहे.

### महिलेला मारहाण; नातेवाईकाविरुद्ध गुन्हा

**वर्धा** - नातेवाईक महिलेला मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी एका व्यक्तीविरुद्ध पुलगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना सुभाषनगर, पुलगाव येथे घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शेख फारूक शेख इस्माईल यांनी कौटुंबिक वादातून संबंधित महिलेस शिवीगाळ करत मारहाण केली. तसेच तिला जीवे मारण्याची धमकीही दिल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. पीडित महिलेने पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केल्यानंतर पोलिसांनी प्रकरणाची गंभीर दखल घेतली. तक्रारीच्या आधारे शेख फारूक शेख इस्माईल यांच्याविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात चर्चेला उधाण आले असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

### संशयास्पदरीत्या वावरताना युवकावर कारवाई

**वर्धा** - संशयास्पदरीत्या वावरत असल्याच्या संशयावरून एका युवकाविरुद्ध हिंगणघाट पोलिसांनी कारवाई करून गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई आठवडी बाजार परिसरात गस्तीदरम्यान करण्यात आली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पियूष राजू कुडमेथे (रा. हिंगणघाट) हा आपली ओळख व अस्तित्व लपवून संशयास्पद हालचाली करताना आढळून आला. गस्त घालणाऱ्या पोलिसांनी त्याची चौकशी केली असता समाधानकारक उत्तरे मिळाली नाहीत. त्यामुळे त्याच्याविरुद्ध प्रतिबंधात्मक स्वरूपाची कारवाई करण्यात आली. पोलिसांनी त्याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे. सार्वजनिक ठिकाणी संशयास्पद हालचालींवर पोलिसांचे विशेष लक्ष असून अशा प्रकारच्या व्यक्तींवर नियमित कारवाई करण्यात येत असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक २०८
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

रेल्वेला द्या श्रद्धेची गती ; खा. काळेंची शेगावपर्यंत विस्ताराची मागणी

# तोट्यातील वर्धा-कळंब रेल्वेला ‘गजानन-चिंतामणी’जोडणीचा आधार

**वर्धा/जनमाध्यम**

वर्धा-कळंब रेल्वेगाडी केवळ ५० किलोमीटर अंतरावर धावत असल्याने अपेक्षित प्रवासी प्रतिसाद मिळत नसून ही सेवा आर्थिकदृष्ट्या तोट्यात जात असल्याचे चित्र आहे. या पार्श्वभूमीवर खा. अमर काळे यांनी रेल्वे प्रशासनासमोर महत्त्वपूर्ण प्रस्ताव मांडत वर्धा-कळंब रेल्वेगाडीचा विस्तार थेट शेगावपर्यंत करण्याची जोरदार मागणी केली आहे.




मध्य रेल्वे, मुंबईचे महाव्यवस्थापक यांना पाठविलेल्या पत्रात खासदार काळे यांनी नमूद केले की, सध्या सुरू असलेली वर्धा-कळंब रेल्वे सेवा प्रवाशांच्या अपेक्षा पूर्ण करण्यात अपयशी ठरत आहे. ही गाडी शेगाव-वर्धा-कळंब आणि कळंब-वर्धा-शेगाव अशी चालविण्यात आल्यास प्रवासी संख्या मोठ्या प्रमाणात वाढेल आणि रेल्वेच्या उत्पन्नातही भर पडेल.यवतमाळ जिल्ह्यातील प्रसिद्ध चिंतामणी गणपती देवस्थान, कळंब आणि बुलढाणा जिल्ह्यातील संत गजानन महाराजांची कर्मभूमी शेगाव यांना रेल्वेमार्गाने जोडण्याची ही संकल्पना धार्मिक व सामाजिक दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाची असल्याचे त्यांनी म्हटले आहे. या जोडणीमुळे हजारो भाविकांना दर्शनासाठी सुलभ, सुरक्षित आणि स्वस्त प्रवासाची सुविधा उपलब्ध होईल. तसेच विदर्भातील धार्मिक पर्यटनाला मोठी चालना मिळेल.

या रेल्वेगाडीला चिंतामणी-गजानन एक्सप्रेस असे नाव देण्याचीही सूचना खासदार काळे यांनी केली आहे. श्रद्धा, विकास आणि प्रवासी सुविधा यांचा संगम साधणाऱ्या या मागणीचा सकारात्मक विचार करून रेल्वे प्रशासनाने गाडीचा विस्तार तातडीने मंजूर करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

## विद्यार्थ्यांची चमकदार कामगिरी

### तुळसकर फार्मसी कॉलेजचा निकाल ९० टक्के

**हिंगणघाट/जनमाध्यम**

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या (एमएसबीटीई) उन्हाळी २०२६ च्या डी. फार्मसी परीक्षेत हिंगणघाट येथील विद्या विकास शिक्षण संस्थेद्वारे संचालित तुळसकर फार्मसी कॉलेजने उल्लेखनीय यश संपादन करत शैक्षणिक क्षेत्रात आपली गुणवत्ता पुन्हा एकदा सिद्ध केली आहे. प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट निकालाची नोंद करत महाविद्यालयाच्या यशात मोलाचा वाटा उचलला आहे.




डी. फार्म प्रथम वर्षाच्या परीक्षेसाठी प्रवेश घेतलेल्या ६६ विद्यार्थ्यांपैकी ६३ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. त्यापैकी बहुसंख्य विद्यार्थ्यांनी यश मिळवत महाविद्यालयाने तब्बल ९० टक्के निकालाची नोंद केली. प्रथम वर्षात मीनाक्षी जयस्वाल हिने ८१.६० टक्के गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला. करिश्मा शेंडेकर हिने ८०.३० टक्के गुणांसह द्वितीय, अचल नेवारे हिने ८०.१० टक्के गुणांसह तृतीय, रिया मगर हिने ७९.१० टक्के गुणांसह चतुर्थ तर साहेबुनिषा खान हिने ७७.७० टक्के गुणांसह पंचम क्रमांक मिळविला.द्वितीय वर्षाच्या निकालातही विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी केली. मोनिका गोलहार हिने ८२.७३ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक मिळविला. दीप्ती अवचट ७९.२७ टक्के गुणांसह द्वितीय, शिवानी झाडे ७२.९१ टक्के गुणांसह तृतीय, लोकेश वरभे ७२.८२ टक्के गुणांसह चतुर्थ आणि आकांक्षा मसराम ७१.५५ टक्के गुणांसह पंचम क्रमांकावर राहिली.

या यशामागे संस्थेचे अध्यक्ष डॉ. उमेश तुळसकर, सचिव तथा हिंगणघाट नगरपालिकेच्या अध्यक्षा डॉ. नयना उमेश तुळसकर यांचे मार्गदर्शन तसेच प्राचार्य डॉ. महेंद्र गुंडे यांच्या नेतृत्वाखालील प्राध्यापकांचे परिश्रम असल्याचे महाविद्यालय प्रशासनाने सांगितले.विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य, प्राध्यापकवृंद आणि पालकांनी अभिनंदन करत त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव केला आहे. तुळसकर फार्मसी कॉलेजची ही यशस्वी घोडदौड परिसरातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

## सामान्य रुग्णालयाच्या आयुष विभागात योग दिन साजरा

**वर्धा/जनमाध्यम**



जागतिक योग दिनानिमित्त सामान्य रुग्णालयातील आयुष विभागात अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कल्पना सुनतकरी यांच्या उपस्थितीत योग दिन साजरा करण्यात आला.

यावेळी बाल रोगतज्ञ डॉ. संजय गाठे, नेत्ररोग तज्ञ डॉ. मोहन सुटे, जयश्री मिसाळ, अपुर्वा सरदार यांची उपस्थिती होती. आयुष विभागाचे योग शिक्षक डॉ. शंकर तायडे यांनी उपस्थितांना योग प्रात्याक्षिके करुन आसने करुन घेतली. यावेळी डॉ. कल्पना सुनतकरी व डॉ. संजय गाठे यांनी उपस्थितांना योगदिन व दैनंदिन जिवनातील योगाचे महत्व सांगितले. तसेच आयुष विभागात नियमित सकाळी ९ ते १० वेळात सुरु असलेल्या योग वर्गाचा कर्मचारी, अधिकारी व रुग्णांनी लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

योग सप्ताहांतर्गत योगतज्ञ डॉ.शंकर तायडे यांनी महिला आरोग्य व योग, किशोरवयीन मुलींसाठी योग संस्कार, सुदृढ आरोग्यासाठी योग, वार्धक्याकरीता योग, बौध्दिक विकास व योग, मानसिक स्वास्थाकरीता योग या संबंधित व्याख्याने घेण्यात आली.कार्यक्रमाचे आभार डॉ. नम्रता सलुजा यांनी मानले. कार्यक्रमाला डॉ.आश्विनी डोणे, मनिषा कलवडे, अरुणा भागवत, दिव्या कनेरी, इतर वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी तसेच नर्सिंग स्कुलच्या विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

कर्जमाफीसह कृषी समृद्धीवर सरकारचा भर

## ५६ लाख शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा निर्धार;विधानसभेत कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांची माहिती

**मुंबई/जनमाध्यम**

राज्यातील शेतकऱ्यांचे सक्षमीकरण आणि सर्वांगीण विकास हेच महायुती सरकारचे प्रमुख उद्दिष्ट असून शेतकरी हा सरकारच्या धोरणांचा केंद्रबिंदू आहे, असे प्रतिपादन कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी बुधवारी विधानसभेत केले. शेतकरी हिताच्या विविध योजनांची माहिती देताना त्यांनी कर्जमाफी, कृषी समृद्धी योजना आणि हवामान बदलाच्या आव्हानांवर सरकारची भूमिका स्पष्ट केली.

भरणे म्हणाले की, निवडणुकीदरम्यान महायुतीने शेतकऱ्यांना कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. त्यानुसार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी संघटनांच्या प्रतिनिधींशी चर्चा करण्यात आली. त्यातून राज्यातील आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी कर्जमाफीचा निर्णय घेण्याची भूमिका सरकारने स्वीकारली आहे.राज्यातील सुमारे ५६ लाख २४ हजार शेतकऱ्यांना या निर्णयाचा लाभ होण्याचा प्राथमिक अंदाज असल्याचे त्यांनी सांगितले. याशिवाय कृषी क्षेत्रात भांडवली गुंतवणूक वाढविणे, पायाभूत सुविधा निर्माण करणे आणि शाश्वत शेतीला चालना देण्यासाठी कृषी समृद्धी योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

या योजनेसाठी दरवर्षी ५ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्याचे नियोजन असून यंदा २ हजार कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात आले आहेत. उर्वरित ३ हजार कोटी रुपयांचा निधीही लवकर उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे भरणे यांनी स्पष्ट केले.हवामान बदलामुळे अतिवृष्टी, अवर्षण, गारपीट आणि वादळी वाऱ्यांमुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याची चिंता व्यक्त करत त्यांनी अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना आर्थिक बळ देणे आणि शेती अधिक सक्षम करणे ही सरकारची प्राथमिकता असल्याचे सांगितले. कृषी क्षेत्राच्या विकासासाठी राज्य सरकार कटिबद्ध असल्याचा पुनरुच्चार त्यांनी यावेळी केला.

## दारू पिऊन वाहन चालविणाऱ्यांवर पोलिसांचा करडा बडगा

### वाहनचालकांवर गुन्हे; वाहने जप्त, परवाना निलंबनाची कारवाई प्रस्तावित

**वर्धा/जनमाध्यम**

जिल्ह्यात वाढत्या रस्ते अपघातांना आळा घालण्यासाठी वाहतूक नियंत्रण शाखेने मंगळवारी विशेष ‘ड्रंक अँड ड्राइव्ह’ मोहीम राबवित दारूच्या नशेत वाहन चालविणाऱ्या दोन वाहनचालकांवर कठोर कारवाई केली. या कारवाईत एक मोपेड व एक दुचाकी जप्त करण्यात आली असून दोन्ही चालकांविरुद्ध मोटार वाहन कायद्यानुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.



पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल व अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाभर नाकाबंदी आणि विशेष तपासणी मोहीम सुरू आहे. त्याचाच भाग म्हणून वाहतूक नियंत्रण शाखेच्या पथकाने वर्धा शहरातील इतवारा चौक परिसरात वाहनांची तपासणी केली. यावेळी एमएच-३२-एवाय-८६९९ क्रमांकाच्या मोपेडचा चालक सावन रवि अंबोरे (१९, रा. राजूनगर, सावंगी) हा मद्यप्राशन करून वाहन चालविताना आढळून आला. ब्रेथ ॲनालायझर चाचणीत त्याच्या शरीरात अल्कोहोलचे प्रमाण आढळले.तसेच एमएच-३२-एएम-०५८४ क्रमांकाच्या स्प्लेंडर दुचाकीचा चालक सैयद आदिल अब्दुल आरिफ (३६, रा. जनता वॉर्ड, हिंगणघाट) याच्या शरीरात अल्कोहोलचे प्रमाण आढळून आले. दोन्ही वाहनचालकांविरुद्ध मोटार वाहन कायदा कलम १८५ अन्वये गुन्हे नोंदविण्यात आले. त्यांच्या वाहन परवान्याच्या निलंबनासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे प्रस्ताव पाठविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

वाहतूक शाखेने दिलेल्या माहितीनुसार, २०२६ मध्ये आतापर्यंत जिल्ह्यात ‘ड्रंक अँड ड्राइव्ह’च्या १६२ कारवाया करण्यात आल्या आहेत. तसेच ५६ परवाना निलंबन प्रस्ताव पाठविण्यात आले असून हेल्मेट न वापरणाऱ्या २,०२३ वाहनचालकांवर आणि अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या ९७ वाहनांवर कारवाई करण्यात आली आहे.मद्यप्राशन करून वाहन चालविणे स्वतःसह इतरांच्या जीवासाठीही धोकादायक ठरू शकते. त्यामुळे वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करावे, हेल्मेट व सीटबेल्टचा वापर करावा, असे आवाहन वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलीस निरीक्षक विलास पाटील यांनी नागरिकांना केले आहे.

## अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना नीट, सीईटी, जेईईचे मार्गदर्शन

**वर्धा/जनमाध्यम**

कारंजा तालुक्यातील सिंधीविहिरी येथील शासकीय आश्रमशाळा येथील मार्गदर्शन केंद्रात रिक्त असलेल्या जागा भरण्यासाठी १२ जुलै रोजी चाचणी परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे. या चाचणी परीक्षेत सहभागी होण्यासाठी ५ जुलै पर्यंत अर्ज सादर करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

सर्व शासकीय, अनुदानित आश्रमशाळेतील तसेच खाजगी मान्यताप्राप्त माध्यमिक शाळेतील अनुसूचित जमातीचे विद्यार्थी जे मार्च २०२६ च्या इयत्ता १० वीच्या परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेले आहेत व इयत्ता ११ वी विज्ञान शाखेत प्रवेशाकरीता पात्र आहेत व नीट व जेईई अभ्यासक्रमाची प्रवेशपुर्व परीक्षेची तयारी करण्यास इच्छुक आहेत, असे विद्यार्थी, पालक व संबंधित शाळेचे मुख्याध्यापक यांनी सदर चाचणी परीक्षेसाठी अर्ज एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातून प्राप्त करुन दि.५ जुलै पर्यंत सादर करावे, असे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाच्या सहाय्यक प्रकल्प अधिकारी यांनी कळविले आहे.

बंधाऱ्याचा निधी कुणाच्या घशात

## काम अर्धवट टाकून कंत्राटदार फरार, अधिकारी मात्र गप्प

### पहिल्याच पावसात वाहून जाण्याची भीती, ग्रामस्थांचा संताप

**आष्टी शहीद/जनमाध्यम**

आष्टी तालुक्यातील घनदाट जंगल परिसरात वसलेल्या बोरखेडी गावाशेजारील जांब नदीवरील बंधारा दुरुस्ती कामातील गंभीर अनियमितता उघडकीस आली आहे. लाखो रुपयांचा निधी खर्च करून सुरू करण्यात आलेले दुरुस्तीचे काम अर्धवट अवस्थेत सोडून कंत्राटदार गायब झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. निकृष्ट दर्जाचे काम आणि प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे पावसाळ्याच्या तोंडावर बंधाऱ्याचे अस्तित्व धोक्यात आले असून पहिल्याच जोरदार पावसात तो वाहून जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

बोरखेडी व परिसरातील गावांसाठी जांब नदीवरील हा बंधारा अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. शेतीसाठी तसेच भूजल पातळी वाढविण्यासाठी या बंधाऱ्याची मोठी भूमिका आहे. मात्र दुरुस्तीच्या नावाखाली केवळ वरवरची कामे करण्यात आल्याचे चित्र सध्या दिसत आहे. बंधाऱ्याच्या बांधकामातील साळखी बाहेर पडल्याने कामाच्या गुणवत्तेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. अनेक ठिकाणी सिमेंटचे थर उखडले असून मजबुतीचा अभाव स्पष्टपणे दिसून येत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

ग्रामस्थांनी या प्रकाराबाबत जिल्हा परिषद लघु सिंचन विभागाच्या अधिकाऱ्यांकडे वारंवार तक्रारी दाखल केल्या. मात्र आजपर्यंत कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. संबंधित अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी करण्याचेही टाळल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. त्यामुळे कंत्राटदार आणि अधिकाऱ्यांच्या संगनमतातून शासनाच्या निधीची उधळपट्टी होत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

सध्या पावसाळ्याची सुरुवात झाली असून नदीला मोठा पूर आल्यास अर्धवट व निकृष्ट दर्जाच्या कामामुळे बंधाऱ्याचे मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे. असे झाल्यास पाणी साठवण क्षमता कमी होईल आणि भविष्यात परिसरातील शेतकरी व नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागू शकतो.



या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषी कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकावे, संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी आणि बंधाऱ्याचे काम तातडीने दर्जेदार पद्धतीने पूर्ण करावे, अशी जोरदार मागणी बोरखेडी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. पावसाळ्यापूर्वी प्रशासनाने जागे होऊन ठोस निर्णय घ्यावा, अन्यथा मोठ्या नुकसानीला सामोरे जावे लागेल, असा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.

# विचोरी गावात रोहीचा धुमाकूळ; दोघे जखमी

## वनविभागाच्या दिरंगाईवर संताप



**मोर्शी :** मोर्शी तालुक्यातील विचोरी गावात सोमवारी सकाळी एका चौथाळलेल्या रोहीने (वन्यप्राणी) मध्यवस्तीतील घरात घुसून धुमाकूळ घातल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. या घटनेत दोन नागरिक जखमी झाले असून, वनविभागाच्या कथित दिरंगाईमुळे गावकऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सकाळच्या सुमारास एक रोही गावातील मध्यवस्तीतील एका घरात शिरला. घरात प्रवेश करताच त्याने एका नागरिकावर हल्ला केला. जखमी व्यक्तीला ग्रामस्थांनी तातडीने उपचारासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. मात्र, हल्ल्यानंतरही रोही बराच वेळ घरातच थांबून असल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. घटनेची माहिती मिळाल्यानंतर वनविभागाला कळविण्यात आले. मात्र, वन कर्मचाऱ्यांना घटनास्थळी पोहोचण्यास विलंब झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. दरम्यान, बराच वेळ घरात दबा धरून बसलेला रोही अचानक घराच्या भिंतीवरून उडी मारून बाहेर पडला. पळताना त्याने आणखी एका व्यक्तीवर हल्ला केल्याने दुसरा नागरिकही जखमी झाला. या घटनेनंतर गावकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली.

वनविभागाने तातडीने कारवाई करून संबंधित वन्यप्राण्याला पकडून सुरक्षित जंगलात सोडावे, अशी मागणी नागरिकांनी केली. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, रेस्क्यू पथक सुमारे दोन तासांनी घटनास्थळी पोहोचले. मात्र तोपर्यंत रोही जंगलाच्या दिशेने निघून गेला होता. रेस्क्यू पथकाला रिकाम्या हाताने परतावे लागल्याने ग्रामस्थांनी वनविभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. वन्यप्राण्यांच्या वाढत्या वावरामुळे नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनत असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

घटनेत जखमी झालेल्या दोन्ही नागरिकांना तातडीने आर्थिक मदत देण्यात यावी, तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी वनविभागाने प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांनी वन अधिकाऱ्यांसमोर केली. या घटनेमुळे विचोरी परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, वनविभागाने अधिक सतर्कता बाळगण्याची गरज असल्याचे नागरिकांकडून सांगितले जात आहे.


**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती**
**(e-mail : amravati.ee@mahapwd.gov.in)**
**निविदा सूचना क्र.५ सन २०२६-२०२७ (जा.क्र.६२२७/निली/दि.२३.०६.२०२६)**
**निविदा सूचना (ई-निविदा प्रणालीद्वारे)**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून नोंदणीकृत/अनोंदणीकृत कंत्राटदारांकडून खालील कामाकरीता **ब-१** (Percentage Rate) नमुन्यातील निविदा ई-प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहे. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित किंमत (रु.लक्ष) |
|---|---|---|
| १. | अमरावती जिल्हा व तालुक्यातील अमरावती कॅम्प शॉर्ट रस्ता रामा-२९९ कि.मी.४/५०० ते ६/९०० (भाग-रजनी मंगलम ते चांगापूर फाटा) चौपदरी रस्त्याचे कॉंक्रिटीकरणाने सुधारणा करणे, ता.जि.अमरावती | १२८६.९५ |
| २. | अमरावती जिल्हा व तालुका अमरावती मधील शेगांव रहाटगांव मासोद परसोडा प्रजिमा १०९ कि.मी.२/७०० ते ३/०० रस्त्याचे कॉंक्रिटीकरण करणे व प्रजिमा-१०९ ते रामा-३०२ जोड रस्त्याची सुधारणा करणे, ता.जि.अमरावती | ७१२.३७ |
| ३. | अमरावती जिल्हयातील धारणी कुसूमकोट परतवाडा चांदूर बाजार, मोर्शी सिंभोरा आष्टी रस्त्याची सुधारणा करणे रामा-२९२ कि.मी. ५२/८०० ते ५४/८०० ता.मोर्शी (मोर्शी ते सिंभोरा चौपदरीकरण करणे) | ५६७.२४ |

**ई-निविदा उपलब्ध कालावधी - निविदा वेळापत्रकाप्रमाणे**
**ई-निविदा उघडणे दिनांक - निविदा वेळापत्रकाप्रमाणे**
**खालील संकेतस्थळावर ई-निविदेची सर्व माहिती उपलब्ध आहे.**

१. http://mahapwd.com, 2) http://mahatenders.gov.in
२. सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वृत्तपत्रीय शुध्दीपत्रक न देता वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.
३. कंत्राटदारांनी निविदेची हार्ड कॉपी ७२ तासांचे आत कार्यालयीन वेळेत सादर करावी.
४. कंत्राटदारांनी ई-निविदा ऑनलाईनद्वारे भरतांना .E.M.D. ही ज्या नावाने जसे (वैयक्तिक संस्था/भागीदारी संस्था/कंपनी) निविदा भरली आहे त्याच्याच बॅंक खात्यातून सादर करणे आवश्यक आहे.
५. कोणतेही कारण न दर्शविता निविदा रद्द करण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखून ठेवलेला आहे.

**(प्रतिक गिरी)**
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**अमरावती**

## जाहीर नोटीस

**विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.२९०/२०२६ — ने.ता.२१.०७.२०२६

**अर्जदार :** १. पंकज आनंदराव उर्फ अण्णा पेठे, वय ४८ धंदा - नोकरी
२. अमोल आनंदराव उर्फ अण्णा पेठे, वय ३७ धंदा - नोकरी
३. संगीता कमल वानखडे, वय ३९ धंदा - घरकाम
अर्जदार नं.१ व २ रा.खराळा ता.चांदूरबाजार, जि.अमरावती
अर्जदार नं.३ रा.आष्टी, ता.भातकुली, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मृतक आनंदराव उर्फ अणा माणिकराव पेठे** यांचा मृत्यू दिनांक **२३.०३.२०२६** रोजी खराळा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला. तसेच **मृतक पुष्पा आनंदराव उर्फ अण्णा पेठे,** हिचा दि.**१२.०३.२०१४** रोजी आजाराने मुंबई येथील दवाखान्यात मरण पावली. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.२९०/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१८.०६.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

## जाहीर सुचना

सर्व सामान्य लोकांना सुचित करण्यात येते की मी, माझे पक्षकार नामे **श्री.प्रवीण दिनकरराव तिवाटणे आणि सौ.सरला प्रवीण तिवाटणे** यांचे वतीने सदर जाहीर नोटीस देतो ती येणेप्रमाणे --

**मिळकतीचे वर्णन** - मौजे - सातुर्णा, प्रगणे - बडनेरा, शेत सर्व्हे नं.९, ऑनलाईन ७/१२ नुसार ९/२, प्लॉट नं.१२-ए, ता.चांदूर रेल्वे, जिल्हा अमरावती.

सदर मिळकत माझे पक्षकार नामे **श्री.प्रवीण दिनकरराव तिवाटणे आणि सौ.सरला प्रवीण तिवाटणे** यांच्या मालकीची आहे. तद्नंतर त्यांनी PNB Housing Finance Limited येथे गृह कर्जासाठी **१५/०७/१९९८ रोजीचे दस्त क्र.**3086/1998 हे मूळ खरेदी खत गहाळ झालेले आहे. तसेच सदर खरेदीखत कोणाला सापडल्यास किंवा कुठे गहाण, पतसंस्था/राष्ट्रीयकृत/सहकारी अथवा खाजगी बॅंक, संस्था बोजा, या मालमत्तेविषयी शासकीय-निमशासकीय काही भानगड, कोणाचा मालकी किंवा वारस हक्क असल्यास, इतर कोणती हरकत असल्यास त्यांनी खाली दिलेल्या माझ्या मोबाईल क्र.वर ही जाहीरात प्रसिध्द झाल्याच्या **७** दिवसांच्या आत पुराव्यानिशी हरकत नोंदवावी. तद्नंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही, आणि सदर मालमत्ता ही PNB Housing Finance Limited येथे गहाण करण्यात येईल. करीता ही जाहीर सूचना.

ठिकाण - ता.जि.अमरावती
दिनांक २२.०६.२०२६

शिक्का

**आपला,**
**ॲडव्होकेट**
**रवींद्र रु.वाटाणे,**
**स्नेहगंधा कॉलनी, अमरावती**
**मो.नं.9823698745**

## जाहीर सुचना

सर्व लोकांना सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार यांनी **धर्मराज योगीराज परळीकर,** रा.मंगरुळ चव्हाळा, ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती यांचे मालकीचे व ताब्यातील खालील वर्णन केलेली शेत जमिनीची ईसारचिठ्ठी **नवेद जीक्कर टिक्की,** रा.नेर, ता.नेर, जि.यवतमाळ यांचे सोबत दि.१२.०३.२०२६ रोजी केली होती. त्या ईसारचिठ्ठीच्या हक्कावरुन **नवेद जीक्कर टिक्की** यांनी माझे पक्षकारासोबत दि.२६.०५.२०२६ रोजी खालील वर्णन केलेल्या शेतजमिनीची ईसारचिठ्ठी (सौदेपत्र) केले आहे. त्या मिळकतीवर **धर्मराज योगीराज परळीकर** यांचा कायदेशीर हक्क व ताबा आहे, त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे--

**मालमत्तेचे वर्णन -** नोंदणी पोट तुकडी नांदगांव खंडे., कचेरीचे कक्षेतील व जिल्हा परिषद अमरावतीचे हद्दीतील मौजे गावनेर तळेगांव, ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती येथील भूमापन क्र. व उपविभाग १२८, भोगवटदार वर्ग-१, क्षेत्रफळ १ हे.१९ आर अधिक पोटखराब ० हे.१० आर एकुण १ हे.२९ आर, आकार रु.१.६० पैसे. या मिळकतीची चतुःसिमा खालीलप्रमाणे--

पुर्वेस - अमरावती ते यवतमाळ रोड
पश्चिमेस - राजू देशमुख यांचे शेत
उत्तरेस - विटभट्टी
दक्षिणेस - गुलवाडे यांचे शेत

वरील वर्णन केलेल्या मिळकतीवर कोणाचे कोणतेही हितसंबंध, सहकारी/राष्ट्रीयकृत/वित्त संस्थेचे/सावकारी कर्ज, गहाण, बोझा, वारस हक्क, ताबा, कर्ज, इजमेंटरी हक्क, दान, खरेदी, लीज, अटॅचमेंट, रिझर्वेशन, एक्विझिशन, कूळ वहीवाट, चोळी-बांगडी, वगैरे कोणत्याही प्रकारचा बोझा अथवा अन्य कोणतेही अधिकार असल्यास किंवा सरकारी बॅंक, सहकारी संस्था, निमसरकारी अथवा खाजगी कर्ज असल्यास त्यांनी ही सूचना प्रेषित झाल्यापासून ०७ दिवसांचे आत खालील पत्त्यावर कागदपत्रे व पुराव्यासह लेखी हरकत घ्यावी, जर वरील मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार/हरकत आली नाही तर आमचे पक्षकार वर नमुद मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर कोणाचीही कसलीही हरकत, तक्रार, वाद ऐकला जाणार नाही, त्याचप्रमाणे नंतर कोणाचेही कोणतेही उजर चालणारनाही.

**अमरावती**
**दिनांक २३.०६.२०२६**

(ॲड.संदेश आर.अहेर)
अनंत भवन जवळ, राजापेठ,
अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.१११६/२०२६
**सुमन व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.३०.०७.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** १. सुमन मधुसूदन वाटाणे, वय ७१ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.मांगीलाल प्लॉट, कॅम्प, अमरावती
२. सौ.संगीता प्रदीप भाकरे, वय ५२ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.कृष्णकुंज विहार, चांदूर बाजार, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
३. प्रणाली धिरज गाडगे, वय ४० वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.गौरी सदर रचना कॉलनी, गौरक्षण रोड, अकोला, ता.जि.अकोला
४. सौ.प्राची परेश धर्माळे, वय ३७ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.बेसखेळा, पो.बोराळा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत मधुसूदन हरिभाऊ वाटाणे** यांचे दिनांक **०८.०२.२०२६** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार सुमन व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सुमन व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१८.०६.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.११९४/२०२६
**विमल व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.०५.०८.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Vimal Sudarshan Rane, Age 79 Yrs. Occu.: Housewife
R/o Devari Dewara, Amravati.
2. Sarla Bhanudas Mete, Age 81 Yrs. Occu.: Household
R/o Mu.Pala, Tq.Nandgaon Khandeshwar, Dist.Amravati.
3. Sunita Baburao Thakre, Age 58 Yrs. Occu.: Household
R/o Ward No.1, Salora Khurd, Amravati.
4. Diliprao Basavantrao Aware, Age 66 Yrs. Occu.: Labour
R/o Near Kalpana Provision, Mu.Po.Pusada, Amravati

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **बसवंत यशवंतराव आवारे आणि पंचफुला बसवंतराव आवारे** हे अनुकमे दिनांक 13.01.2013 व 22.12.2022 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **विमल व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **विमल व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१२०.०६.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

## चौकशीची जाहीर नोटीस

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 278/2026 कलम २२
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **श्री.जनकल्याण सेवा संस्था, अमरावती, ता.जि.अमरावती**
**एफ-१२७७३/अमरावती**
बाबत अर्जदार - **गोविंद जनार्दन जोग, रा.हेडगेवार हॉस्पीटल, अमरावती**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, धर्मादाय उपआयुक्त, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९/२२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत (वर्णन) - निरंक**
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन)** - अमरावती शहर येथील नझुल शिट नं.६५, प्लॉट नं.५/१, एकुण क्षेत्रफळ २७,५५२.९० चौ.मीटर पैकी ६६९ चौ.मीटर जागा, ह्याचा प्लॉट नं.५/१-ब, त्यावर असलेल्या बांधकामासहीत, ज्याची चतुःसिमा--

पुर्वेस - आदित्य अपार्टमेंट व त्यामागे रेल्वे लाईन
पश्चिमेस - अमरावती-बडनेरा रस्ता
उत्तरेस - प्लॉट नं.५/१-अ
दक्षिणेस - श्री.पाटील यांचे घर

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **२४.०४.२०२६** रोजी दिली.

शिक्का

**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

## फ्लॅट विकणे आहे

टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल आणि एक रूम असा फ्लॅट आहे.
**संपर्क:**
**९४२२८५७१६९,**
**९४२२९१८५६९**

**नगर पंचायत कार्यालय, महागांव, जि.यवतमाळ**
**फोन कार्या.०७२३६-२२२२८८**
**ई-मेल - npmahagaon@gmail.com**
**जा.क्र. नपम/प्रवि/आवि/२१७/२०२६** — **दिनांक २४.०६.२०२६**

## ई-निविदा सूचना (दुसरी वेळ)

नगर पंचायत महागांवच्या आरोग्य विभागा अंतर्गत नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम, २०१६ अंतर्गत महागांव शहरातील घरोघरी जाऊन दैनंदिन विलगीकृत कचरा संकलन करणे, संकलित केलेला कचरा घनकचरा व्यवस्थापन केंद्र पर्यंत वाहतूक करणे तसेच शहरात दैनंदिन आवश्यकतेनुसार नाले साफसफाई करणे इत्यादी कामे एक वर्षासाठी ठेका पध्दतीने करणे करीता (Tender ID - 2026_DMA_1301515_2) ई-निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा बाबतच्या सविस्तर अटी व शर्ती महाराष्ट्र शासनाच्या ई-निविदाचे अधिकृत संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in वर दिनांक २४.०६.२०२६ पासून पहावयास उपलब्ध आहे.

**(सौ.रंजना दि.आडे)**
**अध्यक्षा,**
**नगर पंचायत महागांव**

**(श्री.प्रमोद रा.भरवाडे)**
**उपाध्यक्ष,**
**नगर पंचायत महागांव**

**(सौ.सुनिता शि.डाखोरे)**
**सा.आरोग्य सभापती**
**नगर पंचायत महागांव**

**(डॉ.अजय कुरवाडे)**
**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत महागांव**

**जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती**
उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) ल.सिं.कामे, नियोजन भवन
**जिल्हाधिकारी कार्यालय, कॅम्प अमरावती-४४४६०२**
**दूरध्वनी क्रमांक ०७२१-२६७१६०२**
**ई-मेल - amravatilao2014@gmail.com वेबसाईट : amravati.nic.in**

**क्र. मं.अ./उपजिभूसं/लसिकामे/कावि-१७८/२०२६** — **दिनांक १५.०४.२०२६**

## खाजगी क्षेत्रातील जमीन वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घेणेबाबत जाहीर नोटीस

**वाचा :** १. शासन निर्णय महसूल व वनविभाग क्र.संकिर्ण ०३/२०१५/प्र.क्र.३४/अ-२/दि.१२.०५.२०१५
२. शासन निर्णय महसूल व वनविभाग क्र.संकिर्ण ०३/२०१५/प्र.क्र.३४/अ-२/दि.३०.०९.२०१५
३. म.शा.महसूल व वनविभाग यांचे परिपत्रक क्र.एलक्यूएन/०१/२०१७/प्र.क्र.१२/भाग/अ-२/मंत्रालय, मुंबई-४०००३२ दिनांक २५.०१.२०१७

**भूसंपादन प्रकरण क्र.०३/४७/२०२५-२६**
**मौजा - पेठ अमरावती, ता.जि.अमरावती**

ज्या अर्थी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती यांनी अमरावती पश्चिम वळण रस्ता रामा-२९९ रस्त्यावर नरखेड रेल्वे लाईन सा. क्र.२९/००० मध्ये उड्डाणपुलाचे बांधकाम प्रयोजनाकरीता शासन निर्णय महसूल व वनविभाग क्र.०३/२०१५/प्र.क्र.३४/अ-२/दि.१२.०५.२०१५ व दिनांक ३०.०९.२०१५ मधील तरतुदीस अनुसरुन खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने कार्यकारी अभियंता, बेंबळा प्रकल्प विभाग, यवतमाळ यांचे नावे घेण्याबाबत त्यांचे कार्यालयीन पत्र क्र. जा.क्र.१०३८७ दि.२८.१०.२०२५ नुसार सरळ खरेदी प्रस्ताव ०३/४७/२०२५-२०२६ मौजा पेठ, अमरावती जि.अमरावती एकुण क्षेत्रफळ ०.११ हे.आर चा सरळ खरेदीचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी अमरावती यांचेकडे सादर केला आहे.

आणि ज्याअर्थी, जिल्हाधिकारी अमरावती यांचे पत्र क्र.अ.का./प्र.अ./भूसंपादन/कावि-५४८/२०२५ दिनांक १४.११.२०२५ अन्वये उक्त प्रस्तावासंबंधी शासन निर्णय दिनांक १२/०५/२०१५ व दिनांक ३०/०५/२०१५ आणि त्या अनुषंगाने शासन निर्णय तसेच शासन परिपत्रक महसूल व वनविभाग क्र.एलक्यूएन०१/२०१७/प्र.क्र.१२/अ-२ दिनांक २५/०१/२०१७ प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

**त्याअर्थी आता**

१). उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) ल.सिं.कामे, अमरावती तथा सदस्य सचिव जिल्हास्तरीय समिती अमरावती याद्वारे

**अनुसूची (एक)**

खाजगी क्षेत्रातील जमीनी खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने कार्यकारी अभियंता, अमरावती प्रकल्प विभाग क्र.१, अमरावती यांचे नावे घेण्याबाबत जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहे.

आणि

**अनुसूची (दोन)**

अमरावती पश्चिम वळण रस्ता रामा-२९९ रस्त्यावर नरखेड रेल्वे लाईन सा.क्र.२९/००० मध्ये उड्डाणपुलाचे बांधकाम प्रयोजनाकरीता जमिनी खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने संपादित करतांना जिल्हास्तरीय समिती मार्फत भूमी संपादन, पुनर्वसन आणि पुनर्स्थापना करतांना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ मधील कलम २६ ते ३० च्या शेड्यूल १ च्या तरतुदीनुसार संबंधित जमिनीसाठी परिगणित होणाऱ्या एकुण मोबदल्याच्या रकमेवर २५ टक्के रक्कम वाढीव देऊन मोबदला निश्चित करण्यात येईल.

**अनुसूची (तीन)**

संबंधित भूधारकांकडून शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे खाजगी जमीन खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती यांचे नावे खरेदी करुन देण्यास स्वेच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेला मोबदला संपूर्णतः अंतिमरित्या स्विकारण्यास तयार असल्याबाबतचे संमतीपत्र (विकल्प) मागवित आहे.

२). संबंधित भूधारकांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यानंतर विहीत नमुन्यातील संमतीपत्र (विकल्प) कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती यांचेकडे दाखल करावीत.

३). संमतीपत्राचा (विकल्प) विहीत नमुना कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती यांचे कार्यालयात उपलब्ध आहे.

४). सदर प्रकल्पासाठी निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्राच्या पुनर्वसन आराखड्याची प्रत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती यांचे कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत भूधारकांना किंवा हितसंबंधीत व्यक्तींना तसेच जनतेस निरिक्षणासाठी खुली ठेवण्यात आली आहे.

**अनुसूची (चार)**

सरळ खरेदी प्रकरण क्रमांक ०३/४७/२०२५-२०२६ मौजा पेठ अमरावती, ता.जि. अमरावती पश्चिम वळण रस्ता रामा-२९९ रस्त्यावर नरखेड रेल्वे लाईन सा.क.२९/००० मध्ये उड्डाणपुलाचे बांधकाम समाविष्ट (खरेदी करावयाच्या) खाजगी जमिनीचा तपशील

| अ. क्र. | भूधारकांचे नाव | मौजा | गट/ सर्व्हे क्र. | भो. व. | नमुना ७/१२ प्रमाणे एकूण क्षेत्र हे.आर. | संपादित करावयाचे क्षेत्र हे.आर |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | सचिव केशवराव हिवसे दिलीप उर्फ देवेंद्र केशवराव हिवसे | पेठ अमरा-वती | १५७/१ पैकी | १ | २.०० | ०.०३ |
| २. | शेख उमर शेख बाबा | पेठ अमरा-वती | १५८/१ पैकी | १ | ०.४० | ०.०८ |
| | | **एकुण** | | | **२.४०** | **०.११** |

(वि.मा.का./अम/जाही/२८१/२०२६-२०२७)

**उपजिल्हाधिकारी (भूसंपादन)**
**ल.सिं.कामे, अमरावती तथा**
**सदस्य सचिव**


जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २८७**
**आर.एन.आय.रजी.नं.** 49763/89 **पोस्टल लायसन क्र.** ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# १०० खाटांच्या माता -बाल संगोपन केंद्रासाठी ३३ कोटींचा निधी देण्यात यावा - आ. सुलभा खोडके

**अमरावती/का.प्र.**

अमरावती जिल्ह्यासह ग्रामीण -दुर्गम भाग तसेच सीमाभागातील माता, गरोदर महिला व नवजात बालकांच्या आरोग्याच्या दृष्टीने अमरावती येथे मंजूर असलेल्या १०० खाटांच्या माता -बाल संगोपन केंद्रासाठी ३३ कोटींचा निधी तातडीने उपलब्ध करून देण्यात यावा. अशी मागणी अमरावतीच्या आ.सुलभा खोडके यांनी विधानसभेत औचित्याच्या मुद्द्याद्वारे केली आहे.

आरोग्याच्या दृष्टीने सार्वजनिक महत्वाच्या व निकडीच्या विषयावर औचित्याच्या मुद्द्याद्वारे सभागृहाचे लक्ष वेधतांना आ.सुलभा खोडके यांनी सांगितले कि, राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत अमरावती शहरात १०० खाटांचे माता-बाल संगोपन केंद्र (एम.सी. एच. विंग ) उभारण्यास शासनाने गेल्या १२ ऑगस्ट २०२४ रोजी ३३ कोटींच्या निधीसह प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. या प्रशासकिय मान्यतेला प्रदीर्घ कालावधी उलटून देखीलही या मंजूर केंद्राला अजूनही आवश्यक



कामांकरिता निधी उपलब्ध होवू न शकल्यामुळे अत्यंत महत्वाच्या या आरोग्य केंद्राचे काम केवळ निधी अभावी रखडले आहे.

अमरावती हे विभागाच्या पाच जिल्ह्याचे मुख्यालय असल्याने या ठिकाणी दुरून दुरून रुग्णांचा ओघ दिसून येतो. मात्र १०० खाटांच्या माता -बाल संगोपन केंद्राचे काम रखडल्याने अमरावती जिल्हा व परिसरातील गरजू माता, गरोदर महिला आणि नवजात बालकांना आरोग्याच्या अत्यंत आवश्यक तातडीच्या सेवा- सुविधापासून वंचित राहावं लागत आहे. त्यामुळे स्थानिक पातळीवर हि निकड लक्षात घेता विना विलंब आरोग्य केंद्राचे बांधकाम तातडीने सुरु होणे आवश्यक आहे. याबाबत सुद्धा आमदार महोदयांनी सभागृहाला अवगत केले. तसेच शासनाने व सार्वजनिक आरोग्य विभागाने या संवेदनशील विषयाची तातडीने दखल घेऊन अमरावती येथे मंजूर १०० खाटांच्या माता-बाल संगोपन केंद्राचे बांधकाम विना-विलंब सुरु करण्यासाठी ३३ कोटींचा निधी उपलब्ध करून देण्याची मागणी आ. सुलभा खोडके यांनी औचित्याच्या मुद्याद्वारे विधानसभेतून केली आहे.

## जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयात आंतरराष्ट्रीय ऑलम्पिक दिन उत्साहात

**अमरावती/का.प्र.**



क्रीडा व युवक सेवा संचालनालय, म.रा. पुणे, महाराष्ट्र ऑलम्पिक असोसिएशन, जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अमरावती, एकविध खेळ संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंरराष्ट्रीय ऑलम्पिक दिन जिल्हा क्रीडा संकुल, तपोवन चौक, अमरावती येथे साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे गणेश जाधव, जिल्हा क्रीडा अधिकारी, अमरावती अध्यक्ष म्हणुन अनिल इंगळे, तालुका क्रीडा अधिकारी, मोर्शी, ममता कोळमकर, क्रीडा कार्यकारी अधिकारी (प्रशिक्षण), तसेच संतोष विघ्ने, क्रीडा अधिकारी, उपस्थित होते.सदर कार्यक्रमाला लाभलेले प्रमुख पाहुणे गणेश जाधव,यांनी प्रास्ताविकामध्ये खेळाडूंना क्रीडा व एकता च्या माध्यमातुन जगभरात एकता मैत्री व शांतता वाढविणे या उद्देशाने हा दिवस क्रीडा शक्तीला समर्पित केला जातो, इत्यादी बाबत सखोल ज्ञान व मार्गदर्शन केले.

प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते आर्चरी, तायक्वाँदो, खो-खो, स्क्वॅश, टेबल टेनिस इत्यादी खेळांच्या गुणवंत खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन स्वप्नील चांदेकर, रा.क्री.मा. यांनी केले तसेच आभार शेख सलीम शेख हुसेन, तालुका क्रीडा अधिकारी, चांदुर रेल्वे यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.

सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गणेश जाधव, जिल्हा क्रीडा अधिकारी, अमरावती अनिल इंगळे, तालुका क्रीडा अधिकारी, मोर्शी, यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा क्रीडा कार्यालयातील आर.बी. वडते, ता.क्री.अ. धारणी, शेख सलीम शेख हुसेन, ता.क्री.अ.चा. रेल्वे, ममता कोळमकर, क्रीडा कार्यकारी अधिकारी (प्रशिक्षण), संतोष विघ्ने, क्री.अ., त्रिवेणी चौधरी, क्री.अ., वैशाली इंगळे, क्री.अ., धनंजय भारसाकळे, वरिष्ठ लिपिक, प्रणिती भिमटे, शिपाई, तसेच मानधनावरील कर्मचारी शेख अकील, शुभम मोहतुरे, अमोल लांडे, राजपाल इंगळे, सागर बोरकर, वैभव पातुर्डे, आदींनी परिश्रम घेतले.



**पहिल्या पावसानंतर पेरणीची तयारी; बंद पडलेले पेरणी यंत्र दुरुस्तीसाठी वर्कशॉपमध्ये शेतकऱ्यांची धावपळ...'आसेगाव परिसरात पहिल्या पावसानंतर पेरणीची लगबग सुरू झाली असून, बंद पडलेले पेरणी यंत्र दुरुस्तीसाठी वर्कशॉपमध्ये आणून त्याची तयारी करताना शेतकरी.' ( किशोर मोकलकर, आसेगाव पूर्णा )**

## अमोल मोहतुरे यांचे निधन



**तळेगाव ठाकूर** - येथील रहिवासी तथा बळीरामजी मोहतुरे यांचे सुपुत्र अमोल मोहतुरे (वय ४७ वर्षे) यांचे बुधवार २४ जून रोजी सकाळी ८ वाजता, तीव्र हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले.त्यांच्या पश्चात आई-वडील, भाऊ, मुले व अन्य आप्तस्वकीय असा मोठा परिवार आहे.त्यांच्यावर येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

## प्रकाशकांनी ३० जून पर्यंत वार्षिक विवरणपत्र दाखल करावे

### विवरणपत्र दखल न केल्यास दहा हजारांचा दंड

**अमरावती/का.प्र.**

प्रेस आणि नियतकालिक नोंदणी अधिनियम, २०२३ अंतर्गत नोंदणीकृत प्रत्येक नियतकालिकाने आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षित वार्षिक विवरणपत्र प्रेस सेवा पोर्टल वर ऑनलाइन सादर करणे बंधनकारक आहे. आर्थिक वर्ष २०२४-२५ चे विवरणपत्र सादर न करणाऱ्या प्रकाशकांना ३० जून २०२६ पर्यंतची अखेरची संधी देण्यात आली आहे. यानंतर कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नसल्याचे भारत सरकारच्या प्रेस रजिस्टर जनरल, नवी दिल्ली यांनी सूचनांद्वारे कळविले आहे.

प्रेस आणि नियतकालिक नोंदणी अधिनियम, २०२३ मधील कलम १४(१) (ब) व १४(३) नुसार, वार्षिक विवरणपत्र निर्धारित मुदतीत न भरल्यास संबंधित प्रकाशकावर दंड आकारण्याची तरतूद आहे. पहिल्या चुकीसाठी किमान दहा हजार रुपयांचा दंड आकारला जाईल. त्यानंतरच्या प्रत्येक चुकीसाठी दंडाची रक्कम मागील दंडाच्या दुप्पट असेल. मात्र, एकूण दंडाची कमाल मर्यादा दोन लाख रुपये निश्चित करण्यात आली असल्याचे प्रेस रजिस्टार जनरल, नवी दिल्ली यांनी दिलेल्या सूचनांमध्ये नमूद केले आहे.

आर्थिक वर्ष २०२४-२५ चे वार्षिक विवरणपत्र अद्याप सादर न केलेल्या प्रकाशकांनी ३० जून २०२६ पर्यंत ऑनलाइन दाखल करावे.

या मुदतीनंतर विवरणपत्र सादर न केल्यास अधिनियमातील तरतुदीनुसार दहा हजार रुपयांचा दंड आकारण्यात येईल,असेही प्रेस रजिस्टर जनरल, नवी दिल्ली यांनी सूचनांमध्ये नमूद केले आहे.

## अनुसुचित जाती/ जमाती वर्गवारीतील विद्यार्थ्यांना विविध अभ्यासक्रमाच्या प्रवेश शुल्कामध्ये ५० टक्के सवलत

**अमरावती/का.प्र.**

इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ, नवी दिल्लीच्या अमरावती येथील अभ्यास केंद्राअंतर्गत जुलै, २०२६ पासून सुरू होणा-या सत्राकरिता एम.ए. (इंग्रजी, हिंदी, राज्यशास्त्र, इतिहास, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, लोकप्रशासन, ग्रामीण विकास, दूरशिक्षण, तत्वज्ञान), एम.कॉम. एम.बी.ए., (फायनान्स, ह्युमन रिसोर्स, मार्केटिंग, ऑपरेशन, सर्वीस मॅनेजमेंट प्रवेश परीक्षेशिवाय), बी.ए.बी.कॉम.सामान्य, बी.ए.टुरिझम, बी.ए.ऑनर्स (अर्थशास्त्र, इतिहास, राज्यशास्त्र, मानसशास्त्र, लोकप्रशासन, समाजशास्त्र, इंग्रजी, हिंदी), बी.कॉम. (लेखा व वित्त), पदव्युत्तर पदविका (ग्रामीण विकास, इंटरनॅशनल बिझिनेस ऑपरेशन, ॲग्री बिझिनेस, ह्युमन रिसोर्स मॅनेजमेंट, फायनान्सीयल मॅनेजमेंट, ऑपरेशन्स मॅनेजमेंट आणि मार्केटिंग मॅनेजमेंट), डिप्लोमा (पर्यटन, एचआयव्ही ॲंड फॅमिली एज्युकेशन), सर्टिफिकेट (आपत्ती व्यवस्थापन, फुड ॲन्ड न्युट्रीशन, ह्युमन राईट्स, गायडन्स, न्युट्रीशन ॲन्ड चाईल्ड केअर, कंझुमर प्रोटेक्शन, फक्शनल इंग्रजी, ग्रामीण विकास, टिचींग ऑफ इंग्लीश, टुरिझम, एचआयव्ही ॲंड फॅमिली एज्युकेशन) इत्यादी अभ्यासक्रमांकरिता प्रवेश प्रक्रिया सुरू झालेली आहे.

नोकरी, व्यवसाय, घरकाम इत्यादीमुळे नियमित शिक्षणासाठी इग्नोने मुक्त व दूरस्थ शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. विद्यार्थी पात्रतेनुसार प्रमाणपत्र, पदविका, पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम निवडू शकतात. युजीसीच्या मार्गदर्शक तत्तवानुसार विद्यार्थी एकाच वेळी दोन अभ्यासक्रम (उदा.एक पदविका व एक पदवी) घेऊ शकतात. इग्नूचे स्वयं-अध्ययन साहित्य, अध्यायन पद्धती, तांत्रिक सुविधा, घरपोच साहित्य वितरण आणि विद्यार्थी सहाय्य सेवा यामुळे हे शिक्षण अधिक सुलभ होते. परीक्षा भारतातील कोणत्याही इग्नू परीक्षा केंद्रावर देता येते.

अनुसुचित जाती/ जमाती वर्गवारीतील ज्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रू.२.५ लाखांपेक्षा कमी आहे, अशा विद्यार्थ्यांना बी.ए.,बी. कॉम.बी.एस्सी. अभ्यासक्रमाच्या प्रवेश शुल्कामध्ये ५० टक्के सवलत देण्यात येत आहे. इग्नोच्या www.ignou.ac.in वेबसाईटवरून तसेच https://ignouadmi ssion. samar th.edu.in/ ह्या लिंकवरून अर्ज सादर करण्याची अंतिम तिथी १५ जुलै, २०२६ असून प्रवेश शुल्क इंटरनेट बँकींग/डेबीट/क्रेडीट/एटीएम कार्डद्वारे भरता येईल. सविस्तर माहितीपुस्तिका व ऑनलाईन अर्ज कसा सादर करावा याबाबतची माहिती इग्नोचे उपरोक्त वेबसाईटवर उपलब्ध आहे.

अधिक माहितीकरिता इच्छुकांनी इग्नोचे अभ्यासकेंद्र, मुलींचे वसतीगृहाजवळ, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ परिसर येथे सकाळी ८.३० ते १०.३० या वेळात संपर्क साधावा असे डॉ.वर्षा नाठार, समन्वयक, इग्नो अभ्यासकेंद्र, अमरावती यांनी कळविले आहे.

# खरिप हंगाम पेरणी करणाऱ्या शेतकऱ्यांचे पावसाअभावी बेहाल

**कुऱ्हा/वार्ताहर**

यावर्षी खरिप हंगाम सुरू होऊन १५ ते २० दिवस होऊन परंतू तिवसा तालुक्यातील काही भागात थोडा फार पाऊस झाला. असता शेतकऱ्यांनी पेरणी केली. पाऊस येईल अशा आशेने बऱ्याच शेतकऱ्यांनी हजारो रुपयाचे बि बियांने पेरणी करून पाऊस मात्र न आल्यामुळे लखलखत्या उन्हामुळे काही शेतकऱ्यांच्या शेतामधील कपाशी (पऱ्हाटी) कोंब येऊन उन्हामुळे भाजून मरत आहे. परंतु गेल्या १५ दिवसापासून पाऊसच आला नाही. जो दिवस निघतो तो भयंकर उन्ह घेवून निघतो. त्यामुळे यावर्षी खरीप हंगाम पेरणी करणाऱ्या शेतकऱ्यांना पावसाअभावी दुष्काळाच्या छायेत पडले आहे.

तेव्हा खरीप हंगामातील पहिले नक्षत्र होऊन गेले.

योग्य पाऊस आला नसल्यामुळे दुष्काळाचे छायेत आज सापडला पुढील दिवस भरपूर बाकी आहे. शेतकऱ्यांची परिस्थती अतिशय खराब आहे की पेरणी करीता बि बियाणे, खते.

व इतर मशागत करिता पैसा नाही त्यामुळे बरीच शेती बिगर

**पेरणी करून हंगाम दुष्काळाच्या छायेत**



पेरणी-ची राहील काय असा अंदाज दिसत आहे

कारण बि बियाणे, खते इतके महागाईच्या खाईत आहे. की साधारण शेतकऱ्यांना घेणे अवघड झाले आहे. तेव्हा शासनाने या भागातील पेरणी केलेल्या शेतकऱ्यांचा विचार करावा अशी मागणी तिवसा तालुक्यातील कुऱ्हा, मारडा, बोर्डा, चेनुष्ठा, भिवापूर, घोटा, हसनापूर,आलवाडा, धारवाडा, दुर्गवाडा, कोंडण्या पूर, मिर्चापूर, वंडली, छिंदवाडी, शेंदूरजना माहुरा, कव्हाड गव्हाण, विरगव्हाण, मार्डी आदी गावातील शेतकऱ्यांनी केली आहे.

# संक्षिप्त

## रूख्मीणी मातेची पायदळ दिंडी सोहळा



**कुऱ्हा** - यावर्षी श्री तिर्थक्षेत्र कौंडण्यपूर विदर्भाची पंढरी असणाऱ्या आई रूख्मीणी मातेची पायदळ दिंडी सोहळा आगमन होऊन पहिला विसावा तिवसा ते चनुष्ठा रोडवर भैय्या इंगळे यांचे येथे केले.नंतर कुऱ्हा ते अमरावती रोडवरील चौकात जोरदार गावकऱ्यांनी मोठ्या उत्साहात आणि कौंडण्यपूर अंबिकापूरचे स्वामी राजराजेश्वरी महाराज (माऊली सरकार) यांच्या प्रमुख उपस्थितीत अतिशय आई रूख्मीणी मातेचा गजरात शेकडो भाविक वारकरी भक्ताच्या उपस्थित पार पडला. या कार्यक्रमाला विठ्ठल रुख्मीणी संस्थान अध्यक्ष ना. बा अमाळकर, उपाध्यक्ष वसंत डाहे व विश्वस्त यांची उपस्थिती होती.या वेळी पालखी चालक ह.भ.प. पंकज महाराज महल्ले, विश्वस्त सुरेश चव्हाण, हिम्मतराव टाकोणे तसेच ह.भ.प. संजय महाराज ठाकरे, विणेकरी विठोबाजी सर्व वारकरी पुरुष, महिला आणि वारकरी करणारे १०० ते १५० वारकरी यांच्या उपस्थितीत विसावा होऊन पुढील विरगव्हाण कडे प्रस्थान झाली.

## आरोग्यम नेचर क्युअर सेंटरचा योगदिन उत्साहात



**तिवसा** - आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त तिवसा येथील समर्थ लॉन येथे आरोग्यम नेचर क्युअर सेंटर अँड योगा च्या वतीने योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली.समर्थ लॉन चांदुर रेल्वे रोड पंचवटी चौक तिवसा येथे योग, प्राणायाम व ध्यान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. आधुनिक तणावग्रस्त जीवनशैलीत निरोगी राहण्यासाठी योगाचे महत्त्व लक्षात घेऊन दरवर्षी डॉ.अमृतकर दाम्पत्य हा उपक्रम राबवितात. यावेळी कार्यक्रमाला तिवसा मतदार संघाचे राजेशजी वानखडे, आरती वानखडे, छाया दंडाळे, शंतनू देशमुख, गुणवंत देवतारे, तेजस्विनी वानखडे, डॉ शिल्पा पाटील, जन आरोग्य व शिक्षण विकास संस्थेचे अध्यक्ष डॉ. संदीप अमृतकर व योग प्रशिक्षिका डॉ मनीषा संदीप अमृतकर, पत्रकार हेमंत निखाडे, संदीप दहाट, डॉ गणोरकर, डॉ भूषण पाटील, डॉ पालीवाल, डॉ तेजस जोशी आदी मान्यवर उपस्थित होते.

## गर्भसंस्कार व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन



**अमरावती** - स्व. सूर्यकांतादेवी रामचंद्रजी पोटे पाटील यांच्या पुण्यस्मरणानिमित्त पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ मेडिकल सायन्सेस आयुर्वेद, अमरावती यांच्या वतीने गर्भसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या शिबिरामध्ये गर्भवती महिलांना आयुर्वेद शास्त्रानुसार गर्भसंस्काराचे महत्त्व, आहार-विहार, मानसिक आरोग्य, मंत्रोच्चार व गर्भाच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त मार्गदर्शन तज्ञ वैद्यांनी दिले. शिबिराला गर्भवती महिलांचा मोठा प्रतिसाद लाभला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ.भार्गव टप्पे, अधीक्षक डॉ.हर्षवर्धन नवले उपस्थित होते, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. दिपाली नवले उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपअधीक्षक डॉ.हेमलता माहोरे यांनी केले. शिबिर यशस्वी करण्यासाठी कॉलेजच्या सर्व प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.स्व. सूर्यकांता देवींना भावपूर्ण अभिवादन अर्पण करून शिबिराची सांगता करण्यात आली.

## पाइपलाइन कामामुळे नागरिक त्रस्त



**टाकरखेडा संभू** - तळवेल ते बऱ्हाणपूर मार्गावर सुरू असलेल्या पाइपलाइनच्या कामामुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात माती टाकण्यात आली आहे. मात्र कामाची गती अत्यंत मंद असल्याने नागरिकांना चिखलातून प्रवास करावा लागत आहे.पावसाळ्याच्या तोंडावर सुरू करण्यात आलेल्या या कामामुळे वाहनचालक, शेतकरी व विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य निर्माण झाल्याने दुचाकीस्वारांना विशेषतः त्रास सहन करावा लागत आहे.

स्थानिक नागरिकांनी संबंधित ठेकेदार व प्रशासनाने काम तातडीने पूर्ण करून रस्ता पूर्ववत करावा, अशी मागणी केली आहे. अन्यथा एखादी गंभीर दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## शासनाचा पगार, जनतेला हेलपाटे

**अंजनगाव बारी** - परिसरातील विविध शासकीय विभागांमध्ये कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना मुख्यालयी राहण्याची जणू एलर्जीच झाल्याचे चित्र सध्या पाहावयास मिळत आहे. आरोग्य विभाग, शिक्षण विभाग, केंद्रप्रमुख तसेच इतर अनेक शासकीय कार्यालयांतील अधिकारी व कर्मचारी मुख्यालयी राहत नसल्याने सर्वसामान्य नागरिकांची कामे रखडत असून जनतेला वारंवार हेलपाटे मारावे लागत आहेत.

शासनाने नागरिकांना तातडीच्या व दर्जेदार सेवा मिळाव्यात या उद्देशाने संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना मुख्यालयी राहणे बंधनकारक केले असतानाही अनेक जण या नियमाला हरताळ फासत असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. परिणामी, आरोग्य सेवा, शैक्षणिक कामकाज, विविध दाखले, प्रमाणपत्रे आणि प्रशासकीय कामांमध्ये मोठा अडथळा निर्माण होत आहे.या संपूर्ण प्रकाराची उच्चस्तरीय चौकशी करून मुख्यालयी न राहणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपस्थिती, वास्तव आणि घरभाडे भत्त्याची पडताळणी करण्यात यावी, तसेच दोषी आढळणाऱ्यांवर बडतर्फीसह कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी तीव्र मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.

# खनिज लुटीचा स्फोट! गाजीपूरच्या पाच खदानींवर बंदीची कु-हाड

**- विना परवानगी ब्लास्टिंग, सहा मीटरची मर्यादा ओलांडून उत्खनन**

**- खनिकर्म विभागाचा दणका**

**एसडीओ-तहसीलदारांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह;**

**- खदानी कायमस्वरूपी बंद करण्याचे प्रस्ताव मागविले**


**ॲड. समीर ठाकूर**

**अकोला :** अकोट तालुक्यातील सातपुड्याच्या पायथ्याशी वसलेल्या गाजीपूर येथील गौण खनिज उत्खनन प्रकरणाने अखेर गंभीर वळण घेतले असून जिल्हा खनिकर्म विभागाच्या पाहणीनंतर पाच खदानींमधील उत्खनन तात्काळ बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तात्पुरत्या परवान्यांच्या आड नियमांना हरताळ फासत सहा मीटरच्या मर्यादेपेक्षा अधिक खोलीपर्यंत उत्खनन केल्याचा ठपका ठेवण्यात आला असून विना परवानगी ब्लास्टिंग, सीमांकनाचा अभाव, तारेचे कुंपण नसणे, वृक्षारोपण न करणे अशा अनेक गंभीर अनियमितता समोर आल्याने प्रशासनाच्या स्थानिक यंत्रणेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.




या कारवाईनंतर अकोट महसूल प्रशासनाच्या कार्यप्रणालीची जोरदार चर्चा सुरू झाली असून अनेक महिन्यांपासून सुरू असलेल्या कथित अनियमित उत्खननाकडे स्थानिक अधिकाऱ्यांनी नेमके का दुर्लक्ष केले, असा प्रश्न आता नागरिक उपस्थित करीत आहेत.

गेल्या काही महिन्यांपासून गाजीपूर परिसरात तात्पुरत्या परवान्यांच्या आधारे मोठ्या प्रमाणात गौण खनिज उत्खनन सुरू असल्याच्या तक्रारी विविध स्तरांवर करण्यात येत होत्या. उत्खननाची खोली नियमबाह्य पद्धतीने वाढविण्यात आल्याचा आरोप होत असतानाचा डीजीएमएसच्या आवश्यक परवानग्यांशिवाय ब्लास्टिंग होत असल्याच्याही तक्रारी समोर आल्या होत्या. मात्र स्थानिक महसूल यंत्रणेकडून कोणतीही ठोस



कारवाई होत नसल्याने या प्रकरणाबाबत संशयाचे वातावरण निर्माण झाले होते.

अखेर जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्यांनी पथकासह प्रत्यक्ष पाहणी केली असता अनेक धक्कादायक बाबी उघडकीस आल्या. अनेक खदानींमध्ये सहा मीटरच्या परवानगीपेक्षा अधिक खोली गाठण्यात आल्याचे निदर्शनास आले. त्याचबरोबर सुरक्षाविषयक आणि पर्यावरणीय अटींचेही मोठ्या प्रमाणात उल्लंघन झाल्याचे आढळून आले.

या पार्श्वभूमीवर संबंधित खदानींमधील उत्खनन तात्काळ बंद करण्याचे आदेश देण्यात आले असून अकोटचे उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांना लेखी पत्राद्वारे आवश्यक कार्यवाही करण्यास सांगण्यात आले आहे. याशिवाय संबंधित खदानींना पुढे उत्खनन परवाने देऊ नयेत तसेच त्या कायमस्वरूपी बंद करण्याबाबत प्रस्ताव सादर करावेत, असेही निर्देश देण्यात आले आहेत.

विशेष म्हणजे खदानींची मोजणी करून मंजूर परवाने, प्रत्यक्ष उत्खनन आणि रॉयल्टी यांचा ताळमेळ तपासण्याचे आदेशही देण्यात आले आहेत. त्यामुळे पुढील चौकशीत आणखी गंभीर बाबी समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### परवाने दिले, मग देखरेख कुठे हरवली?

तात्पुरते उत्खनन परवाने देणे, रॉयल्टी वसूल करणे आणि नियमांचे पालन होते की नाही यावर देखरेख ठेवणे ही महसूल यंत्रणेची महत्त्वाची जबाबदारी मानली जाते. मग एवढ्या मोठ्या प्रमाणात अनियमित उत्खनन सुरू असताना स्थानिक स्तरावर वेळोवेळी पाहणी का झाली नाही? जर खनिकर्म विभागाच्या एका पाहणीत इतक्या गंभीर त्रुटी समोर येत असतील, तर महसूल यंत्रणेच्या नियमित तपासणीत त्या का आढळल्या नाहीत, हा प्रश्न आता अधिक तीव्रतेने उपस्थित होत आहे. त्यामुळे केवळ खाणधारकच नव्हे तर परवाना प्रक्रिया, देखरेख यंत्रणा आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या भूमिकेचीही स्वतंत्र चौकशी व्हावी, अशी मागणी नागरिकांतून पुढे येत आहे.

### गट क्रमांक ३७ भोवती वाढले गूढ

गट क्रमांक ३७ वरील खदान अंबादास नागोराव पवार यांच्या मालकीची असल्याचे नोंदीत दिसत असले तरी या परिसरात उभारण्यात आलेल्या स्टोन क्रशर आणि संबंधित व्यवहारांबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. या खदानीला सीमांकन नसणे, तारेचे कुंपण नसणे आणि वृक्षारोपण न करणे अशा त्रुटी आढळल्या आहेत. विशेष म्हणजे याच परिसरातील स्टोन क्रशरबाबत प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निरीक्षणात वनक्षेत्रापासूनचे अंतर हे ५० मीटरच्या आत असल्याचे नमूद करीत शंका उपस्थित केली होती. त्यामुळे खदान आणि वनक्षेत्र यांच्यातील वास्तविक अंतराची स्वतंत्र पडताळणी करण्याची मागणी जोर धरत आहे. तर याठिकाणी या खदान मध्ये होत असलेली ब्लास्टिंग, वापरण्यात येणारी यंत्रसामग्री, विक्री होणारे गौण खनिज, ब्लास्टिंगची बिले या सर्व बाबींची स्वतंत्र तपासणी केल्यास यामधील खरा लाभार्थी कोण ? याचे उत्तर स्पष्ट होणार असल्याची चर्चा सुज्ञ नागरिकांमध्ये रंगली आहे.

### 'माहिती नाही' म्हणणारे एसडीओ; मौन धारण करणारे तहसीलदार

या संपूर्ण प्रकरणावर प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी तहसीलदारांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला असता त्यांच्याकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. दुसरीकडे उपविभागीय अधिकाऱ्यांनी संबंधित पत्राबाबत माहिती नसल्याचे सांगितल्याची माहिती समोर आली. जिल्हा स्तरावरील अधिकारी लेखी आदेश काढत असताना स्थानिक प्रशासनाला त्याची माहिती नसल्याचा दावा अनेक प्रश्न निर्माण करणारा ठरत आहे. कार्यालयात येणारी महत्त्वाची पत्रे संबंधित अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचत नाहीत की त्याबाबत अनभिज्ञतेची भूमिका घेतली जाते, अशी चर्चा आता सुरू झाली आहे.

### पाच खदानींवर बंदीची कारवाई

खनिकर्म विभागाने खालील खदानींमधील उत्खनन थांबविण्याचे आदेश दिले आहेत :

✦ गट क्रमांक ३५ – भीमराव कासदे ✦ गट क्रमांक ४१ – भीमराव कासदे ✦ गट क्रमांक ३७ – रामरतन महादेव सोयाम ✦ गट क्रमांक ५१ – राजकुमार गोपालदास चांडक ✦ गट क्रमांक ४१ – सुमित्रा साहेबराव तोटे

या खदानींमध्ये नियमभंग आणि विविध अनियमितता आढळल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

### डीजीएमएस परवानगीशिवाय ब्लास्टिंग?

गाजीपूर परिसरातील काही खदानींमध्ये डीजीएमएसच्या परवानगीशिवाय ब्लास्टिंग करण्यात येत असल्याची गंभीर तक्रार यापूर्वी करण्यात आली होती. या तक्रारीमध्ये गट क्रमांक ३५ ( भीमराव कासदे ), ४१( सुमित्रा साहेबराव तोटे व इतर ) , ४२/१ ( भीमराव कासदे) आणि ३१/१ ( संतोष शेंडे ) मधील उत्खनन कामांचा उल्लेख करण्यात आला होता. आता खनिकर्म विभागानेही ब्लास्टिंगच्या मुद्द्याकडे गांभीर्याने लक्ष वेधल्याने या प्रकरणातील चौकशी अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.

### सहा मीटरची मर्यादा की तीस मीटरपर्यंत उत्खनन?

तात्पुरत्या उत्खनन परवान्यांत साधारणतः सहा मीटर खोलीची मर्यादा असते. मात्र गाजीपूर परिसरातील काही खदानींमध्ये ही मर्यादा अनेक पटींनी ओलांडली गेल्याचा संशय व्यक्त होत आहे. स्थानिक स्तरावर काही खदानींनी २० ते ३० मीटरपर्यंत खोली गाठल्याच्या चर्चा आहेत. जर चौकशीत हे सत्य आढळले तर केवळ दंडात्मक कारवाईच नव्हे तर शासन महसुलाच्या नुकसानीचाही मोठा हिशेब समोर येऊ शकतो.

# मुसळधार पावसाने झोडपले

## जिल्हा सामान्य रुग्णालय जलमय



**अमरावती/प्रतिनिधीः-** शेतकरी मोठ्या आतुरतीने पावसाची वाट पाहत असतांना बुधवारी दुपारी वातावरणात झालेल्या बदलानंतर मुसळधार पाऊस कोसळला. मुसळधार पावसामुळे जनजीवन प्रभावित झाले. दुपारच्या वेळी रस्त्यावर अंधार झाला होता. रस्त्यावर जागोजागी पाण साचले होते. पावसामुळे जिल्हा सामान्य रुग्णालय जलमय झाले होते. रुग्णालयाच्या काही वार्डामध्ये पाणी शिरल्याने रुग्णांना



अडचणींना तोंड द्यावे लागले. या व्यतिरिक्त शहरातील काही क्षेत्रांमध्ये पाणी भरले होते. दोन तास आलेल्या ☞(पान २ वर)

# ज्येष्ठ नागरिकावर डुकराचा प्राणघातक हल्ला

**मॉर्निंग वॉक करणाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण**

**शहरात बिबटनंतर रान डुकराची दहशत**



**अमरावती /प्रतिनिधीः-** शहरातील शेगाव रोडवरील आशियाड कॉलनी परिसरात आज पहाटे एका ज्येष्ठ नागरिकावर रानडुकराने प्राणघातक हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या भीषण हल्ल्यात संबंधित वृद्ध नागरिक पिंजरकर हे गंभीर जखमी झाले असून, परिसरात नागरिकांमध्ये प्रचंड भीती व चिंतेचे वातावरण पसरले आहे.


आज दिनांक २४ जून रोजी पहाटे सव्वा पाचच्या वाजताच्या सुमारास आशियाड कॉलनी येथील रहिवासी पिंजरकर हे नेहमीप्रमाणे मॉर्निंग वॉकसाठी बाहेर पडले होते. कॉलनीतील विघ्नहर्ता गणपती मंदिरासमोरील मोकळ्या जागेतून अचानक आलेल्या एका रानडुकराने त्यांच्यावर भीषण हल्ला चढवला. हा हल्ला ☞(पान २ वर)

# परतवाडा अश्लील व्हिडिओ प्रकरणात आरोपपत्र दाखल

## एसआयटीचा तपास पूर्ण; फॉरेन्सिक अहवालानंतर पुरवणी आरोपपत्र सादर होणार

**अमरावती/प्रतिनिधीः-** परतवाड्यात उघडकीस आलेल्या बहुचर्चित अश्लील व्हिडिओ प्रसारण आणि लैंगिक शोषण प्रकरणात अमरावती ग्रामीण पोलिसांनी न्यायालयात आरोपपत्र (चार्जशीट) दाखल केले आहे. विशेष तपास पथकाच्या (एसआयटी) सखोल तपासानंतर हे आरोपपत्र सादर करण्यात आले असून, जप्त करण्यात आलेल्या डिजिटल पुराव्यांच्या फॉरेन्सिक अहवालाची प्रतीक्षा अद्याप कायम आहे. हा अहवाल प्राप्त होताच पुरवणी आरोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात येणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

या प्रकरणाचा पर्दाफाश एप्रिल २०२६ मध्ये झाला होता. काही तरुणींचे आक्षेपार्ह फोटो आणि व्हिडिओ सोशल



मीडियावर प्रसारित होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर परतवाडा पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवली होती. तपासादरम्यान मुख्य आरोपी अयान अहमद तनवीर अहमद (वय १९) याला अटक करण्यात आली होती. यानंतर तपासाच्या कक्षेत आलेल्या उजेर खान इकबाल खान, मोहम्मद साद मोहम्मद साबिर, तरबेज खान तस्लीम खान, मानव दीपक सुगंधे, रैफाज खान मंजूर खान, मोहम्मद ☞(पान २ वर)

# गोळीबार प्रकरणात पोलिसांची मोठी कारवाई

## दोन कट्टे, तलवारींसह टोळी अटकेत

**अमरावती/प्रतिनिधीः-** नागपुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील असोरिया पेट्रोल पंपासमोर झालेल्या प्राणघातक हल्ला आणि गोळीबार प्रकरणात पोलिसांनी मोठी कारवाई करत एकूण ११ आरोपींना अटक केली आहे. आरोपींकडून दोन देशी कट्टे, जिवंत काडतुसे, चार तलवारी, तीन फरसे तसेच



गुन्ह्यात वापरण्यात आलेल्या तीन मोटारसायकली जप्त करण्यात आल्या आहेत. या प्रकरणी शोएब अहमद एजाज अहमद (वय ३५, रा. आझाद कॉलनी) यांच्या तक्रारीवरून नागपुरी गेट पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी आणि मुख्य आरोपी सय्यद तौसिफ सय्यद नासिर (रा. अन्सार नगर) यांच्यात जुने वैमनस्य होते. त्याच कारणावरून २० जून रोजी रात्री ८ वाजताच्या सुमारास असुरिया पेट्रोल पंपासमोरील पानटपरीजवळ फिर्यादी, त्यांचा भाऊ अहेफाज खान आणि मित्र शेख रशीद ☞(पान २ वर)

# सुतगिरणी गेटजवळ वृद्धाचा खून,एक आरोपी अटकेत- दोघांचा शोध सुरू

**अमरावती/प्रतिनिधीः-** सुतगिरणी गेटजवळ रक्ताच्या थारोळ्यात आढळून आलेल्या ६५ वर्षीय वृद्धाच्या खूनप्रकरणाचा उलगडा करण्यात राजापेठ पोलीस व गुन्हे शाखेला यश आले आहे. या प्रकरणात एका आरोपीला अटक करण्यात आली असून आणखी दोन संशयितांचा शोध सुरू आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गोदावरी कॉलनी येथील माणिकराम बळीराम बोरकर (वय ६५) हे २२ जून



रोजी सकाळी सुमारे ११ वाजता घरातून ३ ते ४ हजार रुपये घेऊन बाहेर पडले होते. त्यानंतर ते घरी परतले नाहीत. २४ जून रोजी त्यांचा मृतदेह सुतगिरणी गेटजवळ रक्ताच्या डागांसह आढळून आला. याबाबत त्यांचा मुलगा जितेंद्र माणिकराव बोरकर यांनी राजापेठ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या तक्रारीवरून राजापेठ पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण तसेच गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे व अतुल वर यांच्या नेतृत्वाखाली तपास करण्यात आला. तपासादरम्यान कोणताही ठोस तांत्रिक पुरावा उपलब्ध नसतानाही पोलिसांनी माहिती ☞(पान २ वर)

# स्क्वेअर कॅफेमध्ये धाड, प्रेमी युगल ताब्यात

## जिल्हा स्टेडियम परिसरात कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** स्थानिक जिल्हा स्टेडियम परिसरातील स्क्वेअर कॅफे मध्ये भरोसा सेलने धाड मारून प्रेमीयुगलांना अश्लील चाळे करताना ताब्यात घेतले. या कारवाईमुळे कॅफे संचालकांमध्ये खळबळ उडाली आहे. गुप्त माहितीच्या आधारावर भरोसा सेल पथकाने स्क्वेअर कॅफे येथे धाड मारली. यावेळी तरुण-तरुणी अश्लील चाळे करताना त्यांना दिसले. पोलिसांनी



प्रेमीयुगलांना ताब्यात घेतले आणि गाडगे नगर ☞(पान २ वर)

# आसिफ काल्या हल्ला प्रकरणात आणखी एक गजाआड

**-दोन फरार आरोपींचा युद्ध स्तरावर शोध**

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील जुना कॉटन मार्केट चौक परिसरात काँग्रेसच्या माजी नगरसेविकेचे पती हब्बू शाह यांच्या हत्याकांडाचे षडयंत्र रचण्याच्या आरोपात आसिफ काल्या वर रविवारी दुपारी तीन भावंडांनी हल्ला केला होता.या हल्ल्या नंतर तिन्ही भाऊ फरार झाले होते. मंगळवारी उशिरा रात्री पोलिसांनी आरोपी सोनू शहा याला ताब्यात घेतले आहे. माहितीनुसार १५ वर्षापूर्वी काँग्रेसच्या माजी नगरसेविकेचे पती हब्बू शाह यांची चाकूने वार करून हत्या करण्यात आली होती. या हत्याकांडाचे षडयंत्र आसिफ आल्या यांनी केले असल्याच्या संशयात रविवारी हब्बू शहा यांचे पुत्र सोनू शहा, मेहबूब शहा आणि मुबेक शाह यांनी आसिफ काल्यावर जुन्या कॉटन मार्केट परिसरात चाकूने हल्ला केला.



घटनेची माहिती मिळताच कोतवाली पोलिसांनी पंचनामा केला आणि जखमी आसिफ काल्याला रुग्णालयात दाखल केले. जिथे त्यांच्यावर उपचार सुरू आहे. त्यांच्या बयानाच्या आधारावर पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपी सोनू शहा याला ताब्यात घेतले आहे. ☞(पान २ वर)

# मनपा उपायुक्त पदी भाग्यश्री बोरेकर



**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती महानगरपालिकेत उपायुक्त या पदावर भाग्यश्री बोरेकर ह्या बुधवार दिनांक २४ जुन,२०२६ रोजी रुजु झाल्या. महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा यांची भेट घेवून त्यांनी उपायुक्त या पदाचा पदभार स्विकारला. त्या भातकुली नगर पंचायत येथे मुख्याधिकारी या पदावर कार्यरत होत्या. यापूर्वी भाग्यश्री बोरेकर यांनी अमरावती महानगरपालिकेमध्ये सहाय्यक आयुक्त या पदावर काम केले आहे. यावेळी अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख उपस्थित होते.

# उपसंचालक कार्यालयावर शिक्षकांचे आंदोलन



**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्यात नि:शुल्क शिक्षण व्यवस्थेला कमकुवत करून ऑनलाईन बॅच स्वीकृती प्रक्रियेमध्ये होणाऱ्या अनियमिततेच्या विरोधात शिक्षकांनी आज बुधवार २४ जून रोजी शिक्षण उपसंचालक कार्यालयावर जोरदार निर्दशने करून प्रशासनाला जागे करण्याचा प्रयत्न केला. राज्य सरकार निशुल्क शिक्षण व्यवस्थेला समाप्त करून नवीन शिक्षण प्रणालीवर जोर देत आहे.१५ मार्च २०२४ च्या शासकीय आदेशानुसार राज्यातील अनेक निशुल्क शिक्षण ☞(पान २ वर)

# रविवारी राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम

**अमरावतीं** : जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागातर्फे जिल्ह्यात रविवार, दि. २८ जून रोजी राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण राबविण्यात येणार आहे. यात पाच वर्षापर्यंतच्या बालकांचे लसीकरण करावे, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे. ही मोहिम शून्य ते पाच वर्षे वयोगटातील सर्व बालकांना पोलिओपासून सुरक्षित करण्यासाठी राबविण्यात येणार आहे. आरोग्य विभागाने जिल्ह्यातील ग्रामीण आणि नागरी भागातील १ लाख ४५ हजार ५४० बालकांना पोलिओची लस देण्याचे उद्दीष्ट निश्चित केले आहे. यासाठी जिल्ह्यात १ हजार ९९८ बुथ लसीकरण केंद्र स्थापन करण्यात आले आहे. बुथवर लसीकरण केल्यानंतर ग्रामीण भागात तीन दिवस आणि शहरी भागात पाच दिवस घरोघरी जाऊन घरभेटीद्वारे लसीकरण केले जाणार आहे. या मोहिमेत पालकांनी शून्य ते पाच वर्षे वयोगटातील मुलांना केंद्रावर नेऊन पोलिओ डोज द्यावा, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रवीण पारिसे यांनी केले आहे.

# धामोरी येथे गुटख्याचा साठा जप्त; एकाविरुद्ध गुन्हा दाखल

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यात अवैध व्यवसायांविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत खोलापूर पोलिसांनी धामोरी येथे छापा टाकून शासन प्रतिबंधित गुटखा आणि तंबाखूजन्य पदार्थांचा साठा जप्त केला. या प्रकरणी एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी जिल्ह्यातील सर्व ठाणेदारांना वरली जुगार, अवैध दारूविक्री, गावठी हातभट्ट्या, अवैध रेती वाहतूक, गोवंश वाहतूक तसेच गुटखा विक्री व वाहतुकीविरोधात कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार २२ जून रोजी मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे खोलापूर पोलिसांनी धामोरी (ता. भातकुली) येथील शाम मोहन मिश्रा (वय ३९) यांच्या घरावर छापा टाकला. झडतीदरम्यान विविध कंपन्यांचा पानमसाला, सुगंधित तंबाखू आणि गुटखा असा शासन प्रतिबंधित माल आढळून आला. यामध्ये बाजीराव गोल्ड पानमसाला, मस्तानी सुगंधित तंबाखू, एच-५५ सुगंधित तंबाखू, हॉट प्रीमियम पानमसाला तसेच नजर ९००० गुटखा यांचा समावेश असून एकूण ४,५४० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात ☞(पान २ वर)